चित्तपावन मित्र

पावन पंचाहत्तरी



७५

अमृत महोत्सवी विशेषांक

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

कार्यकारी मंडळ
२००७ - २०१२


श्री. विजय साने
अध्यक्ष


ॲड. अविनाश भिडे
उपाध्यक्ष


श्री. अभय खरे
कार्यवाह


श्री. श्रीरंग वैशंपायन
कोषाध्यक्ष


श्री. हेमंत वाड
अंतर्गत हिशोब तपासणीस

सदस्य


श्री. अनिरुध्द अभ्यंकर


सौ. मंगला जोगळेकर


श्री. प्रभाकर केळकर


श्री. चंद्रशेखर रानडे


श्री. सुधीर दामले


श्री. शिरीष जोग


श्री. नितीन सहस्त्रबुध्दे


श्री. विद्यासागर जोशी


श्री. रणजित कोल्हटकर


श्री. मधुकर बापट

विश्वस्त मंडळ


श्री. प्रभाकर पंत जोशी
अध्यक्ष


प्रा. दिनकरराव बर्वे
विश्वस्त



डॉ. श्रीकांत केळकर
विश्वस्त



प्रा.दिलीप फडके
विश्वस्त

चित्तपावन मित्र

पावन पंचाहत्तरी

सन १९३३ ते २००८





अमृत महोत्सवी विशेषांक

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

स्थापना इ. स. १९३३ शके १८८५
रजि नं. एफ. १२



चित्तपावन मित्र
पावन पंचाहत्तरी

■ **संकल्पना व संपादन**

प्रा. दिलीप फडके
विजय साने
अभय खरे
सुधीर दामले

■ **प्रमुख सहाय्य**

अनिरुद्ध अभ्यंकर
नितीन सहस्रबुद्धे
संजय परांजपे
चंद्रशेखर रानडे
शिरीष जोग

■ **प्रकाशक**

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक
या संस्थेचा हा अंक विजय साने, अध्यक्ष
यांनी मीरा एंटरप्राईजेस, नाशिक येथे छापून
गद्रे मंगल कार्यालय, गोळे कॉलनी, नाशिक - २.
फोन : ०२५३-२५७६२४१
येथे प्रसिद्ध केला.
रजि नं. - एन. एस. (३५) एन. एस. (२०)

■ **मांडणी, मुखपृष्ठ व मुद्रक**

विनायक रानडे
मीरा एंटरप्राईजेस
२, जयश्री, विश्वदीप कॉलनी, गंगापूर, नाशिक
फोन : ०२५३ - २५७५४१६, २५९२७२१
मो. : ९४२३९७२३९४, ९९२२२५७७७
ई-मेल : vinran007@gmail.com

■ **खासगी वितरणासाठी**



संपादकीय

चित्तपावन ब्राह्मण संघ नाशिक अमृत महोत्सव वर्ष साजरे करत आहे. गेल्या ७५ वर्षांतील संस्थेची वाटचाल व त्यांच्या स्मृती सर्वांच्या स्मरणात दीर्घ काळ राहाव्यात या हेतूने ही स्मरणिका आपल्या हाती देतांना आम्हाला अतिशय आनंद होत आहे.


या स्मरणिकेत संस्थेची अमृत महोत्सवी वाटचाल, नाशिकमधील कर्तृत्ववान चित्तपावन, नाशिकमधील महत्त्वाची चित्तपावनांच्या नावांची, ठिकाणांची माहिती तसेच संस्थेचे उपक्रम, चित्तपावनांची वैशिष्ठ्ये आणि गुणविशेष सांगणारे लेख, कुलाचार, अशा विविध विषयांवरील लेख, तसेच काही पूर्वप्रकाशित लेख आहेत. याद्वारे संस्थेची माहिती आपल्या सर्वांना माहीत असायला हवी.

या स्मरणिकेत आम्हाला माहिती मिळालेल्या नाशिकमधील जास्तित जास्त चित्तपावनांच्या नावाने ओळखणारी वस्ती, विविध चौक, रस्त्यांची नावे तसेच ऐतिहासिक ठिकाणे आम्ही प्रकाशीत केली आहेत. आम्ही परिश्रमपूर्वक जास्तीत जास्त ठिकाणांची माहिती दिली आहे. नजरचुकीची काही त्रुटी असल्यास आपण या बाबतीत गैरसमज करून घेणार नाही असा आम्हाला विश्वास आहे.

लेखनाच्या बाबतीत सर्वच लेखकांशी आम्हाला उत्तम सहकार्य दिले. त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार. स्मरणीकेच्या निर्मितीच्या संदर्भात अनेकांनी मदतीचा हात दिला आहे त्यात जाहिरातदार, देणगीदार तसेच कार्यकारी मंडळाचे सर्व सदस्य, संजय परांजपे व मुद्रक मीरा एन्टरप्राईजेसचे विनायक रानडे व प्रशांत नाईकवाडे यांचाही मोलाचा वाटा आहे.

..... संग्राह्य स्मरणिका आपल्या हाती देण्याचा आम्ही मनापासून प्रयत्न केला आहे. आपणास ती नक्कीच आवडेल अशी आशा आहे.

– संपादक



चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

अमृत महोत्सवी समारंभ
अखिल भारतीय
चित्तपावन संघ प्रतिनिधी संमेलन

शुक्रवार दि. १५ ऑगष्ट २००८

स्थळ : काका गद्रे मंगल कार्यालय, गोळे कॉलनी, नाशिक

दुपारी ५ : अधिवेशनाचे उद्घाटन हस्ते

श्री. विजय साने, अध्यक्ष चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

परिचर्चा

चित्तपावन संघटन – **आवश्यकता आणि अडचणी.**

प्रमुख मार्गदर्शक – **प्रा. दिलीप फडके**, नाशिक
श्री. अशोक वझे, पुणे
श्री. एम.भालचंद्र डोंगरे, म्हैसुर

रात्री ९ : विविध चित्तपावन संघाच्या प्रतिनिधींच्या विचारांची देवाण घेवाण.

दि. १६ ऑगष्ट २००८


सकाळी ९.३० : परिचर्चा – **चित्तपावन आणि राजकारण**
प्रमुख सहभागी मान्यवर
खा.श्री. आनंद परांजपे, ठाणे
आ.श्री. हेमंत टकले, नाशिक
आ.श्री. विनय नातू, गुहागर
आ. गिरीश बापट, पुणे
आ.श्री. संजय केळकर, ठाणे
श्री. रोहीत टिळक, पुणे
सूत्र संचलन –
प्रा. प्रफुल्ल केतकर, राजकीय विश्लेषक, NDTV

सकाळी ११ : विचारमंथन – **चित्तपावन आणि उद्योजकता**
प्रमुख सहभागी :
श्री. सुभाष दांडेकर – संस्था प्रमुख, कॅम्लीन उद्योग
श्री. श्रीकांत परांजपे – संचालक, परांजपे स्कीमस्
श्री. देवेंद्र बापट, रिलायबल टेक्नोक्रॅटस, नाशिक
श्री. विवेक गोगटे, फाईव्हआर ईलेक्ट्रॉनिक्स, नाशिक
श्री. महेश दाबक, एम. एस. स्वीचगिअर प्रा.लि.
श्री. अभिजित दाबके, सुर्या स्विचगिअर, नाशिक
सूत्र संचलन – **श्री. मिलींद आगरकर**, मुंबई

स्थळ : परशुराम सायखेडकर नाट्यगृह, नाशिक

सायं. ५.३० : **अमृत महोत्सवी कार्यक्रम समारोप**

स्थळ : कालिदास कलामंदिर, नाशिक
प्रमुख पाहुणे – **श्री. सुभाष दांडेकर.**
संगीत रजनी
लोकप्रिय हिंदी व मराठी गाण्यांचा कार्यक्रम
श्री. प्रमोद रानडे आणि **श्रीमती अनुराधा मराठे**



चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक अमृत महोत्सवी वाटचाल

- विजय साने
अध्यक्ष

महाराष्ट्रातील चित्तपावन ब्राह्मण समाज हा एक अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण समाज मानला जातो. या समाजाची बौध्दिक जडण घडण व समाजकार्य, शिक्षण, राजकारण, वाङ्मय, ललितकला, उद्योग, व्यापार यासारख्या वेगवेगळ्या क्षेत्रातील या समाजाचे कार्य दूरगामी परिणाम घडवणारे ठरलेले आहे. महाराष्ट्राच्याच नव्हे तर संपूर्ण देशाच्या दृष्टीनेच चित्तपावन ब्राह्मण समाजाचे योगदान अत्यंत मूलगामी स्वरूपाचे व प्रभावी राहिलेले आहे. भारतातल्या दुसऱ्या कोणत्याही समाजाने इतक्या विविध क्षेत्रांमध्ये व इतके महत्वपूर्ण कार्य केलेले दिसत नाही. कोकणातून जगण्यासाठी देशावर आलेला हा समाज जिथे गेला तिथे आपल्या परिश्रमाने आपले वेगळे स्थान निर्माण करण्यात यशस्वी झालेला आहे. महाराष्ट्रात व महाराष्ट्राच्या बाहेरच्या अनेक ठिकाणी चित्तपावन ब्राह्मण समाज संघटित करण्यासाठी अनेक चित्तपावन ज्ञाती संस्था कार्य करीत आहेत. नाशिक मधील चित्तपावन ब्राह्मण संघ ही संस्था सर्व संस्थापैकी काही अत्यंत जुन्या व महत्वपूर्ण संस्थापैकी एक मानली जाते.


१९३३ मध्ये ज्या समाजधुरीणांनी ही संस्था स्थापन केली, त्यांच्यापुढे या संस्थेच्या उद्देशाबद्दल अत्यंत सुस्पष्ट अशी कल्पना होती. संस्था स्थापनेसाठी जी अगदी पहिली सभा झाली होती, त्या सभेचे इतिवृत्त याच अंकात इतरत्र दिलेले आहे. त्यातील चर्चा व ठरावांवरून हे स्पष्ट होते आहे की आपण 'नाशिक जिल्हा चित्तपावन ब्राह्मण संघ' या संस्थेची स्थापन करीत आहोत म्हणजे काय करीत आहोत, याची संपूर्ण जाणीव संस्थापकांना होती.

विविध सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन समाज संघटित करण्याचे प्रयत्न सुरुवातीच्या काळात झालेले पहावयास मिळतात. त्यासाठी वेगवेगळे उत्सव, श्रावणीसारखे नित्य नैमित्तिक धार्मिक कार्यक्रम संस्थेमार्फत आयोजित केले जात असत. 'शिक्षणाला' चित्तपावन समाज नेहमीच विशेष महत्त्वाचे स्थान देत आलेला आहे. आपल्याकडील उपलब्ध आर्थिक शक्तीच्या मर्यादेत नाशिकमधील शिक्षण घेणाऱ्या त्या वेळच्या 'मुलांना' संस्थेने महत्त्वपूर्ण मदत केलेली दिसून येते.

तीन चार वर्षांपूर्वीच्या परशुराम जयंतीला संगीतकार कै. सुधीर फडके यांच्या हस्ते ज्या समाज बांधवांचा, त्यांच्या पंचाहत्तरीबद्दल अमृत महोत्सवी सत्कार करण्यात आलेला होता, त्यात संस्थेच्या कार्याची एक आगळीवेगळी पावती मिळालेली होती. नाशिकच्या शैक्षणिक कार्यात अत्यंत मोलाचे कार्य करणाऱ्या गुरूवर्य कै. ब. चिं. तथा बाळासाहेब सहस्त्रबुद्धे यांनी त्यांच्या अमृत महोत्सवाच्या सत्काराला उत्तर देतांना त्यांच्या शालेय व महाविद्यालयीन शिक्षणात चित्तपावन संघाने केलेल्या आर्थिक मदतीचा आवर्जून उल्लेख केलेला होता. त्यांनी मदतीची मागणी करण्याअगोदर संस्थेच्या त्यावेळच्या कार्यकर्त्यांनी स्वतःहून ही मदत केलेली होती हे विशेष. (तो काळ साधारणतः ३० ते ४० सालातला असावा.)

त्या काळात संस्था उत्पन्नासाठी प्रामुख्याने सभासद वर्गणी व प्रसंगोपात मिळणाऱ्या देणग्या यावर अवलंबून असे. हिशोबातील चोखपणा व कारभारातील प्रामाणिकपणा ही चित्तपावनांमधील अंगीभूत वैशिष्ठ्ये त्या काळातही संस्थेच्या कार्यात पहावयास मिळत होती. सभासदांकडून आलेली पाच रुपयांची वर्गणी काही काळ संस्थेत भरण्यास 'विसरणाऱ्या' कार्यवाहांचा कोणताही मुलाहिजा न ठेवता त्यांना कामावरून कमी करण्याचा सडेतोडपणाही त्या काळात दाखविलेला दिसून येतो. रावबहादूर आठवले, वि. गो. वैद्य, प्र. दा. रानडे (वकील), विष्णुशास्त्री केळकर, वामनशास्त्री दातार, वामनराव दाते यांच्यासारखे अनेक मान्यवर समाजधुरीण त्या काळात संस्थेच्या कामात अगदी आवर्जून लक्ष देत होते असे दिसते.

१९४५ मध्ये एका अत्यंत तात्कालिक घटनेनंतर संस्थेच्या त्या वेळच्या कार्यकर्त्यांनी उमामहेश्वर गल्लीतला 'गोळे वाडा' विकत घेण्याचा निर्णय घेतला. आर्थिक ओढग्रस्तीच्या काळात हे मोठे धाडसच होते. भिवंडीचे दांडेकर बंधू, रजिस्ट्रार जोशी आदी लोकांच्या मदतीने ती जागा खरेदी केली गेली. संस्थेच्या इतिहासातली ती एक क्रांतिकारक घटनाच होती. खरोखरच संस्थेला ती जागा लाभली असेच म्हटले पाहिजे. एकमुखी दत्तमंदिराच्या जवळचा परिसर ही एक तपोभूमीच आहे. पूज्य भटजी



महाराजांचे जागृत समाधीस्थान या परिसरात आहे. तसेच इतरही तपस्वी योगीजनांचे वास्तव्य या परिसरात झालेले आहे. या परिसरातील जागा संस्थेला मिळावी असा जणू ईश्वरी योगच होता. कारण ही गोळे वाड्याची जागा खरेदी करण्यापूर्वी सावकार परांजप्यांनी याच परिसरातील गोपाळ बुवांचा मठ ही वास्तू काही अटींवर संस्थेला देण्याचे ठरविलेले होते असे जुन्या कागदपत्रांमध्ये दिसते. अर्थात ती जागा मिळू शकली नाही. तथापि गोळे वाड्यात संस्था आली व त्यानंतरच्या पन्नास वर्षात संस्थेचा सर्व अंगानी विकास झाला असेच म्हणावे लागेल.

गोळे वाड्याचे रूपांतर 'चित्तपावन मंगल कार्यालयात' करण्यासाठी त्यावेळचे आर्किटेक्ट व इंजिनियर कै. सच्चिदानंद पाटणकर, कै. वैशंपायन, रावसाहेब मेहेंदळे यांच्यासारख्या मान्यवरांचे प्रयत्न वेळोवेळी उपयुक्त ठरलेले होते. विशेषतः या मान्यवरांनी त्या काळी हे सर्व काम व्यावसायिक कौशल्याने, पण विनामूल्य केलेले होते, हे विशेष.

नंतरच्या काळात कै. काळे कुटुंबियांकडून पूज्य निरंजन स्वामींचा मठही संस्थेला मिळाला व त्या शेजारील जोगळेकर मठही जोगळेकर कुटुंबियांनी संस्थेस दिला. योगी तपस्वी लोकांच्या वास्तव्याच्या या दोन्ही जागा आहेत. त्या संस्थेकडे आल्या म्हणजे ईश्वरी आशिर्वाद व प्रसादच संस्थेला मिळाला असेच मानावे लागेल.

चित्तपावन मंगल कार्यालय, गेली ५० वर्षे नाशिक मधील सर्वाधिक लोकप्रिय मंगल कार्यालय राहिलेले आहे. या कार्यालयामुळे संस्थेची आर्थिक घडी योग्यरित्या बसू शकली. केवळ सभासद वर्गणी व प्रासंगिक देणग्या यांचेवर अवलंबून न राहता कार्यालयाच्या भाड्याचे भरघोस उत्पन्न संस्थेला मिळू लागले व साहजिकच संस्था अधिक भक्कम आर्थिक पायावर उभी राहिली. वैद्यकीय मदत, शिक्षणासाठी आर्थिक मदत, पुस्तक पेढी, संस्कारवर्ग, वेदपठणाचे वर्ग, विविध धार्मिक कार्यक्रम व उत्सव आदी उपक्रम अधिक प्रभावीपणे केले जाऊ लागले.


१९७० च्या सुमारास नाशिकमधील एक ज्येष्ठ वकील व सामाजिक कार्यकर्ते कै. काकासाहेब गद्रे यांचा संस्थेशी संपर्क आला. काही काळ ते संस्थेचे अध्यक्षही होते. गोळे कॉलनीसारख्या मध्यवर्ती ठिकाणी असलेला त्यांचा राहता बंगला संस्थेस मिळणे, हे मोठे भाग्यच म्हणावे लागेल. या बंगल्याचे रुपांतर आज कै. काका गद्रे मंगल कार्यालयात झालेले आहे. गद्रे मंगल कार्यालय हे आज नाशकातले एक अत्यंत सोयिस्कर आणि सर्वाधिक मागणीचे मंगल कार्यालय आहे. मध्यवर्ती जागा, मोठे सभागृह आणि कार्यालयासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व सोयींची उपलब्धता, यामुळे हे कार्यालयच लग्नासाठी घेतले पाहिजे, अशी अट लग्नात घातलेली आहे, अशी असंख्य उदाहरणे आहेत. केवळ लग्न, मुंज यासारखी मंगल कार्येच नव्हे तर गावातल्या विविध सामाजिक , सांस्कृतिक कार्यांचे केंद्र म्हणून गद्रे कार्यालय ओळखले जाते आहे.

कै. वर्तक वकील, बापूसाहेब थत्ते, नानासाहेब पेठे, निळूभाऊ पेठे, विजय काळे (आर्किटेक्ट), कृ. गो. नातू यांच्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांचे योगदान मिळाले म्हणूनच गद्रे मंगल कार्यालय आजच्या स्वरुपात उभे राहू शकलेले आहे.

चित्तपावन व गद्रे अशी दोन मंगल कार्यालये असलेल्या आपल्या संस्थेला १९८० च्या सुमारास संस्थेचे भूतपूर्व अध्यक्ष र. के. तथा तात्याराव पटवर्धन यांची श्रीकांत कुंज ही वास्तूही मिळाली. कालांतराने ह्या वास्तूचे परशुराम भुवन असे नामानिधान करण्यात आलेले आहे. भविष्यात या ठिकाणी देखील भव्य असा वास्तू प्रकल्प आकारास आणण्याचा मनोदय आहे.

शैक्षणिक मदत, शिष्यवृत्त्या, पुस्तक पेढी, वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक सहाय्य, वैद्यकीय तपासणी शिबिरे यासारख्या विविध योजना राबविल्या जात आहेत. सभासदांना संस्थेच्या रुपाने एक भक्कम आधार उपलब्ध व्हावा असा सातत्याने प्रयत्न केला जात आहे. सभासदांना आपत्तीच्या काळात बिनव्याजी कर्ज देण्यासारख्या योजनाही राबविल्या आहेत. प्रसंगी अत्यंत बिकट अवस्थेतल्या सभासद कुटुंबियांना दर महिन्याचे अन्न-धान्य घेण्यासाठी विशेष सहाय्य देखील संस्थेने केलेले आहे.

आर्थिक मदतीबरोबरच इतरही महत्त्वाचे उपक्रम संस्था आज राबविते आहे. संस्था परिवारातील ज्या ज्येष्ठ समाजबांधवांनी समाजाच्या विविध क्षेत्रात महत्त्वाचे कार्य केलेले असेल त्यांचा 'परशुराम पुरस्कार' देऊन दरवर्षी गौरव केला जातो. वयाची पंचाहत्तर वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ समाजघटकांचा अमृत महोत्सवी सत्कार केला जातो. धुंधुर्मास भोजन हा सगळा समाज एकत्र येणाचा एक आगळा वेगळा कार्यक्रम असतो. नवरात्रीच्या काळात अष्टमीची देवीची पूजा आज नाशिकमध्ये फक्त आपल्या संस्थेतच केली जाते आहे. सामुहिक मौंजीबंधनाचा उपक्रमही



गेली अनेक वर्षे संस्थेच्या वतीने राबविला जातो आहे. या विविध धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांमुळे आज चित्तपावन संघ ही संस्था म्हणजे नाशिकमधील चित्तपावनांचे एक मोठे कुटुंबच आहे.

आपल्या समाजापुरतेच आपले कार्य मर्यादित न ठेवता आपल्या संस्थेने इतरही काही उपक्रम राबविले जे अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले आहेत. जीवनावश्यक वस्तूंची एकत्रित खरेदी करण्याचा, तसेच 'ग्राहक' म्हणून आपल्या समस्या सोडविण्यासाठी संघटित होण्याचा एक आगळा वेगळा प्रयत्न ग्राहक पंचायतीच्या रुपाने नाशिकमध्ये सुरू झाला तो चित्तपावन संघाच्याच पुढाकाराने. आज ही ग्राहक चळवळ नाशिकमध्ये एक महत्वाची चळवळ मानली जाते आहे.

प्रामुख्याने आपल्या समाजबांधवांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी, विशेषतः उद्योग व्यवसायात उभे राहू इच्छिणाऱ्यांच्या पाठीशी आर्थिक शक्ती उभी करण्याचा प्रयत्न आपल्या संस्थेच्या पुढाकाराने सुरू झालेल्या 'परशुराम नागरी सहकारी पतसंस्थे'च्या माध्यमातून केला जातो आहे. ही पतसंस्था देखील आज अत्यंत यशस्वीरित्या कार्य करीत आहे.

त्याचप्रमाणे संस्थेच्या सर्व सभासदांचा अपघात विमा उतरविण्याचा अभिनव उपक्रमही संस्थेने राबविलेला आहे. अशा प्रकारची योजना राबविणारी ही एकमात्र ज्ञाती संस्था असावी.

वाढत्या नाशिकच्या गरजा लक्षात घेता, संस्थेच्या मूळच्या चित्तपावन मंगल कार्यालायाची पुर्नबांधणी होणे क्रमप्राप्त होते. ते काम यशस्वीपणाने केल्यानंतर गद्रे मंगल कार्यालयाच्या इमारतीचे नूतनीकरण होणे आवश्यक होते. तीन चार वर्षांपूर्वी हे काम देखील पूर्ण झाले. मूळच्या काका गद्रे यांच्या गोळे कॉलनीतील जागेवर आता तीन मजली मोठे कार्यालय दिमाखात उभे आहे. अगदी लिफ्टसह ! हे सारे होत असतांनाच, पूर्वाध्यक्ष कै. र. के. पटवर्धन यांनी त्यांचा राहता बंगला संस्थेला दिला होता, त्या बंगल्याच्या जागी मोठा प्रकल्प करण्याच्या योजनेला वाढत्या गावामुळे व गर्दीमुळे मर्यादा येत आहेत हे लक्षात घेऊन तो बंगला विकून त्या ऐवजी गावाबाहेर मोठी जागा घेवून त्याठिकाणी श्री योगेश्वरीचे भव्य मंदिर व सर्वसोयींयुक्त वृद्धाश्रम साकारण्याचा मानस आहे.

आजवरच्या संस्थेच्या वाटचालीत असंख्य कार्यकर्ते व सभासदांचे योगदान संस्थेस लाभलेले आहे. समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या चित्तपावन ज्ञाती बांधवांनी वेगवेगळ्या रुपाने संस्थेच्या कामात सहयोग दिलेला आहे. इतर ज्ञाती संस्थांना हेवा वाटावा असे कार्यकर्त्यांचे मोहोळ सुरुवातीपासूनच या संस्थेला लाभलेले आहे. या बळावरच आजपर्यंतची संस्थेची वाटचाल झालेली आहे. भविष्यातील आव्हाने देखील आपण अशा कार्यकर्त्यांच्या बळावर पेलू शकू.

या पुढील काळात व्यावसायिक शिक्षणाच्या योजना, उद्योजकता विकास, वैद्यकीय उपचाराच्या सोयी आदी नवीन योजना अंमलात येतील असा विश्वास आहे.

शहरात मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या तीन भव्य वास्तू, दोन मंगल कार्यालयाच्या रूपाने मिळणारे उत्पन्न यामुळे संस्थेची आर्थिक बाजू आज मजबूत झालेली आहे. सामान्यतः ज्ञाती संस्थांना अशी भक्कम आर्थिक परिस्थिती क्वचितच मिळत असते. या भक्कम पायावर समाजबांधवांना एकत्र आणणारी व त्यांच्या विविध गरजा भागविण्यासाठी व अडचणी दूर करण्यासाठी तत्पर असलेल्या एका संवेदनाशील संस्थेची उभारणी अधिकाधिक प्रभावीपणाने व्हावी असा कार्यकर्त्यांचा प्रयत्न आहे.

बदलत्या राजकीय व सामाजिक परिस्थितीत ब्राह्मण समाजापुढे नवे नवे प्रश्न उभे राहत आहे. शासकीय व निमशासकीय नोकऱ्यांची उपलब्धता झपाट्याने कमी होत आहे. शिक्षण हे आपल्या समाजाचे एक महत्त्वाचे क्षेत्रही मधल्या काळात आपल्या हाती राहिलेले नाही. अशा काळात बदलत्या आर्थिक व सामाजिक रचनेत केवळ गुणवत्ता व बैद्धिक क्षमता यांचाच आधार असलेल्या आपल्या ज्ञातीला सहाय्यकारी होईल अशा पद्धतीचे कार्य आपल्या संस्थेला करावे लागेल. 'आम्ही ब्राह्मण वगैरे काही मानीत नाही' असे जरी आपल्या पैकी काही जण म्हणत असले तरी इतरांच्या नजरेत आपण ब्राह्मणच आहोत व त्यातून निर्माण होणाऱ्या परिस्थितीला आपणा सर्वांनाच सामोरे जावे लागणार आहे.

चित्तपावन ब्राह्मण संघ अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे. पंचाहत्तर वर्षांच्या वाटचालीत संघाला अनेक ज्ञात -अज्ञात लोकांची मदत झाली आहे. ह्या कालप्रवाहाच्या विविध टप्प्यांवर अनेकांचे योगदान या कामाला मिळालेले आहे. त्या सर्वांच्या योगदानाशिवाय संघाला आजची अवस्था आलीच नसती. ह्या सगळ्या कामात नावे अनेक



असली तरी काही आठवायला बसलो की ठळकपणाने काही आठवणे साहजिकच आहे. ॲड. नानासाहेब रानडे त्या काळातले गावातले एक तरूण आणि मान्यवर वकील. संस्थेचे पहिले कार्यवाह म्हणून स्थापनेच्या प्रक्रियेत आणि सुरुवातीच्या काही वर्षांमध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. या कामात त्यांच्याबरोबरीने दत्तोपंत परांजपे, रामचंद्र सदाशिव आठवले यांनी सुरुवातीच्या पाच-सहा वर्षे अध्यक्षपदाची धुरा सांभाळली. वामनराव दाते आणि विनायकराव परांजपे तर स्थापनेपासून संस्थेशी जोडले गेलेले होते. या दोघांनीही नंतरची बरीच वर्षे संस्थेत विविध स्तरावर खूपच महत्वपूर्ण कामगिरी पार पाडली. गणेश हरी पेठे सहा-सात वर्षे संस्थेशी सुरुवातीस उपाध्यक्ष व नंतर अध्यक्ष म्हणून संबंधित होते. ज्यांच्या बंगल्यात नंतर गद्रे मंगल कार्यालय थाटले गेले ते काकासाहेब गद्रे काही काळ संस्थेत अध्यक्ष होते. त्यांनी संस्थेला आपला राहता बंगला देणगी दाखल दिला. त्या देणगीचा विषय प्रत्यक्षात आला तो ॲड. क्षी. र. वर्तक आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या प्रयत्नांनीच. संस्थेला अगदी सुरुवातीची देणगी देणाऱ्या भिवंडीच्या दांडेकर परिवाराचे संस्थेशी आजही संबंध आहेत. अमेरिकेत शहर नियोजन आणि वास्तूशास्त्र विषयात नामांकित प्राध्यापक असणाऱ्या हेमाताई दांडेकर यांनी भय्यासाहेब दांडेकरांच्या स्मरणार्थ देणगी दिली आहे. आज मुंबईचे पण मूळचे नाशिकचे असणारे नानासाहेब व निळूभाऊ पेठे यांनी मातुश्री सीताबाई पेठे यांच्या स्मरणार्थ देणगी देऊन तसेच त्याच परिवारातील कै. श्री. ग. तथा तात्यासाहेब पेठे यांच्या स्मरणार्थ देणगी देणारे श्री. दिलीप काळे व सौ. शुभांगी काळे यांनी देखील संस्थेला देणगी देऊन अमूल्य मदत केली आहे. डॉ. भास्करराव आपटे यांच्या स्मरणार्थ देणगी देणारे श्री. लिमये, त्याच प्रमाणे दत्तात्रय नरहर बर्वे व सौ. सावित्रीबाई दत्तात्रय बर्वे यांच्या स्मरणार्थ देणगी देणारे कोठूरचे बर्वे कुटूंबीय या साऱ्यांनी संस्थेच्या उभारणीत अमूल्य सहाय्य केलेले आहे. बापूसाहेब मोडक, बाळासाहेब खरे, ल. रा. बापट, ग. म. (दादा) काळे, हरीभाऊ गोखले, सुरेश वैशंपायन, प्रा. ग. श्री. दाबके, हरीभाऊ केळकर, अण्णाशास्त्री दातार, शं. पु. जोशी, शरद रहाळकर, कृ. गो. नातू, प्रभाताई टकले, कुमुदताई अभ्यंकर, गजानन चिपळूणकर, योगेश्वर अभ्यंकर यांच्यासारख्या निरलस कार्यकर्त्यांनी केलेल्या कामाचा विसर कसा पडू शकेल? संस्थेच्या सभासदांकडून दरवर्षी अतिशय नियमितपणाने व कष्टाने वर्गणी आणणारे कै. भानू यांचे विस्मरण होणे शक्यच नाही. संपर्कासाठी थेट सर्वांपर्यंत पायपीट करण्याशिवाय दुसरे माध्यम नसतांनाच्या काळात भानू हे एकमेव चालतेबोलते संपर्क माध्यम होते. त्यांच्या कामगिरीचे महत्त्व किती होते हे कदाचित आज समजणार नाही. संस्थेची मंगल कार्यालये चालली.... नव्हे ती अत्यंत यशस्वीपणाने चालली...नाशकात कार्यालये ही संस्था रूढ केली तीच मुळात आपल्या संस्थेने. त्या यशामागे उभे होते ते राजाभाऊ गानू, मामा नेने, दिगंबर मराठे, जोगळेकर, दिनकरराव खरे, शामराव घैसास, दि. वि. कानिटकर, श्रीनिवास पेंडसे, राजेंद्र कुलकर्णी यांच्यासारख्या सेवाभावी व्यवस्थापकांचे काम. मामा नेने यांच्यासाखा टापटीपेने व नीटसपणाने काम करणारा व्यवस्थापक असणे किंवा राजाभाऊ गानूंच्या सारखा आथित्यशील व्यवस्थापक असणे म्हणजे नक्की काय होते याचा ज्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला त्यांनाच त्याचा अर्थ समजू शकेल. बापूसाहेब थत्ते यांनी सुरुवातीला कोषाध्यक्ष आणि नंतरची तब्बल सोळा वर्षे अध्यक्षपदाची जबाबदारी अतिशय उत्तम सांभाळली. संस्थेत त्या काळात अनेक नवीन कार्यकर्ते आले, स्थिरावले. नंतरची बरीच वर्षे त्यांनी काम केले. यामागे बापूसाहेबांनी त्यांना दिलेले प्रोत्साहनच कारणीभूत होते हे विसरता येणार नाही. भरद्वाज रहाळकर, सुर्यकांत रहाळकर, प्रा. दिलीप फडके, डॉ. सुभाष साने, सुधाकर गाडगीळ, शिरीष बेहेरे यांचा संस्थेच्या जडणघडणीत अतिशय मोलाचा वाटा आहे. असे कार्यकर्ते संस्थेकडे वळले नसते तर आजचा अमृतयोग आलाच नसता. आज अमृतमहोत्सवी कार्यक्रमात प्रकर्षाने स्मरण होते आहे ते डॉ. दिलीप वाड नाहीत ही जाणीव वेदनादायी आहे. कोणतीही संस्था पंचाहत्तर वर्षे चालते, मोठी होते, समाजात महत्वाची कामगिरी बजावते ते केवळ कार्यकर्त्यांच्या बळावरच. आपली संस्था भाग्यवान म्हटली पाहिजे. आपल्या संस्थेला सुरुवातीपासूनच चांगले, सेवाभावी, निरलस आणि अतिशय प्रामाणिक आणि पारदर्शी काम करणारे कार्यकर्ते मिळाले आहेत. तरूण कार्यकर्त्यांचा संस्थेत सतत होणारा प्रवेश ही खरोखरच एक अभिमानाची व दिलासा देणारी गोष्ट आहे. पुढच्या टप्प्यात देखील कार्यकर्त्यांचा ओघ असाच अखंड वाहता रहावा आणि संस्थेचा शतक महोत्सव असाच दिमाखात साजरा व्हावा यापेक्षा ह्या प्रसंगी दुसरी कोणती इच्छा व्यक्त करता येईल ! त्याबरोबर कुणीही चित्तपावन कुटुंबीय केवळ आर्थिक पाठबळ नाही म्हणून ''अन्न, शिक्षण व वैद्यकीय उपचारापासून वंचित राहू नये'' हेच ध्येय उराशी बाळगून भविष्यातील वाटचालीसाठी संकल्प परशुरामचरणी करून माझे मनोगत संपवतो ! धन्यवाद !



संस्थेचे उपक्रम.......

- अभय खरे

संस्था स्थापनेचा उद्देशच मुळी ज्ञाती बांधवांचे संघटन, धार्मिक, शैक्षणिक, शारीरिक म्हणजेच आरोग्य विषयक व तसेच आर्थिक हित जपणे असा व्यापक असल्यामुळे त्यानुरूप विविध कार्यक्रमांचे आयोजन संस्थेच्या आजवरच्या उपक्रमांतर्गत केले जाते.

१) संघटनात्मक उपक्रम :


श्री भगवान परशुराम जयंती, चैत्र गौरीचे हळदी-कुंकू, हरतालिका पूजन, गणोशोत्सव आदी कार्यक्रम हे ज्ञातीबांधवांच्या संघटनासाठीचे संस्थेच्या स्थापनेपासून आजपर्यंत अतिशय भावपूर्ण वातावरणात साजरे केले जातात.

परशुराम जयंती निमित्ताने श्री भगवान परशुरामाची पवमानाभिषेक पूजा करण्यात येते.

हरतालिका पूजनाच्यासाठी नवविवाहित सवाष्णींची दरवर्षी मोठ्या संख्येने गर्दी होत असते. याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या पूजेचे पौरोहित्य देखील महिलाच करतात. त्यानंतर गणेशोत्सव पूर्वापार चालत आलेल्या परंपरेनुसार संस्थेचा गणेशोत्सव हा पाच दिवसांचा असतो. ह्या पाच दिवसांदरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. उदा. पुष्परचना, रंगावली, पाककृती स्पर्धा तसेच कॅरम, बुध्दिबळ, टेबलटेनीस स्पर्धा. गणेशोत्सवा-दरम्यानच दरवर्षी संस्थेचा वर्धापन दिन व गुणगौरव कार्यक्रम साजरा करण्यात येतो. गणेशोत्सवाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे शास्त्रीय संगीताच्या मैफिलीचे आयोजन. या शास्त्रीय संगीताच्या मेजवानीची समस्त नाशिककर संगीत प्रेमी अतिशय आतूरतेने वाट बघत असतात. सुमारे ३० ते ३५ वर्षांहूनही अधिक वर्षांची परंपरा असलेला आणि आजही टिकून असलेला असा हा कार्यक्रम म्हणजे नाशिकच्या सांस्कृतिक परंपरेचा एक मानदंडच मानला पाहिजे. संस्थेमध्ये आजपर्यंत अनेक नामंवत गायक मंडळींनी हजेरी लावली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने पंडित राम मराठे, पं. अजय पोहनकर, प्रभाकर कारेकर, राजा काळे, सौ. आशाताई खाडीलकर, किर्ती शिलेदार, आरती अंकलीकर - टिकेकर, अश्विनी भिडे-देशपांडे, देवकी पंडीत, कलापिनी कोमकली, मंजिरी असनारे - केळकर, सावनी शेंडे, पंडित संजीव अभ्यंकर, शौनक अभिषेकी, पं. सत्यशील देशपांडे, वीणाताई सहस्त्रबुध्दे, रघुनंदन पणशीकर, विनोद डिग्रजकर, विजय कोपरकर, विजय गोखले, पद्मा तळवळकर शुभा मुदगल, प्रभा अत्रे. आदींचा समावेश आहे.

२) धार्मिक उपक्रम :

धार्मिक उपक्रमांतर्गत देखील अनेक संस्कारक्षम कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्यामध्ये प्रामुख्याने कै. राधाबाई गद्रे पुण्यतिथी निमित्ताने किर्तन, श्रावणी, निरंजन स्वामी पुण्यतिथी, महालक्ष्मी पूजन अर्थातच अष्टमीची पूजा. अश्विन शुध्द अष्टमीला महालक्ष्मीचे विधीवत पूजन करण्यात येते, साधारण ४० वर्षांहून अधिक काळापासून ह्या परंपरेचे जतन करण्यात येत आहे. उमामहेश्वर लेनमधील खरे मामींच्या घरी या पूजेची सुरवात झाली. उकडी पासून तयार केलेला महालक्ष्मीचा मुखवटा हे आणखी एक पूजेचे वैशिष्ट्य. रात्री उशीरापर्यंत शहराच्या सर्व भागातून भाविक दर्शनासाठी येत असतात. या प्रसंगी अनेक महिला घागरी फुंकतात. ह्या कार्यक्रमाचे नाशिकवासीयांच्या मनामध्ये एक आगळे वेगळे स्थान आहे व त्यामध्ये दरवर्षी भाविकंची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. असाच एक धार्मिक आणि संस्कारक्षम कार्यक्रम म्हणजे सामुदायिक व्रतबंधन. केवळ कौटुंबिक अथवा आर्थिक कारणांमुळे अतिशय महत्त्वपूर्ण व भावी आयुष्याचा पाया रचणारा असा हा संस्कारक्षम विधी राहून जाऊ नये म्हणून संस्थेच्या वतीने सामुदायिक व्रतबंधनाचा कार्यक्रम आयोजिक केला जातो.



३) शैक्षणिक उपक्रम :

शैक्षणिक क्षेत्राच्या बाबतीत आपली संस्था सहकार्यासाठी सदैव तत्पर असते. सर्व शाखांची सर्व स्तरावरील पाठ्यपुस्तके संस्थेच्या 'र. के. पटवर्धन' पुस्तक पेढीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अनेक वर्षांपासून दिली जातात. या योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे मागेल त्याला व क्वचित प्रसंगी संस्थेचा सभासद नसेल त्यालाही संस्थेने पाठ्य पुस्तके दिली आहेत. या योजनेचा लाभ घेऊन व्यक्तिगत आयुष्यात अनेक विद्यार्थ्यांनी मानाचे/वरिष्ठ अधिकारी पदाचे स्थान प्राप्त केले आहे. यामुळे संस्थेच्या लौकिकात भरच पडते. विद्यार्थीही कृतज्ञतापूर्वक याची परतफेड कर्तव्यभावनेतून करतांना आढळतात. त्याचबरोबर दरवर्षी संस्थेच्या वतीने गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना सुमारे एक ते दीड लाख रुपयांच्या शिष्यवृत्त्या तसेच पारितोषिकांनी पुरस्कृत करण्यात येते. वेळप्रसंगी उच्च शिक्षणासाठी परतफेडीच्या तत्त्वावर आर्थिक मदतही पुरविली जाते. राजा शिवाजी मार्गदर्शन केंद्र व चित्तपावन ब्राह्मण संघ यांच्या संयुक्त विद्यमाने एन. डी. ए. साठीच्या प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात येते. तसेच नाशिक नगरीत शालेय विद्यार्थ्यांमध्ये अतिशय लोकप्रिय असलेली, स्कॉलरशीपच्याच धर्तीवर घेण्यात येणारी ख्यातनाम गणितज्ञ "कै. द. रा. कापरेकर स्मृती" गणित स्पर्धा. साधारणतः २० ते २५ वर्षांपूर्वी स्वतः कापरेकर सर ही स्पर्धा आयोजित करीत असत. पुढे त्यांच्या निधनानंतर संस्थेने ही स्पर्धा कै. द. रा. कापरेकर यांच्याच नावाने सुरू ठेवली व आज या स्पर्धेचा वेगळा लौकिक आहे. शहरातील विविध शाळांमधून हजारोंच्या वर विद्यार्थी ह्या स्पर्धेमध्ये सहभागी होतात. विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक तर शाळेला सांघिक करंडक देण्यात येतो.


४) आरोग्यविषयक उपक्रम :

आरोग्य विषयक उपक्रमांतर्गत देखील चाळीशी नंतरच्या सभासद व कुटुंबियांसाठी तसेच असाध्य आजारांच्या उपचारार्थ आर्थिक वैद्यकीय मदत गरजेनुसार करण्यात येते.

संस्थेचे कार्य एवढ्यावरच थांबत नाही तर संस्थेच्या वतीने नाशिकमध्ये आपल्या व्यक्तिगत, सामाजिक कामाने ठसा उमटविण्याऱ्यास परशुराम पुरस्काराने गौरविण्यात येते. आजवर हा पुरस्कार श्री. प्रभाकरपंत मोडक, बापूराव मनोहर, वैद्य अण्णाशास्त्री दातार, वैद्य अण्णाशास्त्री करमरकर आदींना त्यांच्या सामाजिक योगदानाबद्दल प्रदान करण्यात आला आहे. त्याच बरोबर एक हृद्य असा सोहळा म्हणजे सभासद वा त्यांच्या कुटुंबियांचा अमृत महोत्सवी सत्कार. त्याचे कारणही तसेच आहे. सर्वसाधारणपणे, सामान्य माणसांच्या आयुष्यात सत्कार, सोहळ्याचे प्रसंग अभावानेच येत असतात. परंतु त्यांनी त्यांच्या कौटुंबिक आयुष्यात स्वाभिमानाने जगण्याच्या प्रयत्नात व कुटुंब उभारण्यासाठी सोसलेले कष्ट, सहन केलेले आघात, यातना, त्याग इ. बाबींचा विचार करता त्याप्रित्यर्थ अशा या सत्कारार्ह व्यक्तिंप्रती कृतज्ञताभाव व्यक्त करणे हे संस्था आपले कर्तव्यच मानते व त्याच बांधिलकीतून दरवर्षी अमृतमहोत्सवी सत्कार करत असते.

याशिवाय संस्थेच्या वतीने वधुवर सूचक मंडळ, योगेश्वरी महिला गृह उद्योग, रक्तदान शिबीर, यात्रा व सहल, शिधा वाटप, विविध विषयांवर मार्गदर्शन वर्ग, गुरूवर्य विनायकराव साने यांच्या प्रेरणेतून व पुढाकाराने निरंजन स्वामी मठामधे मोफत वेदपाठ शाळा चालविण्यात येते व गेल्या ४ ते ५ वर्षांपासून दरवर्षी विश्वशांती व वैश्विक कल्याण्यासाठी यज्ञाचे आयोजन करण्यात येत.


संस्थेचे हे कार्य ज्येष्ठांचे आशिर्वाद व मार्गदर्शन हितचिंतक सभासदांचे सहकार्य, कार्यकारी मंडळ व कर्मचाऱ्यांचे परिश्रम यातून आजवर साकार होत आहे. यापुढेही भविष्यात विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका, स्पोर्टस क्लब, करीअर मार्गदर्शन, वैद्यकीय सेवा सुश्रुषा केंद्र, अद्ययावत वृध्दाश्रम, योगेश्वरीचे भव्य मंदिर, नाशिक शहराच्या सर्व कानाकोपऱ्यांमधे घर तिथे सभासद; अन्न, आरोग्य व शिक्षणापासून कुणीही वंचित राहू नये यासाठी सर्व प्रकारचे प्रयत्न करण्यास संस्था कटिबद्ध आहे.



नाशिकच्या जडणघडणीतले चित्तपावनांचे योगदान....

- प्रा. दिलीप फडके

स्वतःची मूळभूमी असणाऱ्या कोकणापासून शेकडो मैलू दूर असणारे नाशिक हे काही चित्तपावनांचे मूळ गाव नाही. एक तीर्थक्षेत्र अशी नाशिकची ख्याती. सिंहस्थ पर्वणीसाठी तसेच गोदाकाठच्या क्रियाकर्मासाठी प्राचीन काळापासून प्रसिद्ध. त्यामुळे प्राचीन काळापासून गावावर ब्राह्मणांचा पगडा मोठा असणे अगदी क्रमप्राप्त होते. पण हे ब्राह्मण स्थानिक, देशावरचे, म्हणून देशस्थ. कोकणस्थ चित्तपावन हे काही मूळचे नाशिकचे रहिवासी नाहीत. मग चित्तपावन राहण्यासाठी नाशिकला नेमके कधी आले असतील? नेमका इतिहास फारसा उपलब्ध नाही. पण ते नाशिकला येऊन स्थाईक होण्यात पेशव्यांचे नाशिकशी असणारे नाते कारणीभूत असणार हे उघड आहे. त्रिंबकेश्वर, नाशिक, गंगापूर, आनंदवल्ली ही सारी पेशवाईत महत्त्वाची ठिकाणे. नाशिकजवळचे पांढुर्ली, डुबेरे ही बर्वे कुटुंबियांची गावे. थोरल्या बाजीरावांचे जन्मस्थळ नाशिक जिल्ह्यात पांढुर्लीला बर्वे कुटुंबियांच्या ऐतिहासिक वाड्यात. साहजिकच नाशिकचा पेशव्यांशी संबंध खूपच जवळचा. नाशकात त्यांचे स्वतःचे वाडेदेखील होते. सरकारावाडा, आज पेठे विद्यालय आहे तिथला पेशवे वाडा आज काही प्रमाणात जुना इतिहास सांगतात. पण आनंदवल्लीचा आनंदीबाईचा, गंगापूरचा गोपिकाबाईंचा हे वाडे मात्र काळाच्या ओघात इंग्रज शासक आणि नंतरच्या चोराचिलटांमुळे पार नाहीसे झाले. पेशव्यांचे पाठोपाठ त्यांच्या सरदार, सावकारांचे वाडे नाशकात झाले असणार यात आश्चर्य नाही. परांजपे, बिवलकर, गानू यांच्यासारख्या जुन्या कुटुंबियांचे नाशकातले वास्तव्य पेशव्यांमुळेच. अव्वल इंग्रजी आमदनीत सरकारी पदांवर आणि सरकारच्या विरोधातील स्वातंत्र्य चळवळीतही जी काही माणसे होती त्यात चित्तपावनांमधील अनेक जण होते. नायब तहसिलदार, उपजिल्हाधिकारी, मुन्सफ, न्यायाधीश यासारख्या अनेक पदांवर जशी काही मान्यवर चित्तपावन काम करीत होती तशीच स्वातंत्र्याच्या चळवळीत अगदी सशस्त्र लढ्यातही सावरकर बंधूंच्या सारखी मान्यवर चित्तपावन मंडळी होतीच. थोर समाजसुधारक न्यायमूर्ती रानडे काही काळ नाशिकजवळ निफाडला होते. दातार, केळकर यांच्यासारखे तत्कालीन समाजातले मान्यवर सहकारी स्वातंत्र्यवीर सावरकरांना लाभले ते नाशकातच.लोकमान्य टिळकांशी नाते संबंध असणारे केतकर कुटुंबीय नाशकातले जुने राहणारे व समाजात स्वतःच्या कर्तृत्त्वाने मान्यता पावलेले. रावबहादूर गोखले, रावबहादूर आठवले, डेप्युटी कलेक्टर दिक्षित ही तत्कालिन नाशकातली मान्यवर व्यक्तित्त्वे होती. काँग्रेसमधले मान्यवर नेते म्हणून ओळखलेले दादासाहेब गद्रे, काकासाहेब गद्रे हे देखील नाशकातलेच. एकेकाळी नाशिकच्या सामाजिक व राजकीय जीवनात त्यांचे स्थान विशेष महत्त्वाचे होते. त्या काळात वकील हा समाजातला एक मान्यवर घटक होता. चि. नी. पाटणकर, अभ्यंकर, बोडस, रानडे, साठे, केळकर, यांच्यासारखी मान्यवर वकीलमंडळी नाशिकच्या बार असोसिएशनमध्ये प्रसिध्द होती. नंतरच्या काळात नानासाहेब लेले, बाळासाहेब भिडे, मनोहर साठे, नंदकुमार पोंक्षे, सतीश मुजुमदार, अविनाश भिडे , मिलिंद धोपावकर यांनी ही परंपरा पुढे चालविली आहे. डॉ. विष्णू गणेश केळकर यांचा दवाखाना ह्या वर्षी आपली शताब्दी साजरी करीत आहे. 'येथे गरीबांना मोफत औषधे दिली जातात' ही त्यांच्या दवाखान्यातील पाटी शंभरी पूर्ण करून डॉ. दिनकर केळकरांमुळे चौथ्या पिढीतदेखील तशीच आहे. वैद्य कृष्णशास्त्री देवधर यांची किर्ती दूरवर पसरलेली होती. डॉ. काकासाहेब देवधरांनी क्षय रोग्यांवरचे उपचार इतरत्र कुठेही होत नव्हते त्याकाळी नाशकात सुरू केले. रावबहादूर गोखले यांनी रेडक्रॉस सोसायटी (तसेच रोटरीच्यादेखील) स्थापनेत अत्यंत महत्त्वाची कामगिरी बजावली होती. त्यांच्याच प्रमाणे वैद्य बिवलकर, अण्णा दातार, गद्रे, मामा करमरकर आणि अण्णा करमरकर, ल. भा. काळे, वि. म. गोगटे, शरदराव परचुरे यांच्या औषधांनी अनेक पिढ्यांचे उपचार केलेले आहेत. आजही डॉ. श्रीकांत केळकर, डॉ. लेले, डॉ. काकतकर. डॉ. कुमठेकर, डॉ. सोहोनी, डॉ. करंदीकर, डॉ. भरत केळकर, डॉ. मंदार वैद्य, डॉ. अनील थत्ते, डॉ. लता पाटणकर, डॉ. बापये, डॉ. प्रकाश व डॉ. सौ. ललिता



जोशी, डॉ. बसंत गाडगीळ, डॉ. राजीव गाडगीळ, डॉ. सुभाष साने, डॉ. शरद गाडगीळ यांच्यासारखी अनेक सेवाभावी व कार्यतत्पर डॉक्टर मंडळी नाशिककरांच्या आरोग्याची काळजी वाहत आहेत. चित्तपावन डॉक्टर नाही अशी वैद्यक क्षेत्रातील एकही शाखा नाही, हे चित्तपावन समाजाला निश्चितच भूषणावह आहे. एकेकाळी नाशिक नगरपालिकेचे अध्यक्षपद केतकर, वाड यांच्या सारख्या मान्यवर चित्तपावनांनी भूषवले होते असा इतिहास आहे. ज्यावेळी नगरपालिकेत महिला निवडून जाणे कठीण होते त्याकाळात लीलाताई रहाळकर अनेक वर्षे नगरपालिकेवर निवडून जात होत्या. डॉ. वि. म. गोगटे कुणाकडेही मत मागायला न जाता केवळ एका पोस्ट कार्डाच्या प्रचारावर अनेकवर्षे नगरपालिकेवर निवडून गेले होते. राजकारण हा अधिक धकाधकीचा विषय झाल्यानंतरही बंडोपंत जोशी, विजय साने यांनी ही परंपरा पुढे चालविली. हेमंतराव टकले यांनी थेट विधानपरिषदेत प्रवेश करून कर्तृत्वाने एका नव्या व महत्त्वाच्या दालनात प्रवेश केला आहे. नाशिक नगरपालिकेचे मुख्याधिकारी म्हणून बऱ्याच वर्षांपूर्वी कै. बापूसाहेब मोडक व नंतरच्या काळात कै. काळे काम करीत होते. आरोग्याधिकारी म्हणून बापूसाहेब थत्ते यांनी अनेक वर्षे काम पाहिले होते. नानासाहेब ओक महापालिकेचे उपायुक्त होते. आजही महापालिकेच्या नियोजनाच्या कामात मोहन रानडे महत्वाची भूमिका बजावत आहेत. नाशिकच्या समाजजीवनाच्या विभिन्न क्षेत्रांमध्ये चित्तपावनांचे योगदान खूप मोठे आहे. नाशिकला साहित्याची समृद्ध परंपरा आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या प्रतिभेचे सुरुवातीचे अविष्कार नाशकातच झाले. ना. वा. टिळक, लक्ष्मीबाई टिळक (जरी धर्म बदलला तरी मूळचे) नाशिकमधले चित्तपावनच. साहित्याची ही परंपरा पुढे प्रा. रा. भा. पाटणकर, प्रा. योगेश्वर अभ्यंकर यांनी चालविली. शिक्षणक्षेत्रात मामा पाटणकर, प्राचार्य सोहोनी, प्राचार्य ओक, नानासाहेब अभ्यंकर, भाटेमास्तर, सोमणमास्तर, ड्रॉईंगशिक्षक फडके, म. श्री. मराठे, घैसास, आगाशे, ब. चिं. सहस्रबुद्धे, पु. रा. बैद्य, श्री. रामभाऊ रानडे, त्र. बा. घारपुरे, प्रा. दाबके, प्रा. लेले, प्रा. काणे, प्रा. शारंगपाणी ही मान्यवर नावे आहेत. यातील प्रत्येकाने स्वतःचा एक वेगळा ठसा शिक्षणक्षेत्रात उमटवला आहे. आजही अनेक नामांकित व सेवाभावी शिक्षक व्रतस्थपणाने शिक्षणक्षेत्रात काम करीत आहेत. भारतातल्या चित्रपट सृष्टीची सुरुवातच मुळी नाशकात आणि एका चित्तपावनाने केलेली आहे. दादासाहेब फाळके यांचचे नाव आजही भारतातल्या प्रत्येक चित्रपटप्रेमी रसिक अतिशय आदराने घेतो. नाट्यक्षेत्रात वसंत पेठे, बाळ भाटे, सुमन माटे, भगवान खाडिलकर या जुन्या नावांबरोबरच उपेंद्र दाते, सदानंद व हेमा जोशी, सध्या दूरदर्शनच्या मालिकेत गाजणारी नेहा जोशी, गोखले, चित्रपटात आपला ठसा उमटवणारी अनिता दाते ही नावे ठळकपणाने सांगता येतील. संगीत क्षेत्रात विष्णू दिगंबर पलुस्कर हे नाव एखाद्या हिमालयासारखे उत्तुंग झालेले आहे. पलुस्करांचे वास्तव्य नाशकात अनेक वर्षे होते. काळ्यारामासमोरचा त्यांचा आश्रम आजही त्यांच्या आठवणी जागवतो आहे. पुढे त्यांचीच परंपरा गंगाबाई पलूस्कर यांनी बोहोरपट्टीतल्या संगीत क्लासमध्ये अनेक वर्षे चालवली. नंतरही श्री. गोविंदराव पलुस्कर यांनी संगीतक्षेत्रात महत्त्वाची कामगिरी केली आहे. गेली एकशेतीस वर्षे दर आठवड्याला गुरुवार मैफिलीची संगीताची अखंड परंपरा निर्माण करण्यात डोंगरे, विनायकराव परांजपे, बाबूराव फडके, मोहन लले, शशिकांत मुजुमदार, शशिकला आणि मधुकाका वैशंपायन, ताराबाई वैद्य अशी कितीतरी नावे सहज आठवतील. चित्रकला आणि मूर्तीकलेच्या क्षेत्रात राम थत्ते, लोंढे, संजय देवधर, सुनिल धोपावकर यांची कामगिरी सर्वांना माहितच आहे.वसंत व्याख्यानमाला, निराधार व अनाथांच्या संगोपनासाठी स्वतःची सर्व शक्ती.. प्रसंगी घरातले सोने नाणे खर्ची पडले तरी त्याचा फारसा विचार न करता काम करणारे अण्णाशास्त्री दातार, पददलित व भटक्या जमातीमधल्या महिलांना एकत्र करून त्यांच्या शोषणमुक्तीसाठी सारे जीवन खर्च करणाऱ्या ताई रानडे, मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी प्रसंगी त्यांना स्वतःच्या घरी वास्तव्यासाठी ठेऊन घेणारे काका गद्रे, मतीमंदांच्या शिक्षणासाठी आणि पुर्नवसनासाठी प्रबोधिनी विद्यालय व कार्यशाळेची स्थापना करणाऱ्या सौ. रजनीताई लिमये हे सगळेजण चित्तपावन होते हे मुद्दाम नमूद केले पाहिजे. अगदी जात-पात न मानणाऱ्या समाजवादी चळवळीचे नाशकातले अध्वर्यू होते ते माधवराव लिमये, विठ्ठलराव व कुसुमताई पटवर्धन हे चित्तपावनच. सर्कल - विकास थिएटरचे मालक रावसाहेब ओक हे देखील चित्रपट प्रदर्शन आणि गावातल्या समाजवादी चळवळीतील महत्त्वाचे व्यक्तीमत्व होते. ह्या साऱ्यांनी स्थापन केलेले रचना



विद्यालय नाशकात महत्वाचे मानले जाते. सार्वजनिक बाचनालय, पेठे विद्यालय, ना.शि.प्र. मंडळी, गो. ए. सोसायटी यासारख्या नाशकातल्या अनेक मान्यवर संस्था व संघटनांमध्ये चित्तपावन कार्यकर्त्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. भरद्वाज रहाळकर, सूर्यकांत रहाळकर, डॉ. दिलीप बाड, प्रा. दिलीप फडके आदि कार्यकर्त्यांनी समाजजीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये आपल्या कामाचा ठसा उमटवला आहे. न्यू एज्युकेशन संस्थेची धुरा बाबासाहेब आणि प्रकाश वैशंपायन यांच्या समर्थ हातात आहे. व्यापार हे खरे तर ब्राह्मणांचे क्षेत्र नाही. त्यातही स्पष्ट वक्ता मानल्या जाणाऱ्या फटकळ चित्तपावनांना ह्या क्षेत्रात काही काम करता येईल असे सामान्यतः न पटणारे. पण नाशकात अनेक पिढ्या ज्यांच्याकडून विश्वासाने सोन्याचांदीचे दागिने खरेदी करीत आल्या आहेत ते टकले बंधू आणि पी. आर. वैशंपायन हे व्यापार क्षेत्रातील दोन ठळक मानदंड मानावे लागतील. आपल्या सचोटीने त्यांनी आपला लौकिक दूरवर नेला आहे. का. पु. वैशंपायन यांनी अखिल मध्यवर्ती ब्राह्मण संघाची उभारणी करण्यासाठी खूप परिश्रम घेतले होते हे मुद्दाम नमूद केले पाहिजे. याच सोन्याचांदीच्या व्यवसायात मुंबईला आपला प्रचंड दबदबा निर्माण करणारे पेठे बंधूही मूळचे नाशकातलेच होते. न्यू अँड सेकंड हँड बुक डेपो ही जोशी कुटुंबियांची संस्था पुस्तकांच्या क्षेत्राशिवाय इतरही खूप महत्त्वाच्या व्यावसायिक कार्यात मोठे काम करीत आहे. आपल्या नावाच्या मोडी लिपीतील दुकानाच्या पाटीमुळे कित्येक दशके वैशिष्ट्य ठरलेले काचवाले वाटवे, भानू ब्रदर्स, आठवले - लेले, पादत्राणे बनवण्यात स्वतःचे नाव प्रस्थापित करणारे मामा पटवर्धन, बुकबाईंडिंग आणि स्टेशनरी विक्रीचे काम नाशकात सुरु करणारे रघुकाका गाडगीळ, तपकीरवाले साने, सोडावॉटर आणि सायकल विक्रीच्या कामाची सुरूवात करणारे रहाळकर, चहाचे विक्रेते विद्वंस व लवाटे ही नावे आजच्या नाशिककरांना परिचित आहेत. बांधकाम हे असेच एक महत्त्वाचे क्षेत्र. नव्या नाशिकची उभारणी करण्याचे सामर्थ्य ह्या क्षेत्रामध्ये आहे. जेव्हा नाशिकची उभारणी होऊ लागली होती तेव्हापासून अनेक चित्तपावन व्यावसायिक व वास्तूशिल्पकारांनी त्यामध्ये महत्त्वपूर्ण कामगिरी केली होती. मामा जोगळेकर हे तर नाशिकमधल्या जमिनींचा चालताबोलता ज्ञानकोषच. पाळण्यातल्या तान्ह्या मुलाला पाठवा, त्याच्या हाती पैसे पाठवा, कोणतीही फसवणूक न होता, चोख आणि पूर्णतः भरवशाच्या व्यवहारांची शंभर... नव्हे एकशेदहा टक्के हमी असा मामांचा लौकिक. सच्चिदानंद पाटणकर, विसूभाऊ पाटणकर, दत्तोपंत (भाऊसाहेब) परांजपे, मेहेंदळे, पंडितराव व राजाभाऊ वैशंपायन, आर्किटेक्ट विजय काळे, साठे बिल्डर्स, अभिजीत थत्ते अशा अनेकांनी ह्या क्षेत्रात चित्तपावनांचे नाव अग्रक्रमाने पुढे आणलेले आहे. नाशिकचे स्वरूप पालटले आणि मंत्रभूमी नाशिक उद्योगभूमीमध्ये विकसित झाले. ह्या नवीन अवतारातदेखील अनेक चित्तपावन उद्योजकांनी आपला वाटा उचलला. विवेक गोगटे, देवेंद्र बापट, मधुकर आणि अरविंद बापट, वसंतराव मराठे, विवेक आठवले, अशोकराव राजवाडे, मुकुंदराव खाडिलकर, रिंग प्लस ॲकाचे करंदीकर, महेश दाबक, अभिजीत दाबके, दिलीप व संजय मोडक, प्लंबिंगच्या व्यवसायात नाव मिळविणारे गांगल, पोल्ट्रीवाले फडके, अमोल एन्टरप्राईजेसचे संजय देवधर, दूधवाले खरे, केटरिंग व्यवसायाची नाशकात सुरुवात करणारे राजाभाऊ गानू व टी. पी. रानडे या व अशा अनेकांनी उद्योगनगरी नाशकात स्वतःचे वेगळे असे स्थान निर्माण केलेले आहे. नाशिक हे मूळचे तीर्थक्षेत्राचे गाव. इथे वैदिक परंपरादेखील बरीच मोठी व दीर्घ काळची. दाजी मराठे, गणूनाना साने, दाते शास्त्री, लेले गुरुजी, राजाभाऊ साने यांची परंपरा आजही विनायकराव साने, मकरंद मराठे, सुनिल जोशी, संजय दामले, महेश वझे, वैभव जोगळेकर आदि वैदिक ब्राह्मण समर्थपणाने चालवीत आहेत.

कोणताही समाज हा कधीच एकटा नसतो. एका व्यापक समाजरचनेतील तो एक घटक असतो. समाजात वावरतांना तो व्यापक समाजजीवनाच्या जडणघडणीत किती व कोणते स्थान मिळवितो, कोणती कामगिरी करतो यावर त्या समाजाचे महत्त्व ठरायला हवे. नाशिकमधला चित्तपावन समाज जरी बाहेरून येऊन इथे स्थायिक झालेला असला, तरी गेल्या दीड दोनशे वर्षांमध्ये नाशिकच्या समाजजीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये ह्या समाजाने स्वतःची विशेष ओळख निर्माण केलेली आहे. एकूणच संख्येने लहान व छोटा असला तरी नाशिकच्या जडणघडणीत महत्त्वाची कामगिरी करणारा समाज म्हणून चित्तपावनांना ओळखले जाईल हे निश्चित.





आठवणी दाटतात....

- प्र. शं. (बंडोपंत) जोशी
विश्वस्त, चित्तपावन ब्राह्मण संघ

आम्ही उमामहेश्वर गल्लीमध्येच राहत होतो. त्यावेळी लहानपण ४ थी पर्यंतचे गल्लीत गेले. तेव्हाची गल्ली म्हणजे ह्या टोकापासुन ते त्या टोकापर्यंत कोणकोण राहत आहे, कोणाकडे पाहुणे आले आहेत हे गल्लीभर समजायचे. तेव्हा हल्लीचा चित्तपावन संघ '' गवळी वाडा'' होता. मोठी मोठी ४ - ५ झाडे होती. आम्ही नागपंचमीला झोका खेळायला तेथे जात असू. कालांतराने ती जागा चित्तपावन संघाने घेतली. त्यावेळेस अण्णासाहेब दातार, वामनराव दाते, हरिभाऊ केळकर ही मंडळी कार्यकारिणीवर होती. माझ्या आठवणी प्रमाणे तेव्हा राजाभाऊ जाजु व्यवस्थापक म्हणून काम बघत होते. त्यांची राहण्याची व्यवस्था तिथेच होती. त्यांनी चित्तपावनचे काम नोकरी म्हणून न करता एक मिशन म्हणून केले. स्वतः हिंदुत्वनिष्ठ असल्यामुळे हिंदुत्वाला पोषक असेल अशा सर्व गोष्टींना त्यांचा हातभार असे.

त्यानंतर ७० साली आम्ही म्हणजे मी, दादासाहेब काळे, पोळकर, भरद्वाज रहाळकर इ. निवडणूक लढविण्याचे ठरविले. बहुमतांनी आमचे सर्व पॅनल निवडून आले.

त्यावेळेस नाशिक खूपच लहान होते. त्यामुळे चित्तपावन संघ एक चांगले कार्यालय म्हणून प्रसिध्द होते. आम्ही सर्वांनी तिथे काम करण्यास सुरूवात केल्यानंतर त्यात आमुलाग्र बदल करण्याचे ठरविले.

दरवर्षी थोडाथोडा बदल करण्यापेक्षा हे सर्व पाडून नवीनच इमारत करावी, जी सर्व सुखसोईंनी सुसज्ज असेल.

अनेकजणांनी शंका उपस्थित केली कि आपल्याला कर्ज कोण देणार? आणि दिले तरी आपण ते कसे फेडणार? मी सगळ्यांना नीट समजावून सांगितले की आपण २ - ३ वर्षामध्ये सर्व कर्जाची फेड करू, काळजी करू नका. काहीजणांना आम्ही आवाहन केले की त्यांनी संस्थेसाठी २ -३ वर्षांकरिता बिनव्याजी कर्ज द्यावे. त्याला अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाला, आणि लोकांनी चांगले सहकार्य दिले.

त्यानंतर २ -३ वर्षातच सर्व घेतलेले पैसे आम्ही परत केले. त्या आधी संस्थेची सांपत्तिक स्थिती नाजूक होती. भानू नावाचे एक सद्‌गृहस्थ संस्थेसाठी फिरून सभासद बनवत होते, व देणग्याही गोळा करत होते. त्यानंतर आम्ही वास्तु चांगली झाल्यानंतर सभासदांना समारंभासाठी २५ % सवलत देण्याचे जाहीर केले. त्यामुळे आपोआपच संस्थेच्या निधीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. त्यानंतर काकासाहेब गद्रे यांनी मोठ्या मनाने त्यांचा राहता बंगला संस्थेला दिला.

आजचे गद्रे मंगल कार्यालय म्हणजे हेच. त्यामध्ये अनेक सुधारणा करून एक आदर्श मंगल कार्यालय तिथे सुसज्ज झाले. पूर्वी केटरिंग ही पध्दत नव्हती. आचारी बोलवायचे व स्वयंपाक करवून घ्यायचा. ते साधारणपणे दक्षिणेकडचे असायचे ते येतांनाच बरोबर झारे घेऊन यायचे आणि साधारण बेत वरण भात, मसालेभात, जिलबी, लाडू, भजी इ. असायचा. त्यानंतर पुरी, वेगवेगळ्या प्रकारच्या भाज्या, सूप असे पदार्थ करणं सूरू झाले.

त्याकाळी जेवायला सुध्दा पाटावरतीच लोक बसत असत, आणि हळुहळु पाटावरती बसण्याची पध्दती बंद झाली. आता तर नवीन लोकांना पाटावरती बसून पंगती होत होत्या ह्याचे आश्चर्य वाटेल.

त्यानंतर पैसे बऱ्यापैकी आल्यावर आम्ही एक पुस्तक पेढी चालू केली. गरजू विद्यार्थ्यांना शालेय पुस्तके द्यायची व त्यांनी वर्ष संपल्यावर संस्थेला परत करायची. त्याचबरोबर जे गरजू चित्तपावन असतील, जे गरीब आहे त्यांना आर्थिक मदतही द्यायची.

मला चांगले आठवत आहे की ९-९-१९६९ ला गोदावरीला महापूर आला होता. चित्तपावन संघामध्ये पाणी शिरले होते. आम्ही दुसऱ्या मजल्यावरती स्वयंपाक बनविला व पूर पीडितांना भोजनाची व्यवस्था करून दिली. चित्तपावन हे संख्येने कमी असल्यामुळे आणि पूर्वी व्यवसाय नसल्यामुळे त्यांना व्यवसायाची माहिती नव्हती. तेव्हा त्यांना व्यवसाय मार्गदर्शनासाठी चांगले वक्ते बोलावून उत्तम मार्गदर्शन दिले. त्याचा फायदा अनेकांनी घेतला. उच्चशिक्षणासाठी व परदेशीय शिक्षणासाठी सुध्दा आम्ही मदत केली. आणि आज चित्तपावन संस्था नावारूपास आली आहे.



नजिकच्या काळात नाशिकच्या आजूबाजूस १० - १५ कि. मी वरती जमीन घेऊन तिथे वृध्दाश्रमाची व वसतीगृहाची व्यवस्था करावी असा मानस आहे.आज साधारणपणे प्रत्येक घरामधला मुलगा परदेशात असतो आणि त्यामुळे वृध्दापकाळी आई - वडील येथे एकटेच राहतात, तेव्हा अशा सर्वांची व्यवस्था जेवणापासून खेळापर्यंत करता येऊ शकते. त्याच बरोबर वैद्यकीय व्यवस्था, एखादी ॲम्बूलन्स घेण्याचा आमचा मानस आहे.

आता अनेक तरूण कार्यकर्ते पुढे येऊन विजय सार्नेच्या मार्गदर्शनाखाली अतिशय चांगले काम करीत आहेत.

मला असे वाटते की, नजिकच्या भविष्यकाळात संस्था अनेक प्रकारे चांगले कार्यक्रम राबवू शकेल. उदा. आपल्या घटनेमध्ये लिहिले आहे की हिंदूसाठी अनेक विविध कार्यक्रम करणे, त्या अनुषंगाने चांगले व्याख्याने बोलावून आपण हा उपक्रम राबवू शकतो.

आपल्यातल्या मोठमोठ्या उद्योजकांना बोलावून त्यांचे मार्गदर्शन आपल्या तरूण पिढीला देवून आपला तरूण नोकरीकडे न वळता स्वतंत्र व्यवसाय करू शकेल. त्याचबरोबर आयटी क्षेत्रात त्याला व्यवस्थित मार्गदर्शन दिले तर तो त्या क्षेत्रामध्ये चांगली प्रगती करू शकेल.

त्याचबरोबर गिर्यारोहणासारखे कॅम्पस् आयोजित करून तरुणांमध्ये आत्मिक बळ वाढविणे ही काळाची गरज आहे. पूर्वीचे जवळजवळ सर्व क्रांतिकारक हे चित्तपावन होते. ज्या कोकणातून आपण आलो ती परशुरामाची भूमी आहे. परशुरामाचे आपण वंशज आहोत. ज्यांनी शापादपि, शरादपि, असे आम्ही आहोत हे सर्व जगाला दाखवून दिले.

मला असे वाटते की, पुढे येणारा काळ हा बुध्दिवंतांचा, साहसी तरूणांचा असा आहे. आपण सर्व चित्तपावनांनी मिळून त्यासाठी प्रयत्न करू या. आज अशी फॅशन झाली आहे की, आम्ही नास्तिक आहोत. म्हणून पुरोगामी आहोत, परंतु आज आपणास असे दाखवून द्यायचे आहे की आम्ही आस्तिक आहोत, व पुरोगामीही आहोत. आणि ह्या आधारे आपणच सर्व चित्तपावनांना पुढे जायचे आहे. म्हणून एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ.





दि नासिक मर्चन्टस् को-ऑप. बँक लि., नाशिक

(मल्टी स्टेट शेड्यूल्ड बँक)

प्रशासकीय कार्यालय : ए/१६, बाबुभाई राठी चौक, नेताजी सुभाषचंद्र बोस मार्ग,
औद्योगिक वसाहत, सातपूर, नाशिक – ४२२ ००७.
रिझर्व्ह बँक लायसन्स नंबर : एम. एच./९७८/पी. फॅक्स : २३५३५८१, फोन : २३०८२०० ते २३०८२०३

- ठेवीवर सर्वाधिक व्याज
- तत्पर सेवा - आपुलकीची वागणूक
- सेफ डिपॉझीट लॉकर्सची सोय
- सर्वसामान्यांची बँक
- सर्वांना सोईस्कर कामाच्या वेळा
- सर्व ठेवी डिपॉझीट इन्शुरन्स योजनेखाली सुरक्षित

वीज बील भरणा केंद्र : टिळकवाडी, गंगापूर रोड, सिडको व पवननगर शाखा

शाखा विस्तार – ४२ शाखा

नाशिक महानगरपालिका क्षेत्रात १६ व ग्रामीण परिसरात १८ शाखा,
तसेच जालना, पुणे, जळगांव, अहमदनगर, दादर-मुंबई, श्रीरामपूर २ शाखा आणि राज्याबाहेर हैद्राबाद

नव्याने लवकरच कार्यान्वीत होणारी शाखा कार्यालये

सुरत (गुजरात), जुने नाशिक, मुंबई नाका व अशोक मार्ग (नाशिक)

सांपत्तिक परिस्थिती

ठेवी रुपये – ५४४ कोटी ०२ लाख
कर्ज रुपये – २५७ कोटी ५५ लाख
सभासद संख्या – १३७५८५
गुंतवणूक रुपये ४७९ कोटी ३३ लाख
भागभांडवल रुपये १६ कोटी ९१ लाख

ऑडिट वर्ग 'अ'

श्री. कांतीलाल भागचंद जैन
अध्यक्ष

श्री. प्रकाश मोतीलाल दायमा
उपाध्यक्ष

श्री. हरिभाऊ बाबुराव लासुरे
जनसंपर्क संचालक


संचालक

श्री. वसंत निवृत्ती गिते	श्री. गजानन दामोदर शेलार	श्री. हुकूमचंद चुनीलाल बागमार
श्री. हेमंत (बंडोपंत)जगन्नाथ आमले	श्री. सुरेश बाबुलाल नागशेटीया	श्री. सोहनलाल मोहनलाल भंडारी
श्री. सुभाष चंपालाल नहार	श्री. हेमंत हरिभाऊ धात्रक	श्री. शिवदास मोहनलाल डागा (सी.ए.)
श्री. सुनिल मोतीलाल बुब	श्री. नरंद्र हिरामण पवार	श्री. विजय राजाराम साने
श्री. प्रभाकर शंकर तथा बंडोपंत जोशी	श्री. शिवनाथ राधुजी कडभाने	श्री. सुधाकर भालचंद्र कोठावदे
सौ. शोभा जयप्रकाश छाजेड	सौ. रजनी जयप्रकाश जातेगांवकर	श्री. मोहनलाल जसराज कुमट (तज्ञ संचालक)

श्री. जगदीश दत्तात्र मांडगे – मुख्य कार्यकारी अधिकारी

धनवर्धिनी व टिळकवाडी शाखा येथे परदेशस्थ भारतीयांच्या ठेवी स्वीकारण्याची सोय उपलब्ध.





पहिले इतिवृत्त १९३३

(आपल्या संस्थेची स्थापना करण्यासाठी रविवार दि. २७ ऑगस्ट १९३३ रोजी अेक सभा घेतली गेली. नाशिकमधील त्यावेळचे शंभर मान्यवर त्या सभेस उपस्थित होते. आपल्या सुदैवाने त्या सभेपासून आजपर्यंत जालेल्या सगळ्या सर्वसाधारण सभांची इतिवृत्ते आपल्याकडे जपून ठेवलेली आहेत. सभासदांच्या माहितीसाठी १९३३ सालच्या पहिल्या सभेचे इतिवृत्त देत आहोत. - संपादक)

रविवार ता. २७ माहे ऑगस्ट सन १९३३ रोजी लोकसत्ता हॉलमध्ये नाशिक जिल्हा चित्तपावन ब्राह्मण संघ स्थापन करण्यात आला त्या सभेचे प्रोसिडिंग. हजर सभासद १०० त्यांची नावे.

१) वे. शा. सं. रा. रा. कृष्णशास्त्री देवधर वैद्य
२) रा. रा. रामचंद्र सदाशिव आठवले
३) निळकंठ पांडुरंग पाटणकर
४) काशिनाथ सखाराम दांडेकर
५) दत्तात्रय नारायण पाटणकर
६) अनंत रघुनाथ घैसास
७) सखाराम काशिनाथ आगाशे
८) त्रिंबक जनार्दन जोशी
९) भास्कर गोपाळ सहस्त्रबुध्दे
१०) गणेश भास्कर गानू
११) केशव गोपाळ बाम
१२) विष्णू गदाधर गानू
१३) लक्ष्मण पांडुरंग सोमण
१४) त्रिंबक चिंतामण घैसास
१५) बापू रामचंद्र पेंडसे
१६) अनंत रामचंद्र कानिटकर
१७) गोविंद नरहर नातू
१८) व्यंकटेश सदाशिव बापट
१९) शंकर लक्ष्मण ओक
२०) शिवराम गोपाळ वैद्य
२१) मुरलीधर गणेश चितळे
२२) विष्णु वासुदेव केतकर
२३) विष्णु गणेश केळकर
२४) शंकर बळवंत लेले
२५) आर. बी. गोगटे
२६) चिंतामण पांडुरंग लोंढे
२७) पुरूषोत्तम रामचंद्र वैशंपायन
२८) महादेव बळवंत गाडगीळ
२९) गोविंद सदाशिव आठवले
३०) वामन कृष्ण दुगल
३१) विष्णु रामकृष्ण जोशी
३२) दत्तात्रय पुरूषोत्तम साने
३३) शंकर वामन नगरकर
३४) रघुनाथ जगन्नाथ पेंडसे
३५) गोविंद रामकृष्ण केळकर
३६) विश्वनाथ विष्णु साठे
३७) अनंत रघुनाथ रहाळकर
३८) मोहिनीराज गोपाळ मनोहर
३९) शंकर दिनकर अभ्यंकर
४०) निळकंठ विनायक घैसास
४१) शंकर विनायक लेले
४२) नारायण बाळकृष्ण रानडे
४३) कृष्णाजी गोविंद पटवर्धन
४४) पुरूषोत्तम दत्तात्रय घाणेकर
४५) आत्माराम हरी वैद्य
४६) द. वा. साठे
४७) शंकर गंगाधर कोपरकर
४८) विनायक माधवराव जोगळेकर
४९) नारायण माधवराव जोगळेकर
५०) यशवंत विठ्ठल गद्रे



५१) विश्वनाथ महादेव धोपावकर
५२) महादेव अनंत जोशी
५३) दिनकर कृष्ण देवधर
५४) रामचंद्र गंगाधर काळे
५५) विनायक भालचंद्र पटवर्धन
५६) प्रभाकर दामोदर रानडे
५७) दत्तात्रय बळवंत परांजपे
५८) अनंत गुंडो गोखले
५९) गोविंद वामन घारपुरे
६०) शंकर नारायण रानडे
६१) सदाशिव नारायण रानडे
६२) कृष्णाजी बळवंत महाबळ
६३) कृ. रा. भागवत
६४) लक्ष्मण हरी घारपुरे
६५) सखाराम वामन जोशी
६६) कृष्णाजी गोविंद गाडगीळ
६७) गणेश प्रभाकर दिक्षीत
६८) सदाशिव गंगाधर जोशी
६९) केशव रामचंद्र वैशंपायन
७०) गोविंद रघुनाथ दातीर
७१) पुरूषोत्तम नारायण खरे
७२) दिनकर विठ्ठल गोखले
७३) गोविंद दामोदर आगरकर
७४) कृष्णाजी नारायण साठे
७५) शंकर हरी थत्ते
७६) कृष्णाजी पांडुरंग गोडबोले
७७) मनोहर रामचंद्र सहस्रबुद्धे
७८) रामचंद्र कृष्ण गोगटे
७९) गणेश काशिनाथ बापट
८०) वामन मोरेश्वर दाते
८१) श्रीकृष्ण श्रीधर फडके
८२) वामन केशव दातार
८३) सखाराम अनंत लेले
८४) नरहरी नारायण घैसास
८५) वामन कृष्ण सहस्रबुध्दे
८६) लक्ष्मण दिनकर भाटे
८७) चिंतामण निळकंठ पाटणकर
८८) सदाशिव गणेश जोशी
८९) श्रीधर रघुनाथ वर्तक
९०) दत्तात्रय बाळकृष्ण टकले
९१) दत्तात्रय रामचंद्र लिमये
९२) विनायक हरी अभ्यंकर
९३) रघुनाथ दामोदर फणशे
९४) काशिनाथ महादेव गाडगीळ
९५) बल्लाळ विष्णु मेहेंदळे
९६) रघुनाथ गणेश वाटवे
९७) श्रीधर महादेव धोपावकर
९८) त्रिंबक हरी गोगटे
९९) त्र्यंबक अनंत शारंगपाणी
१००) वामन कृष्ण टकले

सभेचे सुरूवातीस रा. रा. पाटणकर वकील यांनी श्री. कृष्णशास्त्री देवधर यांचे नांव अध्यक्षपदाकरिता सुचविले या सुचनेस श्री. रामचंद्र सदाशिव आठवले यांनी अनुमोदन दिले.

अध्यक्ष स्थानापन्न झाल्यावर सभेच्या कामास सुरुवात झाली.

प्रथम रा. रा. दत्तात्रय बळवंत परांजपे यांनी ता. २२-७-३३ व ता. ६-८-३३ रोजी झालेल्या पूर्वसभांचे वृत्तांत वाचून दाखविले. व रा. रा. श्रीधर गोपाळ खरे वकील सटाणा, रा. व. रामचंद्र गोविंद काशीकर वकील मालेगाव, डॉ. विष्णु महादेव भट, येवले, रा. रा. माधवराव नारायण जोगळेकर त्रिंबक, रा. रा. लक्ष्मण नारायण गोखले इगतपुरी व रा. रा. वामन चिंतामणशास्त्री थत्ते नांदगाव यांचे संघस्थापनेस सहानुभुतीपर संदेश वाचून दाखविले.

१) नंतर संघाचे नांव नासिक जिल्हा चित्तपावन ब्राह्मण संघ असावे ही सूचना अध्यक्ष मांडतात. सूचना सर्वानुमते मंजूर

२) संघाचे उद्देश काय असावे या विषयीचे चर्चेस सुरुवात करण्यांत आली. बराच वेळ चर्चा झाल्यावर खालील उद्देशाबद्दल अध्यक्षांकडून ठराव मांडण्यात आला. ''नासिक जिल्ह्यातील चित्तपावन ब्राह्मण मंडळींचा एकमेकांशी परिचय होऊन त्यांच्यामध्ये दळणवळण व संघटन घडून यावे, तसेच आपल्या समाजाची सर्वांगीण



उन्नती व्हावी व प्रसंगविशेषी एकमेकांचे उपोयगी पडावे या उद्देशाने हा संघ स्थापन करण्यात आला आहे.'' संस्थेचे कार्य दुसऱ्या कोणत्याही वर्गांशी अगर ज्ञातींशी न करिता, चित्तपावन ब्राह्मण समाजाचे धार्मिक, शैक्षणिक, शारीरिक व आर्थिक हित जेणेकरून होईल एवढ्यापुरते मर्यादित राहील. सदर संघात रूढी विरूध्द सामाजिक प्रश्न सुध्दा विचारांत घेतला जाणार नाही. तसेच संस्थेचा राजकारणाशी अगर तत्सम कोणत्याही चळवळीशी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रितीने संबंध ठेवण्यात येणार नाही. फक्त समाजाचे वाढीकडे व गरजांकडेच लक्ष पुरविले जाईल.'' हा ठराव एकमताने मंजूर.

नंतर कार्याची दिशा तूर्त कशी असावी याविषयी खालील ठराव अध्यक्षांकडून मांडण्यात आला.

वरील उद्देश साधण्याकरिता सध्या पुढील दिशांनी प्रयत्न करण्यात येतील.

अ) शिक्षण घेण्याची ऐपत नसेल अशा होतकरू चित्तपावन ज्ञातीतील विद्यार्थ्यांस हरएक प्रकारची शक्य ती मदत करणे.

आ) संकटसमयी ज्ञातिबांधवांस हरएक प्रकारची शक्य ती मदत करणे.

इ) ज्ञातिसंबंधी सामान्य हिताचे एक केंद्र स्थापणे व ज्ञातिबंधूंच्या कुटुंबाची जंत्री करून त्याविषयीची माहिती संकलित करणे.

ठराव सर्वामुमते मंजूर.

मासिक वर्गणीचे दर काय असावेत याबद्दल खालील ठराव अध्यक्षांकडून मांडण्यात आला.

वर्गणीचे मासिक दर खालील प्रमाणे असावेत.

वर्ग १ ला ५ रू.
वर्ग २ रा ३ रू.
वर्ग ३ रा १रू.
वर्ग ४ था ८ आणे
वर्ग ५ वा ४ आणे

या ठरावास रा. वि. ग. नातू यांनी खालील सूचना मांडली.

वर्गणीचे मासिक दर पुढील प्रमाणे असावेत.

१ ला वर्ग ३ रू.
२ रा वर्ग २ रू.
३ रा वर्ग १ रू.
४ था वर्ग ८ आणे
५ वा वर्ग ४ आणे
६ वा वर्ग २ आणे

वरील सूचनेस रा. वि. भा. पटवर्धन वकील यांनी अनुमोदन दिले.

सूचना मतास घालता एकमताने पास करण्यात आली.

५) संघाचे सभासद होऊ इच्छिणारांचे वय काय असावे याबद्दल खालील ठराव अध्यक्षांकडून मांडण्यात आला.

वयाची २१ वर्षे पूर्ण झालेल्या चित्तपावन ब्राह्मण ज्ञातीच्या कोणत्याही स्त्री पुरूषांस या संघाचे उद्देश मान्य असल्यास संघाचा सभासद होता येईल. ठराव सर्वानुमते मंजूर.

६) संघाचे उद्देश साधण्याकरिता नियम करण्यासाठी पुढील गृहस्थांची एक कमेटी अध्यक्षांकडून सुचविण्यात आली. कमिटीने आजपासून दोन महिन्यांचेआंत नियम करून ते संघाचे साधारण सभेपुढे ठेवावे.

कमिटीतील गृहस्थांची नावे.

१) रा. रा. रा. स. आठवले
२) रा. रा. नि. पां. पाटणकर
३) रा. रा. चिं. कृ. गाडगीळ
४) रा. रा. वि. ग. गानू
५) रा. रा. द. रा. लिमये
६) रा. रा. वि. भा. पटवर्धन
७) रा. रा. द. बा. टकले

वरील ठरावात रा. रा. व्हि. जी. गानू यांनी पुढील प्रमाणे उपसूचना जोडली.

नियम कमिटीत खालील गृहस्थ असावे.

१) रा. रा. रा. स. आठवले
२) रा. रा. नि.तां. पाटणकर
३) रा. रा. ल. ह. घारपुरे
४) रा. रा. के. एन्. साठे
५) रा. रा. द.रा. लिमये
६) रा. रा. व्हि. जी.गानु

या सुचनेस मी वि. भा. पटवर्धन यांनी अनुमोदन दिले.



सुचना मतास घालता सर्वानुमते मंजूर.

नियम कमिटीस योग्य वाटल्यास आणखी सभासद नेमता येतील असे ठरले.

७) संघाचे अधिकारी मंडळाचे घटनेविषयी रा. रा. पाटणकर वकील यांनी खालील गृहस्थांची नावे सुचवली.

अध्यक्ष

रा. रा. रामचंद्र सदाशिव आठवले

(बी.ए.) माजी दिवाण सांगली.

उपाध्यक्ष

रा. रा. निळकंठ पांडुरंग पाटणकर

(बी.ए. एल. एल. बी. अॅड)

रा. रा. माधवराव नारायणराव उर्फ बाळासाहेब जोगळेकर (त्रिंबक)

रा. रा. श्रीधर गोपाळ खरे (वकील , सटाणा)

सल्लागार

रा. ब. रामचंद्र गोविंद काशिकर

(बी.ए. एल. एल. बी. वकील, मालेगांव)

डॉ. विष्णु महादेव भट

(बी. ए. एम. बी. बी. एस.,येवले)

रा. रा. चिंतामण कृष्ण गाडगीळ

(बी. ए. एल. एल. बी. वकील)

रा. रा. विष्णु गणेश केळकर (वैद्य)

रा. रा. रावसाहेब ए. जी. गोखले (नाशिकरोड)

चिटणीस व खजिनदार

रा. रा. प्रभाकर दामोदर रानडे

(बी.एस. सी. एल.एल. बी. वकील)

रा. रा. दत्तात्रय बळवंत परांजपे).

कार्यकारी मंडळ

रा. रा. कृष्णशास्त्री देवधर वैद्य (चेअरमन)

रा. वैद्यभूषण वामनशास्त्री दातार

रा. रा. विष्णु गदाधर गानू

रा. रा. लक्ष्मण पांडुरंग सोमण

रा. रा. दत्तात्रय बाळकृष्ण टकले

रा. रा. लक्ष्मण हरी घारपुरे

रा. रा. विनायक भालचंद्र पटवर्धन वकील

सदरचे कार्यकारी मंडळ तात्पुरते नियम तयार झालेवर बोलविण्यात येणाऱ्या जनरल बॉडीने दुसरे कार्यकारी मंडळ निवडायचे आहे.

कायमनिधी १००० रू.जमल्यावर कार्यास सुरवात करावी असे ठरले. त्यावेळी संघास तत्पूर्वी खालील गृहस्थांनी दिलेली आश्वासने जाहीर करण्यात आली.

१) श्री. नि. पा. पाटणकर वकील १०१ रू.

२) श्री. रा. स. आठवले १०१ रू.

३) श्री. कृष्णशास्त्री देवधर वैद्य १०१ रू.

४) श्री. द. रा. लिमये पेन्शनर ५१ रू.

५) श्री. पु. रा. वैशंपायन ५१ रू.

सभेची ठिकाणी खालील प्रमाणे आश्वासने मिळाली.

६) श्री. विष्णु गणेश केळकर वैद्य ५१ रू.

७) श्री. शंकर लक्ष्मण ओक ५१ रू.

८) श्री. लक्ष्मण हरी घारपुरे ५१ रू.

९) श्री. के. एन. साठे (सिक्युरिटी प्रिंटींग) २५ रू.

१०) श्री. यदुनाथ वैजनाथ दाते २५ रू.

११) श्री. रावसाहेब गोखले ए. जी. २५रू.

१२) श्री. बापट इन्स्पेक्टर पो. ऑ. २५रू.

१३) श्री. वामन केशव दातार वैद्य २५ रू.

१४) श्री. दत्तात्रय पुरूषोत्तम साने ११ रू.

१५) श्री. कृष्णाजीपंत गाडगीळ मास्तर ११ रू.

१६) श्री. गोपाळ वैजनाख मनोहर सराफ ११ रू.

१७) श्री. गोविंद नरहर नातु ११ रू.

१८) श्री. रामचंद्र गंगाधर काळे ११ रू.

वरील प्रमाणे आश्वासने जाहीर करण्यात आल्यावर श्री. विष्णुशास्त्री केळकर वैद्य यांनी आजचे सभेस लोकसत्ता हॉल दिल्याबद्दल त्यांचे आभार मानण्यांत आले.

नंतर रा. नि. पां. पाटणकर यांनी आजचे सभेचे अध्यक्षाचे आभार मानले.

सभा संपली असे अध्यक्ष जाहीर करतात.

सही /-

अध्यक्ष प्राथमिक साधारण सभा

(श्री. कृष्णशास्त्री देवधर)



चित्तपावन व्यावसायिक

- अनिरुद्ध अभ्यंकर

आयुष्याच्या कालगणेत काही वर्षे महत्त्वाची म्हणून गणली जातात. व्यक्ती, संस्था, व्यवसाय, वास्तू इ. च्या बाबतीत पंचवीस, पन्नास,पंचाहत्तर व शंभर ही वर्षे अनुक्रमे रौप्य, सुवर्ण, हिरक व अमृत महोत्सवी वर्षे म्हणून साजरी केली जातात. सध्याचे हे वर्ष आपल्या '' चित्तपावन ब्राह्मण संघ'' या संस्थेचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे होत आहे. एखादी संस्था इतकी वर्षे नुसतीच चालणे नव्हे तर प्रगती करणे, नावारूपास येणे, समाजात भारतात अग्रगण्य असणे यासाठी सभासदांचे, कार्यकर्त्यांचे हातभार लागणे, आशिर्वाद मिळणे आवश्यक असते.


पूर्वीच्या समाजाचा विचार असा असायचा की नोकरी करणे यातून सरकारी नोकरी असणं सर्वात चांगले. व्यापार उदीमाकडे आपल्या समाजाचा कल फारसा नसायचा. फारतर वैद्यकी करणे, हिशेबनिसाची (आताचे सी.ए.) कामे करणे, शिक्षकी पेशा असणे असे व्यवसाय असत. पण दुकानदारी करणे फारच कमी. यातूनच असा विचार आला की, किमान ५० किंवा त्याहून अधिक वर्ष (म्हणजेच तीन पिढ्या) एकच व्यवसाय करणारे आपले चित्तपावनीय समाज बांधव असतील का? असल्यास किती असतील? यातूनच काही नावे समोर आली की ज्यांचे विविध व्यवसाय सुरू आहेत. नुसतेच सुरू नाही तर वाढलेले आहेत. कालानुरूप बदल, नाविन्याची जोड मिळालेली आहे. अशांचा थोडक्यात परिचय करून घेवू.

● **जी. के. ब्रदर्स** - नाशिकमधील धार्मिक पुस्तकांचे त्यावेळचे एकमेव दुकान. नावावरून गुजराथी, मारवाड्यांचे वाटणारे, परंतु स्थापन केले (१९२६) कै. श्री. गोविंद कृष्णाजी वझे व त्यांच्या जी. के. च इनिशीयल असणाऱ्या दोन भावडांनी. उत्कृष्ठ शिल्पकार असलेल्या गोविंदराव वझ्यांची ८ ते १० शिल्पकलेवरील पुस्तकेही त्या काळी प्रकाशित झाली. अजूनही जर्मनीत या पुस्तकांवरून अभ्यास केला जातो. नाशिकच्या वसंत




व्याख्यानमालेच्या स्थापनेत गोविंदरावांचा मोठा सहभाग होता. यांची तिसरी पिढीही आता याच व्यवसायात आहे. अशी ८२ वर्षे वाटचाल चाललेल्या जी. के. ब्रदर्सनां संस्थेतर्फे व सभासदांतर्फे हार्दिक शुभेच्छा.

● **मुरलीधर सदाशिव आणि कंपनी** - मेनरोडवर कन्नड मधे पाटीवर नाव असलेले एकमेव दुकान सुरू झाले.



१९३६ साली. सुरवात केली मुरलीधर सदाशिव विद्वंस यांनी. चहा व कॉफी पावडरचे ८ ते १० अस्सल प्रकार उत्तम चवीसह आजही त्यांच्याकडे उपलब्ध आहेत. यामुळेच गिऱ्हाईकांच्या देखिल पिढ्या बांधलेल्या आहेत. सध्या यांचा मुलगा सदर दुकान सांभाळतो.



उत्तम स्टोअर्स - मेनरोडवरच सिंधी व्यावसायिकांच्या गराड्यात असलेले हे एका चित्तपावनाचेच खेळणी व जनरल स्टोअर्स. १९५५ साली श्री. चंद्रकांत यशवंत गोळे यांनी सुरू केले. काळानुरूप कटलरी बरोबरच खेळणी व्यवसाय सुरू केला. अजूनही स्वतःच काऊंटर सांभाळतात.




जोशी बुक डेपो - न्यू अँण्ड सेकंड हॅण्ड बुक डेपो या नावाने श्री. गोपाळ श्रीधर जोशी यांनी हे दुकान सुरू केले. सुरवातीपासूनच विविध पुस्तके, वह्या, स्टेशनरी यांची १९२९ सालापासून विक्री सुरू केली. आता नुसताच मुलगा, नातूच या व्यवसायात आहे असे नाही तर संपूर्ण कुटुंबच म्हणजे जोशी वहिनी व नातसून देखील काऊंटर सांभाळतांना दिसतात. याच दुकानातून अजून दोन दुकानांची सुरुवात एक मुंदडा मार्केटसमोर तर दुसरे होलसेल काऊंटर सारडा सर्कल येथे सुरू केले आहे, व सातपूर येथे श्री. मुद्रणालय हा स्वतःचा प्रेस सुरू करून वह्या, रजिस्टर्स, फाईल्स, क्वेश्चन बँक, विविध शाळांच्या नमुना प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका यांची निर्मिती व विक्री सुरू केली आहे.



एम. जी. वाटवे आणि कंपनी - नेहरू चौकातील मोडी लिपीत पाटी असलेले दुकान १९३३ साली महादेव गणेश वाटवे यांनी सुरू केले. प्रथम फोटो फ्रेम मेकिंगचा व्यवसाय सुरू केला. २/३ सम व्यवसायिक असून सुध्दा लवकरच व्यवसाय नावारूपास आणला. पुर्वीच्या बोरू टाकाच्या काळात सरकारी कामासाठी लागणारी काळ्या शाईची निर्मिती व पुरवठा सुरू केला. काळानुरूप फ्रेम बरोबरच काच अॅल्युमिनियमचा व्यवसाय सुरू केला. यात सरकारी कामे मिळविली. नाशिकरोडच्या प्रेस कॉर्टर, एच.ए.एल. टाऊनशीप व कारखाना, अशोका बिल्डकॉन यांचे काचकाम हे वाटवे बंधुंचेच.



भानू ब्रदर्स - १९४२ साली कै . श्री. शंकर गणेश भानू यांनी पगडबंद गल्लीत आपला व्यवसाय सुरू केला. सुरवातीस टेलरिंग मटेरियल व टेलर असे व्यवसायाचे स्वरूप होते. नंतर एम्ब्रॉयडरी, कटलरी मटेरियल अशी १९६७ साली वाढ करून सध्या आधुनिक असे जर्दोसी, मणी, लटकन, टिकल्या असे मटेरियल ही सुरू केले आहे. १९२२ साली क्राफ्ट मटेरियलसाठी याच गल्लीत दुसरे दुकानही सुरू केले. आज नुसतीच तिसरी पिढीच





नव्हे तर संपूर्ण कुटुंबच काऊंटरवर दिसते. जशी व्यवसायात तिसरी पीढी आहे तसेच ग्राहकांची तिसरी चौथी पिढी तयार झाली आहे. नुसते भानू ब्रदर्स म्हटले तरी चालते, पत्ता सांगावा लागत नाही, अशी नुसते नाशिकच नाही तर संपूर्ण जिल्ह्यात परिस्थिती आहे. नाशिक व जिल्ह्यात यांच्यामार्फत मालाचा पुरवठा केला जातो.

गांगल टिन मेकर - प्लंबर - बोहर पट्टीत असलेले हे छोटे परंतु सर्वदूर किर्ती पसरलेले दुकान १९४० साली भार्गव पुरूषोत्तम गांगल यांनी सुरू केले. बोहोरी लोकांची मक्तेदारी असलेला व्यवसाय सुरू करण्याचे धाडस केले. पत्री पन्हाळी, होमकुंड, दुधाच्या किटल्या इ. बनवण्यात नावलौकिक मिळवला. मुलगा श्रीधर हे प्लंबिंग व्यवसाय आत्मसात करून इंडस्ट्रियल कॉन्ट्रॅक्टर झाले. यांनी सिमेन्स, महिंद्र ॲन्ड महिंद्र, मायको, परफेक्ट सर्कल या सारख्या असंख्या कंपन्यांचे काम करून नावलौकिक कमावला. सध्या झाडू, खराटा यांचे उत्पादन सुरू केले आहे.विजया वहिनी या देखील व्यवसायात असून दुकान सांभाळतात.



वर्तकी तपकीर - १९२६ साली दत्तात्रय पुरूषोत्तम साने यांनी बोहोरपट्टीत तपकीर विक्रीचा व्यवसाय सुरू केला. पुढे मोरावळा, गुलकंद अशा घरगुती पदार्थांची विक्रीही केली. सध्या त्यांची मुलगी श्रीमती नलिनी पावगी या सदर दुकान सांभाळत असून शाडूच्या मातीच्या अष्टवर्गीय, कृष्ण देखावा या उत्तम मूर्ती छाया पहाण्यास मिळाल्या.



पटवर्धन बॉक वेल फुटवेअर्स - चर्मकलेच्या व्यवसायात असलेले कोकणस्थ पटवर्धन बंधू !!! सोमवार पेठेत असलेले स्वस्तिक फुट वेअर या दुकानापासून



व्यवसायास सुरुवात. वकीलवाडी व इंदिरानगर येथे दोन विक्री केंद्रे सुरू केली आहेत. अधिकृत प्रशिक्षण न घेता देखील चप्पल बुटांची निर्मिती सुरू केली. विमान सोलच्या चप्पल बुटांनी प्रसिध्दी मिळवली. ८ ते १० रंगात, ५० डिझाईन्स मध्ये चप्पल बूट उपलब्ध असून, आधुनिकता आणण्यासाठी तिसरी पिढी लेदर टेक्नॉलॉजी व फुटवेअर टेक्नॉलॉजीत प्रशिक्षण घेऊन तयार आहेत. यांच्या नामवंत ग्राहकांमध्ये वि. वा. शिरवाडकर, सदाशिव अमरापूरकर, मोहन वाघ इ. आहेत. ठाणे, डोंबिवली, पुणे इथेही ग्राहक आहेत.

मे. के.एस. शिंत्रे ॲन्ड सन्स् - या नावाची फर्म कृष्णाजी सदाशिव शिंत्रे यांनी सुरू केली. इंजिनिअर्स व कॉन्ट्रॅक्टर असलेली ही फर्म त्या काळी महाराष्ट्रात पहिली बोअरिंग कॉन्ट्रॅक्टर म्हणून नावारूपास आली. यांचे मार्फत





भूगर्भ चाचण्या तसेच सॉईल टेस्टिंग सारखी कामे निष्णातरित्या केली जातात. यांच्या तिसऱ्या पिढीने याच व्यवसायात हातभार उचलून महाराष्ट्रभर तसेच महाराष्ट्राबाहेर आपले पाय रोवण्यास सुरवात केली आहे. महाराष्ट्रातील सर्व धरणे, महत्त्वाचे पूल यावर यांनी काम केले आहे. सर्व सरकारी कामे तसेच ताज ग्रुप ऑफ हॉटेल्स, एच.ए.एल., एन.एम. सी., आय. एस. पी., अशोका बिल्डकॉन, रिलायन्स इंजिनिअरींग, शिर्डी रेल्वे स्टेशन इ. नामवंत यांचे ग्राहक आहेत.

प्रसाद एजन्सीज् - श्री. प्र. शं. तथा बंडोपंत जोशी व जगदिश जोशी यांनी महात्मा गांधी रस्त्यावर सुरुवातीस स्टेशनरी व लोकर व्यवसायास सुरुवात केली. १९६६ साली वितरण व्यवसायात शिरून तरूण भारत या दैनिकाचे वितरण सुरू केले. नंतर याचबरोबर लोकसत्ता, व इंडियन एक्स्प्रेसचे वितरण सुरू केले. सदर व्यवसाय आता देवदत्त जोशी सांभाळत आहे. याच बरोबर लॅन्ड डेव्हलपिंगचा व्यवसाय सुरू केला व लवकरच स्वतःचे भव्य असे प्रसाद मंगल कार्यालय गंगापूर रोड परिसरात सुरू केले.

मे. एस. जी. रहाळकर सायकल व्यापारी- १९३६ साली कै. श्री. सदाशिव गणेश रहाळकर यांनी मे. एस. जी. रहाळकर सायकल व्यापारी या नावाने सायकल दुकानाची मुर्हूतमेढ रोवली. सुरवातीस इंग्लंडहून माल येत असे. काही वर्षानंतर मे. एस.जी. रहाळकर सोडा फॅक्टरी या नावाने सोड्याचे दुकान सुरू केले.

सायकल दुकानात नाशिक शहर, जिल्हा तसेच ठाणे जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा इ. भागातील व्यापारी अनेक वर्ष माल खरेदीस येत असत. चांगल्या प्रतीचा माल, योग्य किंमत व चांगली सेवा या त्रिसूत्रींवर आजपर्यन्त ही सेवा अखंड चालू आहे. रिपेअरिंगचे चांगल्या प्रतीचे काम योग्य मोबदल्यात करून मिळते हा समाजाने दाखवलेला विश्वास त्यांनी प्राणपणाने जपला.

दांडेकर टेलरिंग / टेक्निकल इन्स्टिट्यूट - १९३७ साली कै. ज. पां. दांडेकर यांनी एम. जी. रोडवर गृहिणींना घरकाम करून संसाराला हातभार लागावा यासाठी टेलरिंग इंन्स्टिट्यूट सुरू केले. जवळजवळ तीन / चार पिढ्यांनी यांच्याकडे प्रशिक्षण घेऊन व्यवसाय करून संसार उभारले आहेत. काळानुरूप प्रशिक्षणात बदल करत कॉम्प्युटर डिझायनिंग व फॅशन डिझायनिंगही सुरू केले आहे. याचबरोबर काळाची गरज ओळखून तांत्रिक शिक्षण देणारी संस्था भद्रकाली मंदिरात सुरू केली. तसेच टायपिंग, शॉर्टहॅंड, ब्युटिशियन व कॉम्प्युटर कोर्सेस सुरू करून सध्या एकूण नाशिक शहरात सात शाखांत ज्ञानदानाचे कार्य करत आहे. सर्व वयोगटातील विद्यार्थी, प्रौढ यांच्याकडे प्रशिक्षण घेतात. कारण संस्थेचे ब्रीद वाक्यच 'शिका आणि कमवा, कमवा आणि शिका' असे आहे. यांचेच दांडेकर बंधू नावाचे उषा मशिन वितरणाचे दुकान एम. जी. रोडवर असून इतरही विद्युत उपकरणांची विक्री, देखभाल व दुरुस्ती केली जाते.







पत्रकारीता व कलाक्षेत्रातील चित्तपावनांचे योगदान

- संजय देवधर

कर्तृत्ववान चित्तपावनांनी समाजातील अनेक क्षेत्रामध्ये आपले श्रेष्ठत्व सिध्द केले आहे. बौध्दिक कौशल्य आणि कलागुण यांच्या साहाय्याने पत्रकारिता, विविध ललितकला यामध्ये योगदान दिले आहे. भारतात, राज्यात व स्थानिक पातळीवर समाजाला मिळालेली ही देणगी आहे.

चित्तपावन ही केवळ जमात असण्यापेक्षाही ती समाज घडविणारी एक संस्कृती आहे. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी उभारलेल्या लढ्यात जसे चित्तपावन अग्रभागी होते तसे संगणक युगातही सायबर क्रांतीत चित्तपावन तरूण आघाडीवर आहेत. समाजाला विचार आणि दिशा देणारे पत्रकारितेचे क्षेत्र अंगीकारून संपादन कौशल्याने पुरोगामित्वाचे, आधुनिकतेचे, सुशिक्षित संस्कारांचे व वैचारिक ठामपणाचे धडे लोकमान्य टिळकांपासून अनेकांनी दिल्याचा जाज्वल्य इतिहास आहे.

याच परंपरेत विष्णुशास्त्री चिपळूणकर, शि. म. परांजपे, अच्युत बळवंत कोल्हटकर, हरि अनंत गद्रे, ग. वि. केतकर,पां. वा. गाडगीळ, काकासाहेब लिमये, जयवंतराव टिळक, श्री. पु. भागवत, राम पटवर्धन, यदुनाथ थत्ते, ग. वा. बेहेरे, वसंत काणे, गोपाळराव पटवर्धन, वि. ना. देवधर, द्वारकानाथ लेले, अरविंद गोखले, इंदुताई टिळक, विद्या बाळ यांनी ठसा उमटविला.

नाशिकमध्ये केळकर यांनी लोकसत्ता हे साप्ताहिक सुरू केले व स्थानिक प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य केले. विमादी पटवर्धन, माधवराव लिमये यांनीही पत्रकारिता करून समाजसुधारणा करण्यात हातभार लावला. दैनिक गांवकरी मध्ये १९६३ पासून आजतागायत नरहरी भागवत पत्रकारिता करीत आहेत. वृत्तपत्र क्षेत्राचे ते नाशिकमधील महत्त्वाचे साक्षीदार आहेत. भरद्वाज रहाळकर यांनी तरूण भारत वृत्तपत्राद्वारे पत्रकारिता केली. सौ. वंदना अत्रे (अभ्यंकर), सौ राधिका गोडबोले, पराग वाड, अपर्णा वेलणकर, संजय देवधर, सकाळच्या नेट आवृत्तीचे काम करणारे मंगेश वैशंपायन ही नावे गेल्या दोन तीन दशकांपासून वृत्तपत्र क्षेत्रात आहेत. प्रा. दिलीप फडके, सौ. श्रेयसी रहाळकर, सातत्याने स्तंभलेखन करतात.

साहित्य क्षेत्रातही दिगंबर गाडगीळ, सौ. सरोज म्हसकर, कवी पराग वाड, सुषमा अभ्यंकर, यांनी विपूल लेखन केले आहे. नितीन मुजुमदार यांनी क्रीडापत्रकारिता केली आहे. क्रीडाविषयक छायाचित्रांचा मोठा संग्रह त्यांनी केला आहे. सौ. विनीता परांजपे यांनी वाचकांच्या पत्रव्यवहारावर आधारित मुक्त विद्यापीठातून डॉक्टरेट मिळविली आहे. अॅड. धिरेंद्र पोंक्षे यांनी काही काळ गांवकरीत पत्रकारिता केले. आता ते विविध विषयांवर लेखन करतात.

चित्रकलेच्या क्षेत्रात पेठे हायस्कूलचे कलाशिक्षक प्र. बा. घारपुरे, पुरूषोत्तम इंग्लिश स्कूलचे घारपुरे मास्तर, वैशंपायन मास्तर, फडके मास्तर यांनी विद्यार्थ्यांवर शालेय शिक्षणात चित्रकलेचे संस्कार केले. पुढे नावारुपाला आलेल्या अनेक चित्रकारांच्या प्रारंभीच्या रंगरेषेचे वळण याच शिक्षकांनी लावल्याचा इतिहास आहे. शिल्पकार र. कृ. फडकेंचे पुतणे यशवंत उर्फ अप्पा फडके सुरेख गुलाब पुष्पे करीत. रूंगठा विद्यालयात जोगळेकर मास्तर चित्रकला शिकवीत. गेल्या पिढीत नाशकातून अनेक चांगले कमर्शियल आर्टिस्ट निर्माण झाले. विसूभाऊ पळशीकरांनी प्रतिमा अॅडव्हर्टायझिंग एजन्सी सुरू केली ती पुण्यात व जाहिरात क्षेत्रात नावाजली गेली. कैलास टकले हे व्यावसायिक चित्रकार म्हणून नावारूपास आहे. गणू परचुरे मुंबईच्या प्रख्यात लिंटास अॅडव्हर्टायझिंग एजन्सीत होते ते नाशिकचेच सर्कल टॉकिजचे चित्रपटांचे बॅनर्स, केतकर आर्टिस्ट कुशलतेने रंगवायचे. आपल्या कलेद्वारे त्यांनी अनेकांचे लक्ष वेधून घेत चित्रकलेचा ठसा उमटविला. दत्ता मनोहर हे नागपूर येथे कमर्शियल आर्टिक्स् म्हणून कार्यरत होते.

पुढच्या काळात सौ. स्वाती राजवाडे (त्रिवेणी गोगटे), सौ. सुहास जोशी (रोहिणी बापट), सौ. संध्या केळकर, श्रीमती अरूणा गर्गे (चितळे), श्रीमती मंगला पेठे, सौ. माणिक पुराणिक या महिलांनीही चित्रकलेच्या क्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे. सुनिल धोपावकर, आनंद बापट, संजय देवधर यांनी चित्रकलेचा उपयोग प्रकाशन व्यवसाय, जाहिरात कला यामध्ये परिणामकारक



केला आहे.

मूर्तीकला- शिल्पकला क्षेत्रात १९२० साली कोकणातून सिताराम विठ्ठल लोंढे नाशकात आले. त्यांनी गणपतीचा कारखाना नाशकात सुरू केला. शाडूमातीच्या सुबक सुंदर गणेशमूर्ती हे त्यांचे वैशिष्ठ्य ठरले. त्यांचे चुलतभाऊ मामा लोंढे यांनीही रविवार पेठेत गणेशमूर्तींचा कारखाना काढला. पुढे सितारामपंतांचे चिरंजीव कृष्णाजी व सुधाकर यांनी व्यवसायाला अधिक नावारूपाला आणून शिल्पाकृती घडविल्या. पंचवटीत स्टुडिओ उभारून निर्माण केलेल्या शिल्पाकृती नाशिकसह महाराष्ट्रात अनेक ठिकाणी त्यांच्या प्रतिभेची साक्ष देत आहेत. कृष्णाजी यांचे चिरंजीव संदिप यांनी कमर्शियल आर्टस्‌चे शिक्षण घेतले असले तरी तेही परंपरागत शिल्प व्यवसायात रमले आहेत. वेगवेगळी स्फुरल आणि गिमित, उत्थीत शिल्पे ते घडवून घराण्याची परंपरा चालवीत आहेत.

शिल्पकार राम थत्ते यांनी शहराच्या सौंदर्यीकरणात भर घालणारी अनेक शिल्पे घडवली आहेत. ती चौकांमध्ये पहावयास मिळतात. याशिवाय अनेक स्फूरल्स , पुतळे, शिल्पे ते वयाच्या सत्तरी नंतरही घडवित आहेत. अजिंठा या गुंफाचित्र विषयांचा त्यांचा गाढा व्यासंग असून त्यावर लिहिलेले पुस्तक अतिशय अभ्यासपूर्ण आहे. त्यांचे पुत्र अभिजित आर्किटेक्ट आहेत. कन्या अल्पनाने जी. डी. आर्ट डिप्लोमा पूर्ण केला आहे. सामाजिक कार्यातही राम थत्ते यांचा सहभाग असतो. नाशिक कलानिकेतनचे ते विश्वस्त आहेत.

संजय देवधर चित्रकार व पत्रकार आहेत. गेली २५ वर्षे दैनिक गांवकरी कला विभाग प्रमुख, कला संपादक व उपसंपादक अशी जबाबदारीची कामे ते करीत आहेत. वारली चित्रकलेविषयी केलेल्या संशोधनावर आधारित वारली चित्रसृष्टी हे त्यांचे पुस्तक अलिकडेच प्रकाशित झाले आहे. वारली चित्रकलेच्या अनेक कार्यशाळा देवधर यांनी घेतल्या आहेत. एक हजारपेक्षा जास्त कलाप्रेमी त्यांच्याकडे वारली चित्रकला शिकले आहेत. फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, ब्राझिल, जर्मनी येथून आलेल्या परदेशी पर्यटकांनाही देवधर यांनी वारली चित्रकलेचे तंत्र शिकविले आहे. वारली चित्रकला ही ठाणे जिल्ह्यातील आदिवासी कला आहे. कोकणातील ही कला असल्याने चित्तपावनांना साहजिकच ती जवळची आहे.

- संजय देवधर

(लेखक १९३३ साली झालेल्या चित्तपावन ब्राह्मण संघाच्या पहिल्या सभेचे अध्यक्ष वैद्य कृष्णाशास्त्री देवधर यांचे पणतू आहेत.)

कै. तां. रा. रा. रघुनाथ हरी गद्रे उर्फ दादासाहेब गद्रे (वकिल)
नाशिकचे पहिले स्वातंत्र सैनिक

आपल्या मेनरोड महानगर पालिकेच्या मुख्य प्रवेश द्वाराच्या बाहेर पिवळ्या चौकटीत त्यांचे नाव लिहीले असून खालील ओळीत महात्मा गांधीच्या व्यक्तीगत स्वातंत्र चळवळीत पहिले स्वातंत्र सैनिक आहे असा उल्लेख आहे. कै. काकासाहेब गाडगीळांच्या हस्ते त्यांच्या भव्य सत्कार करण्यात आला होता. नाशिकमधील पहिली घटना त्यांचा अंत्यसंस्कार वस्तीत म्हणजे यशवंतराव पटांगणावर झाला होता. त्यांचे धाकटे बंधु कै. रा. रा. पुरूषोत्तम हरी गद्रे उर्फ काकासाहेब गद्रे वकील वारकरी पंथाचे होते त्यामुळे धुंडामहाराज कै. सोनोपंत दांडेकर दरवर्षी निवृत्तीनाथांच्या यात्रेला त्रिंबकला येत असत. तेव्हा दांडेकरांचा मुक्काम त्यांचेकडे असायचा. सकाळी प्रवचन व रात्री कीर्तन असायचे. दुसरीकडे शाहू बोर्डिंग (हरीजनाचे) ह्या संस्थेला मदत करून बोर्डिंगमधील एक विद्यार्थी घरी मॅट्रीकपर्यंत शिकायला ठेवत. त्याचे शिक्षण झाले की दुसरा, असे कायम केले. त्यांची मोठी वास्तु (दगडी बंगला) चित्तपावन संस्थेला दान केला तेच आजचे काकासाहेब गद्रे मंगल कार्यालय.

मी स्वतः भारताबरोबरची पहिली लढाई झाली त्यावेळेस चीनच्या बॉर्डरवर सैनिक म्हणून गेलो होतो. सन १९६२.

- जयवन्त वि. गद्रे



त्र्यंबकेश्वर महिमा

- प्रशांत चंद्रशेखर घैसास



श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर. महादेवांच्या बारा ज्योर्तिलिंगापैकी आद्य ज्योतिर्लिंग म्हणून ओळखले जाणारे स्वयंभू स्थान, जिवनदाईनी गोदावरी मातेचे उगमस्थान, नाथ संप्रदायाचे सिध्दपीठ, वैदिकांचे माहेरघर, संतश्रेष्ठ निवृत्तीनाथांचे समाधीस्थान, अश्या अनेक वैशिष्ट्यांकरिता प्रसिध्द असणारे निसर्गरम्य ठिकाण. याच बरोबर चित्तपावन ब्राह्मण समाजाचे आराध्य दैवत असणाऱ्या भगवान श्री परशुरामांची तपोभूमी. श्री परशुरामांनी त्यांचे गुरू महादेवांचे निवासस्थान असणाऱ्या त्र्यंबकेश्वरला आपली तपोभूमी म्हणून निश्चित केले. तपश्चर्येचा कालावधी खूप मोठा असल्याने या भूमीत त्यांचे वास्तव्य बराच काळ असण्याची शक्यता आहे. आजही येथील निलांबिका पर्वतावर असणारी श्री परशुरामांची अतिप्राचीन मूर्ती त्यांच्या ह्या भूमीशी असणाऱ्या संबंधाची साक्ष देते. अपरांत (कोकण) भूमीच्या निर्मितीच्या वेळी परशुरामांनी ब्रम्हगिरी व हरिहर पर्वतावर उभे राहून सागरावर बाण सोडल्याचा उल्लेख पुराणांमध्ये आढळतो.

आपला चित्तपावन समाज हा मूळचा कोकणचा रहिवासी. कोकण भूमीला युगायुगांपासून दुष्काळाचा शाप आहे. त्यामुळे तेथील चित्तपावन चरितार्थासाठी स्थलांतर करून देशावर आला. सुमारे २५० वर्षापासून चित्तपावन आपापल्या सोईनुसार वेगवेगळ्या भागात स्थिरावला. पूर्वी त्र्यंबकेश्वरमध्ये चित्तपावनांची जी मूळची एकसष्ठ उपनावे आहेत त्या सर्व उपनावांची घरे होती. आपण चित्तपावन मुळातच संघटनप्रिय. त्यात एवढ्या मोठ्या प्रमाणावर एकत्र आल्यानंतर व आपल्या आराध्य दैवताची तपोभूमी असल्यामुळे श्री परशुरामांचे येथे मंदीर असावे अशी जबर इच्छा निर्माण न झाली तर नवलच. अन एकदा इच्छा झाल्यावर त्यासाठी वाट्टेल ते करण्याची तयारी हा आपला आणखी एक गुण.

त्या वेळेच त्र्यंबकेश्वर गाव अतिषय शांत होते. महादेवाच्या मंदिरावरच साऱ्यांची उपजिविका चालत असे. त्या काळात एखाद्या नवीन मंदिराची निर्मिती करणे हे फार जिकिरीचे काम होते. सगळ्यात मुख्य अडचण म्हणजे अर्थार्जन. परंतु एका ध्येयाने प्रेरीत झाल्यामुळे सर्व समाज जिद्दीने कामाला लागला. आपल्या अंगात असणाऱ्या विद्वत्तेचा व इतर कलागुणांचा उपयोग मंदिरासाठी अर्थार्जन करण्यासाठी केला गेला. आपल्या समाजातील वैदिक, किर्तनकार, प्रवचनकार यांनी गावोगावी पायी फिरून किर्तन, प्रवचन, यज्ञयाग यांच्या माध्यमातून अर्थार्जन केले, व मंदिर निर्मितीचे श्रेय प्रत्यक्षात उतरण्यास सुरूवात झाली. शके १७९३ (इ. स. १८७१) साली सुरू झालेले निर्माण कार्य शके १८०१ (इ. स. १८७९) मध्ये पूर्णत्वास गेले.

येथील श्रींच्या मंदीराची वास्तू खूपच भव्य आहे. मंदिराचे बांधकामही पेशवाईतील वाड्यांप्रमाणे आखीव रेखीव आहे. मुख्य देवतेच्या गर्भगृहासमोर मोठा सभामंडप व दोन्ही बाजूस प्रशस्त ओवऱ्या आहेत. सभामंडपात काचेच्या हंड्या, झुंबरे लावलेली आहेत. सभामंडपाच्या चारी बाजूंनी पौराणिक व ऐतिहासिक काळातील देवदेवतांची



व महत्वाच्या नेत्यांच्या तसवीरी एका रांगेत लावलेल्या आहेत. प्रवेशद्वाराशी उभे राहिले तरी गर्भगृहातील श्रींची मूर्ती स्पष्ट दिसते. पांढऱ्याशुभ्र संगमरवरी दगडात घडविलेली मूर्ती अतिशय मोहक आहे. ही मूर्ती बाल स्वरूपातील असून मूर्तिच्या चेहऱ्यावर अष्ट सात्विक भाव आहेत. हातातील धनुष्य, बाण, परशु ही आयुधे मुर्तीचे सौंदर्य वाढवतात. येथील चित्तपावन समाजाने ही वास्तू आजपर्यंत व्यवस्थित जतन केली आहे.

मंदिरात वर्षभर धार्मिक व सामाजिक कार्यक्रम चालतात. वैशाख शु १ (गुढीपाडवा) ला धर्मध्वज पूजन, पंचाग वाचन, वैशाख महिन्यातील श्रींचा जन्मोत्सव सोहळा म्हणजे तर उत्साहाचा महापूरच जणू. जन्मोत्सवास सहा दिवस रोज श्रीस पंचसुक्त पवमान अभिषेक, आरती, मंत्रपुष्प, देवे, किर्तन, प्रवचन, भजन, जन्मोत्सव, महाप्रसाद, पालखी व संगीताचा कार्यक्रम इ. चा समावेश असतो. उत्सवाव्यतिरिक्त चार्तुमास्य द्वादश्य, ब्रम्हानंद पुण्यतिथी, नाथषष्ठी, शंकराचार्य जयंती, श्रावणी, ऋग्वेद संहिता स्वाहाकार, चर्तुवेद पारायण, रूद्राभिषेक इ. धार्मिक कार्यक्रम होतात.

संस्थेने सामाजिक बांधिलकी पण जपली आहे. समाजोपयोगी कार्यक्रमांमध्ये व्यायामशाळेचे संचलन, गुणवान, विद्यार्थ्यांचा सत्कार, गरजू विद्यार्थांना गणवेश वाटप, शिक्षणासाठी आर्थिक मदत इ. कार्यक्रम संस्थेच्या आर्थिक ताकदीनुसार चालवले जातात. अग्रतःश्चतुशे वेदाः या उक्तीनुसार वेदांचे अध्ययन करणाऱ्या विद्यार्थांची निवास व्यवस्था विनामूल्य केली जाते. जपजाप्य, अनुष्ठान करणाऱ्या गृहस्थांसाठी पण मंदिरात निवास व्यवस्था विनामूल्य केली जाते.

श्रींचे मंदिर हे गावाच्या एका टोकास असल्यामुळे भक्तगणांची गर्दी येथे होत नाही. त्यामुळे वरील सर्व उपक्रम हे सध्या त्र्यंबकेश्वरमध्ये राहत असलेल्या नऊ दहा चित्तपावनांच्या सहकार्यावरच चालविले जातात. त्यामुळे मनात इच्छा असूनही याचे प्रमाण वाढवता येत नाही. तरी सर्व चित्तपावनांना संस्थेतर्फे आवाहन करण्यात येत आहे की त्र्यंबकेश्वरी आल्यावर प्रत्येक चित्तपावनाने एकदातरी मंदीराला भेट देऊन दर्शनाचा लाभ घ्यावा व यथाशक्ती मदत करावी.

॥ जय परशुराम ॥

प्रशांत चंद्रशेखर घैसास-सचिव
श्री परशुराम मंदिर संस्था त्र्यंबकेश्वर.





पाच पिढ्यांचा पौरोहित्याचा वारसा लाभलेले साने घराणे

- सौ. अकल्पिता अनिरूध्द अभ्यंकर



नाशिक क्षेत्रात वेदाध्ययन - अध्यापनाची परंपरा प्राचीन कालापासून आजतागायत अविरतपणे चालू आहे. यात मराठे, दाते, लेले, साने, पटवर्धन, पाटणकर, दांडेकर वगैरे २० ते २५ घराण्यांचा सिंहाचा वाटा आहे. यातीलच एक घराणे म्हणजे 'साने' घराणे. साने घराण्याच्या वेद विद्येशी १५० वर्षांपासून संबंध आहे. यात सखाराम साने, लक्ष्मण साने, गणेश साने अशा नामवंत आणि कर्मठ लोकांची जंत्री आहे.

कै. गणुनाना साने यांचे वैदिक शिक्षण रत्नागिरी जिल्ह्यातील पंचनदी गावचे श्री. जोशी यांच्याकडे झाले. गुरूवर्य कै. जोशी यांची पाठशाळा गोरेराम मंदिराजवळ, पंचरत्नेश्वर शिवमंदिरात अनेक वर्षे अव्याहतपणे चालू होती. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली वर वर्णन केलेल्या घराण्यातील पुरूषांनी नाशिक नगरीचा नावलौकिक उंचावर नेऊन ठेवला. कै. गणुनानांचा सरकारी इतमानाने राज्यपाल अली यावर जंग यांचे हस्ते सत्कारसमारंभ मुंबईत झाला आहे. त्याचप्रमाणे स्थानिक पातळीवर अनेक सत्कार झाले त्यात मा. दत्तो वामन पोतद्दार यांचे हस्ते झालेला सत्कार अविस्मरणीय असा आहे. वैदिक वङ्मयाशी निगडीत असलेल्या अनेक परीक्षा त्यांनी दिल्या.

गणुनानांचा वारसा :-

कै. गणुनाना साने यांचे ज्येष्ठ चिरंजीव कै. राजाराम साने हे सुद्धा नौकरी व्यवसाय सांभाळून पौरोहित्य करीत (निधन २०००) ज्योतिष विषयात त्यांचा फार हातखंड होता. मोठमोठ्या लोकांना सामोरे जाऊन आपल्या ज्योतिष विद्येचा प्रभाव दाखवल्याची उदाहरणे आजही हयात असलेली माणसे सांगतात.

कै. गणुनानांचा वारसा सध्या त्यांचे चिरंजीव (धाकटे) चालवत आहेत. त्यांचे वैदिक शिक्षण कै. गणुनानांजवळ झाले. गणुनानांचे निधनानंतर (१९७५) त्यांच्यावरची जबाबदारी वाढत गेली. त्यांनी पूर्णवेळ याच विषयाशी निगडीत राहण्याचा निर्णय घेतला. वडिलांच्या पश्चात त्यांनी निष्काम सेवा वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून चालू ठेवली आहे. चित्तपावन ब्राह्मण संघाचे पौरोहित्य ते गेली २५ वर्षे अव्याहतपणे अत्यानंदाने करीत आहेत. याचा संस्थेला अभिमान आहे. हे स्वतः आपल्या घरात व निरंजन स्वामी मठात विद्यादानाचे कार्य आजही विनामूल्य करीत आहेत. आत्तापर्यंत अनेक लोकांना त्यांनी आपापल्या आवडीचा विषय शिकवला आहे. राणी लक्ष्मीभुवन मधील महिलांना पौरोहित्य वर्ग चालण्यास विनायकरावांनी खूपच मदत केली. ऋग्वेदीय शाखेत सध्या त्यांनी शिकवलेले २०-२५ विद्यार्थी उत्तमपणे व्यवसाय करीत आहेत.

साने गुरूजींच्या मार्गदर्शनाखालीच गद्रे मंगल कार्यालयासाठी वास्तुशांत, त्याला जोडून ५ दिवसांचा ऋग्वेदीय संहिता स्वाहाकार पंचायतन याग, चित्तपावन मंगल कार्यालयाची वास्तुशांत व सहस्त्रचंडी, शतचंडी यागासारखी कामे करून यावर्षी त्यांनी नोव्हेंबर ४ ते ९ या काळात दत्तयाग व रूद्रस्वाहाकार यज्ञ अशा दोन अनुष्ठानांचे आयोजन केले आहे. त्यामुळे ज्ञातीबांधव एकत्र येऊन ज्ञानात भर घालण्याचा प्रयत्न आहे. व्याख्याने, प्रवचने, भजने, मंत्रजागर वगैरे कार्यक्रम अनुषंगाने असतात.

आता साने घराण्याची पाचवी पिढी विनायकरावांचे चिरंजिव श्री. अरविंद साने हे ही स्वतःचा ॲडव्हर्टायझिंगचा व्यवसाय सांभाळून पौरोहित्य सुरू केले आहे. तसेच विनायकरावांची सून सौ. कालिंदी अरविंद साने याही सध्या पौरोहीत्य शिकत आहेत.





चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

संस्थेच्या वास्तू













नाशिक महानगरपालिका
पंडित विष्णु दिगंबर पलुस्कर
सांस्कृतिक भवन

अण्णासाहेब वैशंपायन
विद्यालय

थत्ते सभागृह

अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था

दांडेकर दीक्षित तालिम संघ

स्वातंत्र्यवीर सावरकर जलतरण तलाव नाशिक महानगरपालिका

नाशिक महानगरपालिका नाशिक
हुतात्मा
अनंत लक्ष्मण कान्हेरे
मैदान

कान्हेरे वाडी

साने गुरुजी नगर

टिळक वाडी

थत्ते नगर
पूर्व

लोकमान्य
टिळक
शासकीय वसाहत

चौक

ठसा चित्पावनांचा

सार्वजनिक वाचनालय, नाशिक
माधवराव लिमये सभागृह



INDIA
20

दादासाहेब फाळके स्मारक
DADASAHEB PHALKE MEMORIAL
BUDDHA VIHAR
NASHIK MUNICIPAL CORPORATION
बिवलका कारंजा
(रविवार कारंजा)
|| राष्ट्र रक्षण व्यायाम हा मंत्र ||
श्री. ओकाची तालीम संघ
ओकाची तालीम चौक, जीजामाता रोड नाशिक-१
र.न.ए.५६५
भारतीय
चित्रपटसृष्टीचे
जनक
धुंडिराज गोविंद
तथा
दादासाहेब फाळके
यांचे
मूळ निवासस्थान
स्वातंत्र्यवीर
सावरकर पथ
अभिनव भारत मंदीर
माधवराव लेले विद्यालय



नाशिक महानगर पालिका
स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर उड्डाणपुल



स्वातंत्र्यविर
सावरकर मार्ग



INDIA



चित्तपावनांचे राष्ट्रीय योगदान

- विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर

भारत म्हणजे विश्वकुटुंबाचे देवघर ! मानवी जगाचे मंदिर ! 'वसुधैव कुटुंबकम्' ही हिंदूंची आस आहे. 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु।' हा हिंदूंचा ध्यास आहे. ' एक सत् विप्रा बहुधा वदन्ति।' हा हिंदूंचा विश्वास आहे.

वेद (निगम वा श्रुती), स्मृती (आगम), साधुजनांचा सदाचार आणि आत्म्याचा संतोष या चार स्तंभांवर हिंदू धर्म विराजमान झाला आहे. विश्वबंधुत्वावर हिंदू धर्माचे समाधान नाही. वैश्विक एकात्मता हाच हिंदूंसाठी विश्वधर्म आहे.

या विशाल, उत्कट, उदात्त परंपरेला आचार्य - संतांनी तर संपन्न केले आहेच पण हिंदू धर्म आणि भारतीय संस्कृतीचा गरिमा, महत्ता वर्धिष्णू करण्यात चित्तपावन ब्राह्मणांचा सिंहाचा वाटा आहे.

चित्तपावन कोण ? चित्तपावन ही संज्ञा कशी निर्माण झाली, याबाबत मतमतांतरे आहेत. तथापि चित्तपावनांची ज्ञानसाधनेची पावन परंपरा लक्षात घेता हा गुंता सहज सोडविता येतो. हिंदू धर्मात एकमेवाद्वितीय परब्रह्म वा परमात्मा हे अंतिम सत्य मानले आहे. हा परमात्मा सत् - चित् - आनंद स्वरूप आहे. सत् म्हणजे शाश्वत, चित् म्हणजे आत्मज्ञानरूप. मोक्ष हा आपला अंतिम पुरूषार्थ आहे. त्याची प्राप्ती आत्मज्ञानाने होते. मोक्षप्राप्तीसाठी आत्मज्ञानाने पावन झालेले, ते चित्तपावन असा सुस्पष्ट अर्थ आहे.

योगदान - हिंदू धर्माची अष्टांगे आहेत. धर्मकारण, राष्ट्रकारण, समाजकारण, अर्थकारण, वाङ्मय, विज्ञान, कला - क्रीडा व शिक्षण ही अष्टांगे चित्तपावनांनी समृद्ध केली आहेत.

१) धर्मकारण - आपल्या धवल चारित्र्याने आणि ब्रह्मविद्येने महर्षी पदाला चढलेले आणि लोकमान्य टिळकांना गुरूस्थानी असलेले अण्णासाहेब पटवर्धन, योग्याचा मूर्तिमंत आदर्श असलेले केवलानंद सरस्वती (नारायणशास्त्री मराठे) हे सात्विक पुरूष म्हणजे धर्मकारणाचे मानदण्ड होत. विशाल स्वाध्याय परिवार निर्माण करून, समाजाचे आत्मभान जागवून अनेक निष्काम कर्मयोगी निर्माण करणाऱ्या पांडुरंगशास्त्री आठवले यांनी त्यांची चिरंतन मुद्रा कालचक्रावर उमटवली आहे. हिंदू धर्माची थोरवी तर्कशुध्द रीतीने समाजापुढे आणणारे राष्ट्रहितैषी व आत्मज्ञानी स्वामी वरदानंद भारती (अनंतराव आठवले) यांनी आधुनिक काळात लुप्त होऊ लागलेली आचार्य परंपरा धन्य केली. वारकरी संप्रदाय अधिक श्रीमंत करून भागवत धर्माची पताका उंच उभारून धरणारे सोनुमामा दांडेकर महान सत्पुरूष होते. अफाट व्यासंग, अलौकिक धारणा, धगधगीत वैराग्य व ब्रह्मचर्य, करूणेत भिजलेली भक्ती, जनसामान्यांचा कळवळा अशा अनंत गुणांनी त्यांचे चरित्र मंडित होते. वारकरी संप्रदयाचे नेतृत्व करताना त्यांनी भक्तिप्रवाह अधिकच विशुध्द केला ! गीता आचरणारे व त्यातील तत्त्वज्ञान जगणारे गुरूदेव रानडे यांनी निंबरगी संप्रदाय विस्तारताना ज्ञानोबा-तुकोबा-समर्थ यांचेबरोबर कर्नाटकातील संतांचे तत्त्वज्ञान उलगडले. इतकेच नव्हे तर औपनिषदिक तत्वज्ञान सगळ्या जगापुढे ठेवले. लावणीपासून भगवत् वाणीपर्यंत प्रवास केलेल्या दासगणू महाराजांनी (सहस्त्रबुद्धे) कीर्तनाच्या माध्यमातून अनेक ज्ञानदीप प्रज्वलित केले. आपल्या नाथसंप्रदायाचा गौरव गाताना (स्वामी म्हणे माझा नाथ संप्रदाय । अवघे हरिमय योगबळे॥) स्वामी स्वरूपानंदांनी (गोडबोले) प्रपंच - परमार्थाचा समन्वय केला आणि अनेकांना सन्मार्ग दाखविला.

२) राष्ट्रकारण - पुण्यनगरीचे नाव सगळ्या भारतात दुमदुमून टाकण्याचे अजोड कार्य कोकणातील भट कुटुंबियांनी छत्रपतींचे पेशवेपद स्वकर्तृत्वाने मिळवून केले. बाळाजी विश्वनाथ, प्रतापी थोरले बाजीराव, मुत्सद्दी नानासाहेब, भारताच्या इतिहासात विजेसारखे तळपून २८ व्या वर्षी देह ठेवणारे थोरले माधवराव, स्वातंत्र्य लढ्याचे यज्ञकुंड धगधगते ठेवणारे नानासाहेब - या सर्व पेशव्यांचे (भटांचे) कर्तृत्व प्रशंसनीय आहे.

मराठेशाही जिंकण्यात एकच अडसर आहे, याची प्रांजल कबुली ब्रिटिशांनाही द्यावी लागली. तो अडसर म्हणजे नाना फडणवीस ! पुढे मोरोबादादा कारभारी झाल्यावर त्यांनी एल्फिन्स्टनला सांगितले होते, 'पहिला चौघडा



शनिवारवाड्यावर वाजतो. दुसरा आमच्या वाड्यावर. तो सगळीकडे ऐकू जातो.' एल्फिन्स्टन हसला आणि म्हणाला, ''यात काय विशेष ! नाना फडणवीस शनिवारवाड्यात कुजबुजत असत आणि त्याचे पडसाद लंडनमध्ये उमटत !'' नाना म्हणजे मुत्सद्देगिरीचा व राजकीय चातुर्याचा परोत्कर्ष !

छत्रपती शिवरायांप्रमाणे अलौकिक कार्य करण्याची प्रेरणा घेऊन पहिला स्वातंत्र्यसैनिक होण्याचा मान प्राप्त केलेले वासुदेव बळवंत फडके स्वनामधन्य होत ! त्याही अगोदर स्वातंत्र्याचा शेवटचा सेनापती पदाचा तुरा ज्यांच्या मस्तकावर शोभला, ते बापू गोखले म्हणजे राष्ट्रभक्तीचा आदर्श ! ब्रिटिशांनी लिंगो भगवान् नामक प्रतिनिधीला बापूंकडे पाठविले होते. निरोप एकच - ' अंतिम युद्धात तुमची तलवार म्यानच राहू दे. फक्त त्याची किंमत बोला.' बापू गोखले गरजले, त्रिभुवनाची दौलत दिलीत, तरी असला स्वामिद्रोह, राष्ट्रद्रोह मी कदापि करणार नाही.'

आजच्या भ्रष्ट व लाचार जगाला शुद्ध करण्यासाठी बापूंचे उद्गार तसबिरीत लावून घरोघरी पुजले पाहिजेत. राक्षसी वृत्तीच्या, साक्षात नराधम असलेल्या, रॅण्ड व त्याच्या सहकाऱ्यांना कंठस्नान घालणाऱ्या चाफेकर बंधूंची आरती कोणत्या शब्दात गावी? 'चौथा पुत्र असता, तरी तो राष्ट्रासाठी ओवाळून टाकला असता' असे सांत्वनासाठी आलेल्या भगिनी निवेदितांना सांगणाऱ्या चाफेकर बंधूंच्या मातेचा गौरव व पवाडे कोणत्या स्वरात गावेत ! जॅक्सनला मृत्यूदण्ड देणारे अनंत कान्हेरे याच माळेतील तेजस्वी मणी !

समस्त चित्तपावनांचीच काय पण सर्व हिंदूंची हृदये उचंबळून यावीत, अशी राष्ट्रकारणातील दोन अलौकिक नावे म्हणजे लोकमान्य टिळक आणि स्वातंत्र्यवीर सावरकर ! उज्ज्वल राष्ट्रभक्ती, खडतर आयुष्य, अप्रतिम वक्तृत्व, प्रबोधन करणारी पत्रकारिता, निर्मळ नेतृत्व, समाज संघटन, स्वातंत्र्याचा ध्यास, हिंदुस्थानाला स्वतंत्र व बलशाली करण्याची सात्विक महत्वाकांक्षा अशा अनंत गुणांनी दोघांचीही चरित्रे अलंकृत झाली आहेत. टिळकांनी मंडालेत गीतारहस्य उलगडले. अंदमानच्या काळकोठडीत सावरकरांनी कमला महाकाव्य निर्मिले.

'स्वातंत्र्य मिळाल्यावर आपण केन्द्रात कोण होणार ?' असा प्रश्न पत्रकाराने विचारल्यावर लोकमान्य उत्तरले, 'लेखणी खाली ठेवेन. हातात खडू घेऊन गणिताचा शिक्षक होऊन शाळेत - महाविद्यालयात शिकवेन !' ही निःस्पृहता अतुलनीय !

' तुरूंग माझी विश्रांती आहे' अशी दुर्दम्यता असणाऱ्या टिळकांनी स्वराज्य - स्वातंत्र्याला जन्मसिध्द अधिकार म्हणून घोषित केले !

राष्ट्रकारणाचे एक प्रधान अंग म्हणजे संरक्षण ! त्यात आपल्या राष्ट्राला योगदान देणारे मे. ज. राजवाडे, परांजपे, ले ज. सहस्त्रबुध्दे, ॲडमिरल भास्कर सोमण इत्यादींची परंपरा अभिमानास्पद आहे. प्रशासनात पारदर्शकता, न्याय आणि वक्तशीरपणा यांसाठी स. गो. बर्वेंचे नाव आजही घेतले जाते !

३) समाजकारण - लोकहितवादींनी (देशमुख) शतपत्रातून जनजागरण केले. न्यायमूर्ती रानडे यांनी थंड पडलेल्या महाराष्ट्राच्या गोळ्याला स्वत्वाची ऊब दिली. विष्णुबुवा ब्रह्मचारींनी (गोखले) महाधूर्त व कावेबाज पाद्र्यांचा विचारमंथनात पाडाव करून धर्मध्वजा तर फडकत ठेवलीच, पण थोर समाजकारणही साधले. सार्वजनिक काकांनी (जोशी) स्वदेशीचा आदर्श समाजापुढे ठेवून उत्तम प्रकारे समाजसंघटन केले. वकिलीतून मिळालेले धन, आईच्या प्रेरणेने नवे विष्णूमंदिर उभारण्यात सन्मार्गी लावले. गोपाळ गणेश आगरकर यांनी सुधारणेचे व्रतच घेतले.

४) अर्थकारण - चित्तपावनांची अर्थकारणातील परंपराही लक्षणीय आहे. धनंजयराव गाडगीळ, भट, सोवनी, वि.म. दांडेकर यांनी अर्थशास्त्राचे सखोल चिंतन, संशोधन, उपयोजन केले. गाडगीळ (सफारी), वेलणकर (वस्त्र व्यवसाय), ओगले बंधू (काच कारखानदार), चितळे बंधू (मिठाई), केळकर अत्तरवाले इत्यादी व्यावसायिकांनी गुजराथी - मारवाड्याप्रमाणे व्यापक व्यवसाय, पण चित्तपावनी परंपरेला शोभेल असाच करून दाखविला.

५) वाङ्मय - ज्ञानोपासक चित्तपावनांची वाङ्मयसेवा लक्षणीय आहे. भारताचार्य चिंतामणराव वैद्य, धर्मशास्त्राचा बृहत् इतिहास उलगडून भारतरत्न झालेले पां. वा. काणे, साहित्य सम्राट न. चिं. केळकर, वैदिक परंपरेचे कट्टर पुरस्कर्ते भाऊशास्त्री लेले, दोन अंगवस्त्रे कमी ठेवलीत , तर मराठेशाहीचा इतिहास ग्रंथरूपाने सिद्ध करता येईल. असे संस्थानिकांना ठणकावणारे इतिहासाचार्य राजवाडे, इतिहासाचे



थोर संशोधक वासुदेवशास्त्री खरे, मराठीत प्रथम प्रवास ग्रंथ लिहिणारे गोडसेभटजी, ह. ना. आणि ना. ह. ही आपटे जोडगोळी . अफाट व्यासंगी आहिताग्नी शंकरराव राजवाडे, निर्मळ हास्यरसाचे व विनोदाचे प्रवर्तक श्रीपाद कृष्ण कोल्हटकर व चिं. वि. जोशी , ' भारतीय संस्कृती' हा अद्वितीय ग्रंथ निर्माण करणारे साने गुरूजी, सारस्वतकार वि. ल. भावे, पातंजल योगसूत्रांवर अद्वितीय भाष्य करून भारतीय मानसशास्त्र जगापुढे आणणारे योगाचार्य कृ. के. (बाबा) कोल्हटकर, आपल्या धारदार लेखणीने ब्रिटिशांना चिंताग्रस्त करणारे नाटककार कृ. प्र. खाडिलकर, समाजातील समस्यांना रंगमंचावर प्रभावीपणे मांडणारे गो. ब. देवल, संगीत नाटकांचे पुनरूज्जीवन करणारे विद्याधर गोखले, कोशनिर्मितीसाठी आयुष्य वेचणारे बा. शि. आपटे, ज्ञानकोशकार केतकर, दाते व कर्वे, व्यायामकोशकार मुजुमदार, भारतीय संस्कृतीकोश निर्मिणारे महादेवशास्त्री जोशी, आपल्या निर्मळ कथांची भाग्यरेषा निर्मिणारे य . गो. जोशी, महाराष्ट्र संस्कृतीचा अन्वयार्थ लावणारे श्री. म. माटे, पु. ग. सहस्त्रबुद्धे, भागवत धर्माची पताका उंच उभारून धरणारे शं. दा. पेंडसे, नव्या युगाची तुतारी फुंकणारे केशवसुत (दामले), भाषाप्रभू गो. नि. दांडेकर, सर्वश्री करंदीकर, शं. रा. दाते, शि. म. परांजपे यांच्यासारखे श्रेष्ठ पत्रकार, काशीबाई कानिटकरांपासूनची स्त्री लेखिकांची परंपरा - किती म्हणून नावे सांगावीत ? केरूनाना छत्रे, शं. बा. दीक्षित, रघुनाथशास्त्री पटवर्धन, पंचांगकर्ते दाते, म. दा. भाट यांनी ज्योतिष व पंचांग यांची परंपरा समृद्ध केली आहे. मौज प्रकाशन (भागवत बंधू), परचुरे प्रकाशन मंदिर, प्रसाद प्रकाशन इत्यादी प्रकाशक नावे सर्वश्रुत असून हरिपंत गोखले (आर्यभूषण) इत्यादींनी मुद्रण क्षेत्रात आपला ठसा कायमचा उमटवला आहे.

६) विज्ञान - संस्कृतीच्या इतर अंगांचा विचार करता विज्ञान क्षेत्रात चित्तपावन संख्येने कमी दिसतात. आघारकर, माधवराव चितळे, माधवराव गाडगीळ, नरेन्द्र करमरकर यांसारख्या शास्त्रज्ञांबरोबर आनंदीबाई जोशी, घारपुरे, फाटक, बाबा नामजोशी, डॉ. परांजपे व श्रीकांत केळकर (नेत्रतज्ज्ञ) यांसारखी वैद्यकीय क्षेत्रातील मोठी नावेही दिसतात.

७) कला व क्रिडा - कलेच्या क्षेत्रातील चित्तपावनांची परंपरा विष्णुदास भावे यांच्यापासून सुरू होते. नटश्रेष्ठ भाऊराव कोल्हटकर, नानासाहेब जोगळेकर, गणपतराव जोशी, गणपतराव बोडस, केशवराव दाते, चिंतामणराव कोल्हटकर, नानासाहेब फाटक, मामा पेंडसे यांच्यापासून आधुनिक कालखंडापर्यंत रंगशारदेची पूजा करणारे नट, कमलाबाई गोखले, शांता आपटे, बेबी शकुंतला, उषा किरण इत्यादी नट्यांपासून आंतरराष्ट्रीय किर्ती मिळवलेली माधुरी दीक्षित-नेने, ह्यांच्यामुळे ही नाट्य व चित्रपट परंपरा समृद्ध झाली आहे. दादासाहेब फाळके त चित्रपटसृष्टीचे जनक झाले.

'तंबोऱ्याच्या जोरावर जग जिंकेन' अशी प्रतिज्ञा केलेल्या विष्णू दिगंबर पलुस्कर यांना कोणीतरी खोचकपणे विचारले होते, 'काय बुवा, किती तानसेन निर्माण केलेत?' - त्यावर विष्णू दिगंबरांनी सांगितले, 'तानसेन नसतील पण असंख्य कानसेन मात्र निर्माण केले.' त्यांचेच चिरंजीव अत्यंत मिठ्ठास गायकी असलेले द. वि. पलुस्कर, संगीतकोशकार वि. ना. भातखंडे, रामकृष्णबुवा वझे, कुमार गंधर्वांना घडविणारे बी. आर. देवधर, गजाननबुवा जोशी. डी. के. दातार, लालजी गोखले, राम मराठे, उद्योन्मुख पिढीतील संजीव अभ्यंकर या सर्वांनी गायन - वादनाने कलादालन संपन्न केले आहे. इंदिराबाई खाडिलकर, वीणा सहस्त्रबुद्धे यांचे गायनक्षेत्रातील योगदान लक्षणीय आहे. संगीतकार व गायक म्हणून गजाननराव वाटवेंचे उत्कृष्ठ योगदान आहे.

करमरकरांची शिल्पकला म्हणजे निरंतर, नित्यनूतन आनंदाचा विषय आहे. त्यांनी निर्मिलेले छत्रपती शिवरायांचे शिल्प जगातील एक उत्कृष्ठ शिल्प म्हणून गणावे लागेल. गोंधळेकर, दीक्षित, द. ग. गोडसे इत्यादींची संपन्न चित्रकला, रोहिणी भाटे, सुचेता चाफेकर-भिडे इत्यादींची नृत्याराधना हे सर्वच चित्तपावनांच्या गौरवाचे विषय आहेत.

सर्कसवाले छत्रे - देवल - कार्लेकर, शतायुषी दि. ब. देवधर बाळंभट (दादा) देवधर, शिवरामपंत दामले, खाडिलकर भगिनी, अभिजित कुंटे, भाग्यश्री साठे, अनुपमा अभ्यंकर इत्यादींनी क्रिकेटपासून - बुद्धिबळ - कुस्तीपर्यंत आपला विशेष ठसा उमटवला आहे.

सुधीर फडकेंचा स्वतंत्र गौरवपूर्ण उल्लेख केला पाहिजे. त्यांच्या गीतरामायणाने महाराष्ट्राला वेड लावले. त्यांचे गायन , भाव, शब्दोच्चार, राष्ट्रप्रेम सगळेच अलौकिक !



जोपर्यंत महाराष्ट्र संस्कृती आहे. तोपर्यंत गीतरामायण व सुधीर फडके ही नावे अजरामरच राहतील !

८) शिक्षण - लेखनाच्या प्रारंभी वर 'श्री' लिहितात त्याप्रमाणे शिक्षणाविषयी लिहिताना पहिले नाव भारतरत्न महर्षी धोंडो केशव (अण्णासाहेब) कर्वे यांचेचे अंकित केले पाहिजे. मॅट्रिकच्या परीक्षेसाठी शेरवलीहून साताऱ्यापर्यंत असा दोनशे मैलांचा प्रवास करणाऱ्या अण्णासाहेबांनी पुढेही अशीच वणवण करून स्त्रीशिक्षणाला सन्मानाचे स्थान प्राप्त करून दिले. रँग्लर परांजपे, विनायकराव आपटे, दादासाहेब केतकर, कानिटकर, घारपुरे, अप्पा पेंडसे, गंगुताई पटवर्धन, ताराबाई मोडक यांसारख्या अनेक दिग्गजांनी शिक्षणाची निर्मळ, निर्व्याज, ऋषिप्रणित परंपरा चालविली.

विष्णुशास्त्री चिपळूणकर , आगरकर, टिळक, नामजोशी इत्यादींनी केवळ शिक्षणसंस्था निर्माण केल्या असे नव्हे, तर आपले शिक्षण दिले.

भारतरत्न विनोबा भावे हे अनेक पैलू असलेले एक व्यक्तिमत्व होते. त्यांची भूदानयज्ञ चळवळ अपूर्व होय. तत्वज्ञ, थोर शिक्षणतज्ज्ञ, मर्मज्ञ, भाष्यकार, उत्कृष्ट वक्ता, समाज प्रबोधन - अशा अनेक नात्यांनी त्यांचे योगदान फार मोठे आहे.

उपसंहार - हिंदू धर्माच्या अष्टांगांसाठी चित्तपावनांनी दिलेले हे योगदान अपूर्व आहे. सकर आहे. चिरंतन आहे. वरची यादी परिपूर्ण नव्हे. केवळ प्रातिनिधिक आहे.

मात्र एक खरे आहे की, मागच्या पिढीमधील सच्चारित्र्याची, सदाचाराची, नीतीची, निर्मळतेची, राष्ट्रभक्तीची, आस्तिक्य भावनेची पावन गंगा पुढील पिढ्यांत तुलनेने कमी दिसते.

सर्वच क्षेत्रात योगदान देणारे चित्तपावन आहेत. पण निर्व्यसनीपणाची, सदाचाराची आणि उत्कट राष्ट्रभक्तीची परंपरा तुटत चालली आहे काय, याची चिंता वाटते.

ग्रँट डफ वा कँडी यांनी चित्तपावनांचा गौरव उगाच केलेला नाही. ते म्हणतात,

'माझा ज्या ब्राह्मणांशी परिचय आहे, त्या सर्वांत कोकणस्थ (ब्राह्मण) हे सगळ्यात जास्त सूज्ञ आणि बुद्धिमान आहेत.'

'बुद्धिमत्तेत भारतीय मनुष्य हा इंग्रजांच्या तोडीचा आहे यात कधी काही प्रश्नच नव्हता. खरं तर मी असं म्हणेन की बुद्धिमत्तेत कोकणस्थ ब्राह्मण हा इंग्रजांपेक्षा वरचढ आहे.'

अमेरिकेच्या शिकागो विद्यापीठातील विद्वान प्राध्यापिका मॉरिन पॅटर्सन या म्हणतात, 'पंधराव्या शतकातील चित्तपावनांचा छोटा ब्राह्मणसमूह जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांत नेतृत्व स्वीकारून गेली अडीचशे वर्षे आघाडीवर आहे, याचे मला आकर्षण वाटते. या समूहाशी तुलना करावयास दुसरा ब्राह्मण गट सबंध भारतात नाही. आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात चित्तपावनांचा फार मोठा प्रभाव मान्य करावा लागेल.'

आपला आद्यपुरूष श्रीपरशुराम ! शस्त्र - शास्त्र अर्थात ब्राह्म-क्षात्र संगमातून नवीन इतिहास निर्मिणारा !

याचे भान धेवून चित्तपावन जर निर्व्यसनी आणि सच्चारित्र्य राहिले, तरच ते जगाचे नेतृत्व पुन्हा करतील ! भान एवढेच ठेवायला हवे की, चित्तपावन ब्राह्मण केवळ अर्थ - कामाचे पुजारी नाहीत. ते खरे उपासक आहेत धर्म - मोक्षाचे !

म्हणूनच चित्तपावनांत ही तीन भारतरत्न आहेत ! हेही नसे थोडके !

चित्तपावन आणि कै. भानू

चित्तपावनाचा विषय निघाला की जुन्या पिढीतील सभासदांना कै. द. ग. भानूंची आठवण येणे अपरिहार्य आहे. अनेक वर्षे संस्थेची वर्गणी वसुली करण्याचे काम ते करीत असत. वास्तविक पाहता वर्गणी वसुली हा तसा एक आर्थिक व्यवहार. पण कै. भानूच्यामुळे हा एक भावनात्मक विषय होत असे. सभासदांकडून वर्गणी वसूल करतांना नाशकात येणाऱ्या नव्या चित्तपावन कुटुंबाचा संस्थेशी संबंध जोडणे संस्थेच्या कामाशी त्यांचे नाते निर्माण करणे ही जबाबदारी कै. भानूंनी समर्थपणे सांभाळली होती. आजच्या दिवशी त्यांची सर्वांना प्रकर्षाने आठवण येत आहे.



आरती श्रीपरशुरामांची

भार्गवकुलभूषण जमदग्नीसुत रूद्रा
निर्भय निश्चलपर्वत दातृत्वसमुद्रा
शस्त्र - शास्त्रपारंगत कोंकणजनभद्रा
अतिबलखलनिर्दालक आश्वासकमुद्रा
जय देव जय देव श्रीपरशुरामा, स्वामी भार्ववरामा
आरती स्वीकारावी शाश्वतसुखधामा ॥ धृ ॥

रेवातीरी, वैशाखी, ऋषिकुली अवतरला
लौकिक जीवन त्यागून तपि घोर रमला
प्रसन्न झाले शंकर, परशू दुज दिधला
शर-धनू धारण करूनी वीराग्रणि सजला ॥ १ ॥

चित्ररथा देखूनिया, जननी क्षण काही
विचलित होता, हत्या केलीस लवलाहि
दिधले तिज संजीवन, जनकवरा पाही
पितृनिष्ठ, मातृभक्त अन्य दुजा नाही ॥ २ ॥

मदोन्मत्त कार्तवीर्य करी अत्याचारा
जाळीतसे आश्रम अन् गोधन अपहारा
त्यासी वधिले मग तू उग्रावतारा
निखंदिली क्षात्रकुळे रणीं अपरंपारा ॥ ३ ॥

गाजविला बहु प्रताप, जिंकिले त्रिखण्ड
दान दिले काश्यपास राज्य, धन प्रचण्ड
हटविलास उदधी मग निग्रही वितण्ड
अपारान्ता वसविलेस, कीर्ति तव उदण्ड ॥ ४ ॥

ऐसा चिरविजयी तू चिरंजीव झाला
षडावतारा, सखया, व्यापिले त्रिकाला
राम, कृष्ण, द्रोण, कर्ण ... वंद्य त्यांस झाला
महेंद्रगिरीपते, नंदन नमवी निजभाला ॥ ५ ॥

(कवी - नंदन राहाणे)

आरती श्री योगेश्वरीची (अंबाजोगाईची)

त्रिगुणात्मक - त्रिपुरात्मक ऊर्जा अविनाशी
निष्कलंक तेजोमय चैतन्यराशी
अखंड कौमार्याची शक्ती तुजपाशी
नित्य तुझे संचालन सृष्टीसर्जनाशी
जयदेवी श्रीदेवी योगेश्वरी माते
आरती ओवाळीता वर दे आम्हांते ॥ धृ ॥

पुराण प्राचीन नगरी आम्रपुरी ख्याता
प्रसन्न झालीस देखून, क्षिती पाहो जाता
मार्गशीर्ष पौर्णिमेस अवतार पाता
जयंती नदी हर्षित हो गुणमहिमा गाता ॥ १ ॥

वैद्यनाथ वेधूनिया परिणयास आला
तो 'वर'मानिनी तुजला नच मान्य झाला
निमित्त रूपशृंगारा, बहु विलंब केला
मुहूर्त टाळून मानसध्वज उंच नेला ॥ २ ॥

दंतासूर उग्र दैत्य छळी जो सुजनांना
अतिसाहक केले त्वा त्यासी वधतांना
रक्षियले वेद, विप्र, ऋषिवर सकलांना
दिव्य शक्तीपीठ दिले योगिनी समूहांना ॥ ३ ॥

खड्ग, मुसल ध्वस्त करी विकट दुष्ट दुरिता
पूर्णपात्र, अभयहस्त कृपादान त्वरिता
स्नेहशील दृष्टी जमू अमृतमय सरिता
मुद्रा तव सुंदरतम त्रिविधतापहरिता ॥ ४ ॥

कुलदेवी सर्व तुझे ... जन्म, देह, बुद्धी
प्रतिभा, श्रम, उद्यम अन् यश, ध्येयसिद्धी
धन, धान्य , पुत्र, पौत्र... होवो अभिवृद्धी
नंदन करी वंदन, सुख लाभो समृद्धी ॥ ५ ॥





गोत्रे, प्रवर, वेद आणि वेद - शाखा

गोत्र -

याचा शब्दशः अर्थ कुल. प्राचीन काळी गोत्रे ही कुलदर्शक नामे म्हणून प्रचारात होती. गोत्राचा व वेदाध्ययनाचा संबंध नव्हता. कोणताही ब्राह्मण कोणत्याही वेदाचा अभ्यास करीत असे. आपले गोत्र कोणते आहे हे या पुस्तकात पुढे दिलेल्या जंत्रीवरून (किंवा पंचागात पाहिल्यास) कळेल.

प्रवर -

याचा शब्दशः अर्थ 'निवडणे'. हा अर्थ त्यातील 'वृ' धातूचा आहे. प्रवराला आर्षेय (म्हणजे ऋषी प्रणित) असा दुसरा शब्द आहे. 'प्रवर' हे गोत्र ऋषींचे 'पूर्वज' किंवा 'वंशज' असतील अशी विकल्पद्योतक भाषा वापरली जाते.

गोत्र एकच असते पण प्रवरे तीन किंवा पाच असतात हे खालील तक्त्यावरून लक्षात येईल.

चित्तपावनांमध्ये १४ गोत्रे असली तरी प्रवरांचे सातच गट आहेत ते असे -

१) अत्रि, २) काश्यप, शाण्डिल्य, ३) कपि, गार्ग्य, भारद्वाज ४) कौण्डिण्य, वासिष्ठ ५) कौशिक , बाभ्रव्य ६) जामदग्न्य, वस्त ७) विष्णुवृध्द, नित्युंदन

क्र	गोत्र	प्रवरे				
१	अत्रि	आत्रेय	आर्चनानस	श्यावाश्व		
२	कपि	आंगिरस	आमैह्यव	औरूक्षस		
३	काश्यप	काश्यप	आवत्सार	नैध्रूव		
४	कौण्डिण्य	वासिष्ठ	मैत्रावरूण	कौण्डिण्य		
५	कौशिक	वैश्वामित्र	अघमर्षण	कौशिक		
६	गार्ग्य	आंगिरस	शैन्य	गार्ग्य		
७	जामदग्न्य	भार्गव	च्यावन	आप्नवान	और्व	जामदग्न्य
८	नित्युंदन	आंगिरस	पौरूकुत्स	त्रासदस्यव		
९	बाभ्रव्य	विश्वामित्र	औदल	बाभ्रव्य		
१०	भारद्वाज	आंगिरस	बार्हस्पत्य	भारद्वाज		
११	वत्स	भार्गव	च्यावन	आप्नवान	और्व	जामदग्न्य
१२	वासिष्ठ	वासिष्ठ	इन्द्रप्रमदा	भरद्वसु		
१३	विष्णुवृद्ध	आंगिरस	पौरूकुत्स	त्रासदस्यव		
१४	शाण्डिल्य	शांडिल	असित	दैवल		

- विवाह ठरवितांना ज्या गोत्रांचे विवाह एकमेकांशी जमवीत नाहीत, अशी गोत्रे एकाच चौकटीत खाली दिली आहेत.
- समान गोत्रांचा विवाह वर्ज्य मानला जातो.



- 'अत्रि' गोत्राचे विवाह इतर सर्व गोत्रांशी जमविले जातात.

कपि, गार्ग्य, भारद्वाज,

कौशिक, बाभ्रव्य,

काश्यप, शाण्डिल्य,

जामदग्न्य, वत्स,

कौण्डिण्य, वासिष्ठ,

नित्युंदन, विष्णुवृद्ध

वेद आणि वेदशाखा-

वेद - धर्म - कर्म आणि ब्रह्म यांचे प्रतिपादन करणारा ईश्वरप्रणित, अपौरूषेय, विश्वसनीय आणि प्रमाणात्मक जो ग्रंथ त्याला वेद म्हणतात. वेद चार आहेत.

१) ऋग्वेद - चार वेदांपैकी एक मोठा व अतिप्राचीन ग्रंथ. यात आठ अष्टके व चौसष्ट अध्याय आहेत. तसेच ऋचा (म्हणजे ऋग्वेद सूक्तातील एक मंत्र. वेदातील मंत्र) असलेली दहा मंडले आहेत. यज्ञामध्ये हवि (होमात टाकण्याचे द्रव्य इ.) सेवनानासाठी देवांना 'आवाहन' करणे हे ऋग्वेदाचे कार्य.

२) यजुर्वेद - चार वेदांपैकी हा दुसरा वेद . याच्या ८४ शाखा आहेत. याचे कृष्ण व शुक्ल यजुर्वेद असे दोन भाग आहेत. यात यज्ञकांडाबद्दल माहिती आहे. देवतांना हवि अर्पण करणे हे यजुर्वेदाचे कार्य.

२.१) शुक्ल यजुर्वेद - हा वेद याज्ञवल्क्याने रचिला. या संहितेत केवळ मंत्रच आहेत. काण्व व माध्यंदिन अशा दोन मुख्य शाखा आहेत.

२.२) कृष्ण यजुर्वेद - याचे पुष्कळ भेद आहेत. आपस्तंब म्हणजे यजुर्वेदाच्या तैत्तिरिय शाखेच्या चार सूत्रापैकी एक सूत्र - एक शाखा - ' आपस्तंब' नावाच्या महर्षींनी ही सूत्रे लिहिली . हिरण्यकेशी कोकणस्थांना आपस्तंब म्हणण्याचा प्रघात आहे.

३) साम वेद - सामगान करून देवांना संतुष्ट करणे हे सामवेदाचे कार्य.


४) अथर्ववेद - वेद विधीवर देखरेख करून ते निर्दोष पार पाडणे हे अथर्ववेदाचे कार्य.

चित्तपावन ब्राह्मण खाली दर्शविल्याप्रमाणे वेदांचे अनुयायी होत.

वेद	शाखा	सूत्र
ऋग्वेद	शाकल	आश्वलायन
कृष्णयजुर्वेद	तैत्तिरिय	हिरण्यकेशी

आश्वलायन व हिरण्यकेशी या दोघांचा निर्देश व्यवहारात 'ऋग्वेदी' व 'आपस्तंब' या शब्दांनी करतात. त्यामुळे एक शाखेच्या वेदाचा व दुसऱ्या शाखेच्या सूत्राचा निर्देश केला जातो. (सूत्र म्हणजे मोजक्या शब्दात संपूर्ण कल्पना देणारे नियम)

हल्लीच्या चित्तपावनांचे पणजे / निपणजे हे भिक्षुकीवर निर्वाह करीत व त्यांना कोणत्या वेद शाखेचे अध्ययन करावे लागत असेल याचा बोध करीत तपशीलावरून कळतो. सांप्रत काळात, असंख्य चित्तपावन - भिक्षुकीऐवजी व्यवसाय अगर नोकरीत गुंतल्यामुळे, वेदशाखांचा उल्लेख गौण झाला आहे. तो स्वाभाविकच होय !



चित्तपावनांचे कुलाचार

- सौ. मंगला जोगळेकर

चित्तपावनांचे प्रमुख कुळाचार आजपर्यंत चालत आलेले आहेत. त्या पैकी म्हणजे बोडण, गोंधळ, गौरी - गणपती, नवरात्र व देव दिवाळी हे प्रमुख कुळाचार म्हणून केले जातात.

१) बोडण - बोडण हा शब्द वर्धन या संस्कृत शब्दापासून आलेला आहे. कुटुंबाची वृद्धि म्हणजेच वर्धन म्हणजे वंश वाढल्यानंतर बोडण भरून देवीला (शक्ती) तृप्त करणे.

बोडण हे मंगळवार, शुक्रवार, रविवार या दिवशी चांगला दिवस पाहून भरले जाते. चैत्र महिन्यांत गौरीचा उत्सव हा अन्नपूर्णेचा उत्सव म्हणून या महिन्यात बोडण भरत नाहीत. तसेच पौष महिना, व चातुर्मासात बोडण भरत नाहीत. घरातील व्यक्तीचे निधन झाल्यास वर्षभर बोडण भरत नाहीत. तसेच घरात गर्भवती असल्यास सहा महिन्यानंतर बोडण भरीत नाहीत.

बोडण हे काही कुटुंबात वेगवेगळ्या वेळी भरण्याचा प्रघात आहे. कोणाकडे दरवर्षी, तर काही कुटुंबात नवरात्रानंतर दसऱ्याच्या दिवशी बोडण भरून मगच देवीला देव्हाऱ्यात ठेवतात, तर काही कुटुंबात मुलाचे वा मुलीचे लग्न झाल्यावर बोडण भरतात. काही कुटुंबात जन्माचे (म्हणजे मूल जन्माला आल्यानंतर बोडण भरतात.)

बोडण भरण्याची पध्दत घरातील मुख्य सुवासिनी स्त्री, कुटूंबाबाहेरील तीन सुवासिनी व एक कुमारिका (नाक टोचलेली व १० वर्षे वयाच्या आतली) अशा पाच जणींनी मिळून हे बोडण भरावयाचे असते. तीन सुवासिनी म्हणजे महाकाली, महालक्ष्मी व महा सरस्वती यांची रूपे व कुमारिका म्हणजे नवदुर्गेचे रूप मानले जात असावे असे वाटते.

यात सासू - सुन, आई - मुलगी, जावा -जावा, बहिणी - बहिणी, नणंद - भावजय शक्यतो नसाव्यात.

सुवासिनींच्या घरी जाऊन त्यांना तेल व शिकेकाई देऊन आमंत्रण दिले जाते. बोडणाच्या दिवशी लवकर उठून केरवारे, सडा रांगोळी करून सुचिर्भूत होऊन बोडणासाठी लागणारी सर्व तयारी करून ठेवावी. या साठी जेवणात पुरण, खीर, वडे, हे प्रामुख्याने असावे. बाकी स्वयंपाक नेहमीप्रमाणे असावा. ज्या ठिकाणी बोडण भरावयाचे असेल तेथील जागा स्वच्छ करून, पुसून त्यावर बोडणाची रांगोळी काढून त्यावर पाट ठेवून त्यावर अक्षदा ठेवून पितळी परात (कल्हई नसलेली) ठेवावी. बाजूला एका तबकात पुजेची तयारी हळद, कुंकू, अक्षदा, फुले, कापूर, उदबत्ती, निरांजन, गुळ, खोबरे, विड्याची पाने, पैसा सुपारी, पंचामृत, नैवेद्याला दुध - साखर, वेगवेगळ्या भांड्यात पंचामृत स्वतंत्र असावे. कणकेमध्ये थोडी हळद घालून पाच दिवे, देवीसाठी बसायला आसन (चौरंग) हरा डेरा त्यात थोडे दूध घालावे, मंगळसूत्र, जोडवी, वेणी, नथ, हार इ. दागिने कणकेचे करावेत, तसेच पाच जणींना वहाण्यासाठी पाच भंडारे करावेत.

बोडण हे दिवसाच्या दुसऱ्या प्रहरात भरावे (दुपारी १२ च्या आत) बोडणासाठी ५ नैवेद्य, देवाचा, व एक गोग्रास.

आलेल्या सुवासिनींच्या पायावर दूध पाणी घालावे, त्या आधी तुळशीला दूध पाणी घालून औक्षण करावे व ओटी भरावी. नंतर बाकी सुवासिनींना कुमारिकेसह पायावर दूध पाणी घालून हळदी - कुंकवाचे स्वस्तिक काढून त्यांना हळदीकुंकू लावून औक्षण करावे व पाटावर बसवून त्यांची ओटी भरावी (हल्ली जेवण झाल्यावर सोयीनुसार ओटी भरतात). घरातील मुख्य सुवासिनी पूर्व दिशेकडे तोंड करून बसते. तिच्या उजव्या बाजूस कुमारिका व बाकीच्या पाटाभोवती पाटावर बसतात. घरच्या सुवासिनीने देवी आणून ताम्हणात प्रथम सुपारीचा गणपती व नंतर देवीची पंचामृत पुजा करून परातीत आसन मांडून त्यावर देवी ठेवावी. तसेच पैसा सुपारी ठेवावी. गणपती देवीची पूजा चालू असते तेव्हा बाकीच्यांनी श्री सूक्त पठण करावे. देवीच्या मागील बाजूस हराडेरा ठेवावा. बाजूने ५ छोट्या पुरण पोळ्या करून त्यावर सर्व पदार्थ ठेवावेत व परातीत हे नैवेद्य केळीच्या छोट्या पानावर ठेवावे. गणपतीला व दैवीला गंध अक्षदा, फुले, दुर्वा, नैवेद्य दाखवावा. गणपतीला गूळ खोबरे देवीला दुधाचा नैवेद्य दाखवावा. नंतर कणकेचे अलंकार घालावेत व कणकेचे दिव्यात वाती घालून त्याला कुंकू लावून गणपतीची व देवीची आरती व बोडणाची आरती म्हणावी. त्या वेळी हातात भंडारा व अक्षदा असाव्यात आरती झाल्यावर दिवे परातीत ठेवावे. नंतर घरातील एका सुवासिनीने दूध घालावे. म्हणजे दिवे शांत होतील नंतर ओळीने पळीला सोन्याची साखळी गुंडाळून पळीने पंचामृत घालावे. (दूध, दही, मध, तूप, साखर) सर्व सुवासिनींनी ओंजळ करून दूध



हातावर घेवून परातीत सर्व कालवावे. तृप्त झाली का? असे कुमारिकेला विचारावे तिने हवे म्हणेपर्यंत काय हवे ते घालावे. देवी तृप्त झाल्यावर घरातील सर्वांनी देवीला नमस्कार करावा व त्यातील अंगारा लावावा. कुमारिकेकडून देवी काढून तिला पुरणाने स्वच्छ करून हळदकुंकू वाहून तोंडाला साखर लावून देवी देवांत ठेवावी. कालविलेल्या बोडणाचा कोणताच भाग अपवित्र ठिकाणी न ठेवता एका स्टीलच्या पातेल्यात घालावे. त्यातच बाकीच्या सुवासिनींने हातात पुरण घेवून थोड्या पाण्याने हात धुवावेत. हे सर्व एका गाभण नसलेल्या गायीला घालावे, अथवा वाहत्या पाण्यात सोडावे. बोडण भरलेली जागा थोडे पुरण साखर लावून नंतर पाण्याने स्वच्छ पुसावी. नंतर सर्वांनी सहभोजन करावे. म्हणजे व्रताची सांगता झाली.

बोडणाची पारंपारिक रांगोळी


२) गोंधळ - चित्तपावनांचा आणखी एक कुळाचार म्हणजे गोंधळ-घरात लग्न कार्य झाल्यावर देवीची पूजा करून देवीला प्रसन्न करण्यासाठी गोंधळ करण्याचा प्रघात आहे. आपल्या कुलदेवतेच्या कृपा-स्मरणाच्या साठी हा गोंधळ घालतात. गोंधळ घालण्यासाठी गोंधळींना बोलावतात. नव दांपत्याच्या हातून देवीची पूजा करून घेतात, व नंतर हे गोंधळी प्रथम गण व देवीचे स्तवन व पोवाडे म्हणून देवीला आमंत्रण करतात. तिची स्तवने म्हणतात. जेणे करून देवी प्रसन्न होवून आशीर्वाद देते, अशी भावना असते. हा गोंधळ रात्री करतात. शेवटी देवीची आरती करून सांगता होते.

३) गौरी गणपती - भाद्रपद शुद्ध चतुर्थीला गणपती बसवतात. आदल्या दिवशी अगर त्याच दिवशी गणपतीची सुरेख मूर्ती आणावी. गणपती जिथे स्थापन करायचा ती जागा स्वच्छ करून तिथे आरास करावी. गुरूजींकडून षोड्षोपचार पूजा करून आरती करावी. काही कुळांमध्ये दीड दिवसांचा काहींच्या कडे गौरी गणपती बरोबर असे असते. रोज सोवळ्यातच (स्वच्छ सुचिर्भूत) पूजा करावी. रात्री आरती करावी व नैवेद्य दाखवावा. गणपतीला उकडीच्या मोदकांचा नैवेद्य दाखवावा. रीती प्रमाणे दीड दिवसांनी, पाच, सात दिवसांनी गणेशमूर्तीचे जलाशयात यथाविधी पूजा करून विसर्जन करतात.

गौरी - चित्तपावन लोकांमध्ये खड्याच्या गौरी असतात. पाणवठ्यावरून पाच खडे विधीवत गौरीचे आगमन अनुराधा नक्षत्रावर, जेष्ठा नक्षत्रावर पूजा व मुळ नक्षत्रावर विसर्जन केले जाते. घरातील कर्त्या सुवासिनी या गौरी बसवतात. घर स्वच्छ झाडून रांगोळी काढून तुळशी वृंदावनापासून अगर दारापासून गौरी बसवायची त्या जागेपर्यंत पावले काढली जातात. आपापल्या रितीप्रमाणे रांगोळीची अथवा गंधात थोडे कुंकू घालून लक्ष्मीची पावले काढली जातात. ऐपतीप्रमाणे तांब्याच्या चांदीच्या वाटीत रेशमी वस्त्र घालून त्यात पाषाणरूपी गौरी ठेवून त्यांचे घराशी आगमन होते तिथेच जिने गौरी आणल्या तिच्या पायावर दूध पाणी घालून देवीवर हळदी कुंकू व सुवासिनीला हळदीकुंकू लावून औक्षण करून घरात घ्यावे. धन, धान्य, कृषी, यश, पुत्र - पौत्र कल्याणकारी ऐहिक रूपाने लक्ष्मी घरात येते. असा समज आहे. देवी देवघरात ठेवावी. दुसरे दिवशी सवाष्ण जेवायला सांगून देवीच्या नैवेद्यासाठी घावन घाटले असते. बाकी स्वयंपाक नेहमीप्रमाणे असावा. वरण - भात, लिंबू , चटणी, भाजी, कोशिंबीर इ. तिसऱ्या दिवशी गौरी मूळ नक्षत्रावर विसर्जित करतात.

४) नवरात्र - अश्विन शुध्द प्रतिपदेपासून नवमी किंवा दशमीपर्यंत नवरात्रोत्सव साजरा केला जातो. ही शक्ती पूजा आहे. देवघरातच देवीचा टाक अथवा मूर्ती चांदीच्या वाटीत वस्त्र ठेवून त्यावर अक्षदा ठेवून त्यावर शोड्षोपचार पूजा करून देवी ठेवावी व रोज १ माळ या प्रमाणे माळ घालावी. तसेच तेलाचा दिवा सतत तेवत रहावा याची काळजी घ्यावी. शक्य असल्यास उपवास करावेत. कुणाकडे धान्य फराळ, किंवा उपवास किंवा १ दिवस उपवास रिवाजाप्रमाणे करावेत. घरात कोणतेही धार्मिक कार्य असेल त्या वेळी व्रतस्थ असावे. काहींच्या घरी नवमीच्या दिवशी उद्यापन असते तर काहींच्या घरी नऊ दिवसांनी दसऱ्याला बोडणातच देवी घेवून नंतर ती देवात बसते. उद्यापनाला कुमारिका, सवाष्ण, ब्राम्हण रिती प्रमाणे भोजनास बोलवावे. पुरणाचा नैवेद्य असावा. नवरात्रात नऊ दिवस कुमारिका पुजन, सुवासिनी पुजन असते.

चित्तपावन कुटुंबियांमध्ये नवरात्रातील अष्टमीच्या दिवशी महालक्ष्मीची पूजा केली जाते. ही पूजा सर्वांच्या घरी असतेच असे नाही. लग्न झाल्यावर पाच वर्षे ही पूजा केली जाते. एखाद्या मंदिरात किंवा संस्थेच्या जागेत ही पूजा केली जाते. मुळासकट दुर्वांचा तातू, १६ पदरी रेशीम घेवून त्याला जितक्या वर्षाची पूजा असेल तेवढ्या गाठी मारून तो तातू व खडा याची पूजा असते. पाषाणरूपी देवी स्वरूपाची पूजा केली जाते. शोड्षोपचार पूजा केली जाते. व रेशमाचा तातू हा हातात बांधायचा असतो. संध्याकाळी तांदूळाच्या उकडीचा मुखवटा केला जातो व तो देवीच्या सांगाड्यावर बसविला जातो. हा



सुचिर्भूत होवून करावा लागतो. तिन्हीसांजेला मुखवटा उभा करून तिची प्राण प्रतिष्ठा करून पूजा केली जाते. सकाळी सुवासिनींनी हातात बांधलेला तातू संध्याकाळी देवीच्या पायावर वहायचा असतो. व त्या वेळी धुपवलेल्या घागरी फुंकल्या जातात. सुवासिनी फेर धरून देवीची गाणी, जोगवा इ. म्हणतात. रात्री १२ वा. आरती करून मुखवट्याचे विसर्जन जलाशयात करतात.

५) देव दिवाळी – चित्तपावन ब्राम्हणाखेरीज हा उत्सव कोठेही आढळत नाही. प्रत्येक कुळातील कुलदेवता व इष्टदेवता, ग्राम देवता, स्थान देवता, वास्तू देवता, गावातील इतर महत्त्वपूर्ण अशा देवता उपदेवता तसेच महापुरूष तसेच निम्नस्तरीय देवतांना त्यांचा मानाचा भाग पोहोचवणे म्हणजे देवदिवाळी. मार्गशीर्ष प्रतिपदेस देवदीपावली असते. प्रतिपदेपासून अमावस्येपर्यंत सोयीने एकाच दिवशी करावा.

आषाढी एकादशी ते कार्तिकी एकादशी पर्यंत चातुर्मास पाळला जातो तेव्हा देवांची रात्र समजली जाते. कार्तिकी एकादशीनंतर येणारी प्रतिपदा म्हणजे मार्गशीर्ष प्रतिपदा देवांची रात्र संपल्यामुळे देवभूमीवर आनंदोत्सवाचा दिवस, म्हणून ही देवदिवाळी आपल्याला ग्रामदेवता, कुलदेवता, स्थानदेवता या सर्वांचे स्मरण असावे. पूर्वजांच्या व देवतांच्या करिता हा नैवेद्य समर्पणाच्या नमित्याने ही आठवण जागृत ठेवणे हा या कुळाचारामागचा हेतू आहे. आपली कुलदेवता, कुलदेव यांचे विस्मरण होवू नये या मागचा हा हेतू असावा. कुळाचे रक्षण करण्याऱ्याचे नेहमीच आठवण ठेवावी. विस्मरण होवू नये. त्यासाठी देवदिवाळी.

याचा शास्त्रोक्त विधी करावयाचा असल्यास त्याचा विधी असतो. हा कुळाचार फक्त चित्तपावनाच्या जातीमध्येच प्रचलित आहे.

(संकलन) - सौ. मंगला जोगळेकर
संपर्क - २५०९५५५ ,९९२२९३९१८६

संस्थेची पहिली वास्तू

(कै. वामनराव दाते यांनी सांगितलेली आठवण)

असंभवं रोप्य गृहस्यजन्मं संधोःलुभे ग्रहाय। सदैव तत् प्रददाति रौप्यमुद्राः स्पृहणीयं तु दैवम् शुभमंगलानाम् ।

संघाच्या स्थापनेनंतर कार्यालयाकरता येथील प्रख्यात सावकार श्री. विश्वनाथ गणेश परांजपे यांनी संस्थेचे कार्यालयासाठी नाममात्र म्हणजे एक आणा महिना भाड्याने गोपाळबुवाचा मठ दिला होता. ही जागा लहान असल्यामुळे कार्यकारी मंडळाच्या व इतर सभा पदाधिकाऱ्यांच्या घरीच भरत असत. पुढे रावबहादुर आठवले यांनी सरदार पेठे यांची जागा रिकामी असल्याचे सांगून ती जागा कार्यालयासाठी भाड्यांनी मिळविणेसाठी खटपट करणेस सांगितले. श्री. पेठे यांनी ती जागा संस्थेस भाड्याने दिली. तेथे कार्यालय ८ -९ वर्षे होते. नंतर श्री. सच्चिदानंद पाटणकर यांनी गोळे वाडा विकावू असल्याचे सांगितले. कार्यकारी मंडळाची सभा संपल्यानंतर कार्यकारी मंडळाचे ६ सदस्य कै. विष्णूपंत पेंडसे, कै. सच्चिदानंद पाटणकर, कै. वि. वा. केळकर (वकील), श्री. पुरूषोत्तम दत्तात्रय देवधर, श्री. विनायकराव परांजपे व मी (वामनराव दाते) असे वाडा पहावयास गेलो. वाडा अत्यंत वाईट स्थितीत होता. पण आम्हाला तो सर्वांना पसंत पडला व तेथे आम्ही शक्य तितक्या लवकर पुण्यास जाऊन वाडा खरेदी करण्याचे ठरविले. लगेच सोमवारी सहाही जण पुण्यास गेलो. तेथे मंगळवारी सौ. पद्मा गोळे व त्यांचे पती यांची भेट घेऊन वाडा रू ७१०० /- ला विकत घेण्याचे ठरविले. कायदेशीर सल्ला म्हणून आम्ही प्रख्यात वकील श्री. ल. रा. तथा तात्यासाहेब गोखले यांना भेटावयास गेलो. तेथे त्यांचे असिस्टंट श्री. ताम्हनकर वकील हे भेटले. त्यांनी गोखले वकील - म्हणून बरीच रक्कम सांगतील असे सांगितले. तरीही आम्ही श्री. गोखले यांचे जवळ साठेखतासाठी कागदपत्र देण्यास सांगितले. दुसरे दिवशी आम्ही गोखले यांना भेटावयास गेलो त्यांनी माझी फि तुम्हाला परवडेल काय? असे विचारले त्यावर आम्ही ' आपली काय फी आहे ते आम्हाला सांगा.'' असे सांगितले त्यांनी कागदपत्र तयार करून देईन, परन्तु त्यांत माझे संमतीशिवाय काहीही फेरबदल करता येणार नाही व हीच माझी फी राहील असे सांगितले, आम्ही यास संमती दिली. आठ दिवसातच हा सर्व व्यवहार आम्ही पूर्ण केला.






॥ बोडणाची आरती ॥

॥ जय अंबे जय अंबे, जय आंबा माते, आज मी तूजला बोडण भरीते॥ धृ ॥
मंगल दिवशी मंगळवारी येईन ग अंबे माज्या तू घरी
शुद्ध भूमिवरी पाट रांगोळी बोडणाची बघ मांड मांडीते ॥१॥
कोल्हापूरच्या महालक्ष्मी, तूळजापूरच्या तुळजाभवानी
माहूरगडाच्या रेणूका राणी,
बोडणासी या तुम्ही साऱ्या जणी, सर्वही असती तूझीच रूपे ॥२॥
गजानना ते प्रथम पुजूनी, पंचामृत ते तुजला घालोनी
अर्गज अत्तर तुजसी लाऊनी, अुष्ण जलानी तुजला नहावीते॥३॥
पीठमय सिंहासनी तुज बैसवोनी,
हरा डेरा मांडीन दूध घालोनी, चारी बाजूला खांबे हे छान
पिटाचे अलंकार तुजला अर्पिते ॥ ४ ॥
हळद कुंकूम सौभाग्य लेणं, सुवासिक पुष्पे आणिली जाण
दक्षिणा सुपारी, तांबुल पान, धूप दिप नैवेद्य छान
अर्पण करीत तूज मी माते ॥ ५॥
चांदिच्या ताटात नैवेद्य तुजला, कोशिंबीर खिर भाज्या पुरण पोळीला
लिंबू चटणी, तूप वरण भाताला धाव धाव अंबे तुज विनवीते ॥ ६ ॥
दूध दही तूप मध शर्करा घालिते तूजला भराभरा
सुवासिनी कुमारिका आल्या आज घरा
भोजन देऊन ओटीही भरिते ॥ ७ ॥
शांति दयेची तू ग माऊली, आम्हा सर्वांची तुज माऊली
गोड करूनी घे सेवा जी झाली
चुकले माकले क्षमा मागते ॥८॥
काय वानू मी तुझी किर्ती, ठाव देई माते तव चरणी
पंचप्राणानी आरती करते ॥ ९ ॥
॥ जय अंबे जय अंबे, जय अंबा माते, आज मी तुजला बोडण भरीते ॥ धृ ॥

चित्तपावनां विषयी विविध मान्यवरांचे विचार

- काशीचे ब्राह्मण मत्सराने चित्तपावन म्हणजे चितेतून पावन झालेले असे म्हणतात. ते सत्य आहे पण एका वेगळ्याच अर्थाने होय. बौद्धांच्या प्रभावाने चितेवर पडलेली वैदिक परंपरा ज्यांनी राखली आणि चारही वेदांचे अध्ययन सुरक्षित राखले, असा तो अर्थ आहे. आणि रूपाने म्हणाल तर चित्तपावन स्त्रिया ग्रीक महिलांच्या चुलत बहिणी शोभतील अशा असतात. (सर जॉर्ज बर्डवुड, प्रशासक, विचारवंत १९ वे शतक)
- चित्तपावन लोक हे स्वच्छतेचे इतके आग्रही की, ते नेहमीच नुकतेच आंघोळ करून आलेले असे दिसतात. (खुशवंत सिंग, पत्रकार यांची प्रतिक्रिया.)
- आर्यत्वाचे सर्व विशेष अजून ज्यांच्यात आढळतात अशी एकच जाती म्हणजे चित्तपावन ब्राह्मण (सुनीतीकुमार चटर्जी, वंशशास्त्रज्ञ).




TATATISCON


TATATISCON



अन्नपूर्णेची आरती

(चाल -ॱ ओम जय जगदीश हरे, स्वामी जय जगदीश हरे)

जय अन्नपूर्णा माते । जय अन्नपूर्णा माते।
पंचारती ओवाळू तूज । देई सौख्या ते ॥ धृ।।

शुर्चिभृत आम्ही नारी। सवे घेऊनी बाला।
अलंकार वस्त्राने सजलो। तूझीया पूजनाला॥ १॥ जय....

रांगोळीने चौक रेखूनी । वरी परात ठेवियली।
वरण-भात शाखा वाढूनी । बहू पक्वाने सजली॥ २॥ जय....

प्रथम करोनी गणेश पूजन । आरंभ तव पूजनाला।
पंचामृत घालोनी स्नान। लावू सुगंधाला ॥ ३ ॥ जय....

दिव्यासनू तूज बसवूनी । हळद-कुंकू लावू।
गंध, पुष्प, अक्षदा वाहूनी । लेणी तूज घालू ॥ ४॥ जय...

गोठ, पाटल्या, मंगळसूत्र । कर्ण भूषणे मोत्यांची।
चंद्रहार, तन्मणी, बिंदी । जोडवी सोन्याची ॥ ५॥ जय....

भाव-भक्तीने नमन करोनी । ओवाळू पंचारतीला ।
अन्नरसामध्ये तृप्त होऊनी । दे सौभाग्याला ॥ ६।। जय.....

अनंत ब्रम्हांडाचीच स्वामिनी । शक्ती दायिनी माते
बोडण स्विकारी आमुचे । वरदायी माते ॥ ७ ॥ जय....

जय अन्नपूर्णा माते। जय अन्नापूर्णा माते।
पंचारती ओवाळू तूज । देई सौख्याते ॥ ८ ॥ जय.....

सौ. मालती जोगळेकर
त्र्यंबकेश्वर

चित्तपावनां विषयी विविध मान्यवरांचे विचार

- या देशातील सर्व लोक वादळांत वाहून जातात. शेंडी तुटो वा पारंबी तुटो, या निर्धाराने भक्कमपणे उभी राहणारी ही एकच जात आहे. (भारतरत्न डॉ. आंबेडकर)
- गरिबीतही स्वाभिमानाने जगणे हा यांचा स्वभावविशेष आहे. भारतात असे एकही रणक्षेत्र नाही की, जिथे चित्तपावन रक्त सांडले नाही. (डॉ. मुंजे).
- मराठ्यांच्या इतिहासातील अठरावे शतक म्हणजे चित्तपावन कर्तृत्वाचा कालखंड असे म्हणता येईल. (डॉ. क्षितीशचंद्र सेन-बंगाल इतिहासकार).
- नैषेधीय टीकेच्या शेवटी चंदू पंडित स्वतःविषयी लिहितो -
  यो वाजपेय यजनेन बभूव सम्राट्, कृत्वा बृहस्पतिसवं स्थपतित्वमाप
  यो द्वादशाहयजनेनऽग्निचिदप्यभूत, श्री चंडु पंडितमिमां विततान टीकाम् ॥
  तेराव्या शतकामध्ये गोध्रा (गुजरात) येथील चंडू पंडित यांनी लिहिलेल्या ग्रंथात वाजपेयासहित आपण कोणकोणते मोठे यज्ञ केले याचा उल्लेख आहे, परंतु यज्ञसिद्ध नावे जशी कोकणस्थांत प्रचलित आहेत, तशी ती गुजरातमध्ये प्रचलित झाली नाहीत. कारण नंतर मुसलमानी आक्रमणामुळे तेथील यज्ञसंसथाच विलुप्त झाली.





कुलवृत्तान्त चित्तपावनांची खासियत

- सुधीर दामले

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक संग्राह्य ग्रंथालयात असलेल्या विविध कुलवृतांत वाचतांना चित्तपावन ब्राह्मण समाजात याला विशेष महत्व आहे असे जाणवल्यामुळे कुलवृतांत म्हणजे काय, त्यांची आवश्यकता यावर विचार मांडण्याचा प्रयत्न या लेखातून केला आहे.

कुलवृतांत कशाला-कुलवृतांत तयार करावा का नाही, त्यांचा उपयोग काय त्यातून वेगळेपणे निर्माण होईल कां? आत्मप्रौढी वाढील लागेल का? असे अनंत प्रश्न कुलवृतांत तयार करणाऱ्यापुढे कायम उभे राहतात. हिंदू धर्मामध्ये वार्षिक श्राध्द करून पूर्वजांना स्मरण करण्याचा रीवाज आहे. हा जरी धार्मिक विधी असला तरी दिवंगतां विषयी श्रध्दा व्यक्त करून त्या वक्तीच्या जीवनापासून स्फूर्ती घेण्याची यात मूलभूत कल्पना आहे. म्हणून कुलवृत्तांत म्हणजे दिवगंतांचे स्मरण आहे तर त्यात विद्यमानांची नोंद असते.

ब्रह्मचर्य महत्त्वाचे असले तरी कोणत्याही समाज रचनेत कुटुंबव्यवस्था महत्त्वाची असून भारतीय समाजात गृहस्थाश्रम हा समाजाचा आधार मानला आहे. आधुनिक काळात चीनमध्ये कम्युनची कल्पना प्रत्यक्षात आणून कुटुंब व्यवस्था निकालात काढण्याचा प्रयत्न झाला तर ऐतिहासिक. मुलांना एकत्र आणून शिक्षित करण्याचा उपक्रम झाला. पण असे प्रयत्न असफल ठरून कुटुंबव्यवस्थाच सफल ठरली. म्हणून कुटुंबाचे व कुलाचे यथातथ्य ज्ञान असणे उपयुक्त मानले पाहिजे.

कुलवृतांताची आवश्यकता - कोणताही समाज हा अनेक कुलांचा समूह असतो तेव्हा राष्ट्राच्या इतिहास लेखनाला घराण्याचे इतिहास अनेक वेळा उपयुक्त ठरतात. पाश्चात्य देशात तर घराण्यांचे इतिहास परीश्रमपूर्वक व काटेकोरपणे लिहिले गेले आहेत. परदेशांत अशा वंशावळी लावून देणाऱ्या अनेक संस्था आहेत. ख्रिश्चन कुटुंबाच्या घरी बायबल असतो व ज्यांच्या शेवटच्या पृष्ठावर त्या घरातील व्यक्तींचे जन्म, मृत्यू व कुटुंबातील ठळक घटनांची नोंद करण्याची पध्दत आहे. आपल्याकडे काही वतनदार व सरदार घराण्यातील बखरी प्रसिध्द आहेत.

सत्यांची योग्य जाणीव होण्यास स्वकुळाचा पूर्व इतिहास माहिती असणे पुर्वजांविषयी पूज्य भाव व कुळाभिमान असणे हा मनुष्यमात्राचा स्वभावधर्म आहे. आपले पूर्वज ज्यांचे गुणविशेष, राहण्याचे मूळ स्थान, कुळाचे आराध्य दैवत, कुलस्वामी, पूर्वापार चालत आलेले कुलाचार इ. माहिती वंशावळ व सर्वत्र विखुरलेल्या कुलबंधूंचे परीचयवृत्त या सर्वांचा समावेश असलेला ग्रंथ म्हणजे कुलवृत्तांत.


१९१४ साली आपटे घराण्याचा इतिहास प्रकाशित करून कुलवृतांत लेखनाचा पाया रचिला म्हणून कुळवृत्तांत लेखनांचे हे आद्य प्रवर्तक होत. आजपर्यंत जवळ जवळ सव्वाशे कुलवृत्तांत प्रसिध्द झाले आहेत यात सर्वाधिक कुलवृत्तांत चित्तपावनांचे ब्राह्मणांचे आहेत.

कुलवृत्तांताचे काम हे अतोनात कष्टाचे व चिकाटीचे आहे. जुने कुलवृतांत पाहिले तर त्यात काम करणाऱ्या मंडळींना या संदर्भात किती अडचणी आल्या असतील हे समजून येते. तसेच पुष्कळशा कुलवृत्तांतील हिशोब पाहिला तर आर्थिक अडचणी किती तीव्र होत्या हे कळून येईल. पण २१ व्या शतकात अशा प्रकारचे काम करणे सोईस्कर झाले आहे. त्याचा प्रत्यय येतो तो म्हणजे दामले कुलवृत्तांताची दुसरी आवृती काढण्याचे काम सध्या चालू आहे व दामले कुलवृतांताची पहिली आवृत्ती वेबसाईटवर सर्वांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच देवधर, दीक्षित, ढमढेरे यांचेही कुलवृत्तांत सीडीमध्ये उपलब्ध आहे.

ज्या चित्तपावन कुळांचे कुलवृत्तांत प्रकाशित झाले नसतील व ज्यांना कुळवृत्तांत तयार करण्याचा विचार असेल अशांसाठी चित्तपावन दर्शन लेखक श्री. ल. टिळक यांच्या पुस्तकांत यावर सविस्तर माहिती मिळू शकेल तसेच व्यक्तिगत माहिती वंशावळ माहीतीपत्रक कसे असावे व कुलवृत्तांत कसा असावा काय माहिती अपेक्षित आहे या संदर्भात माहितीसाठी अत्यंत उपयुक्त आहे.

कुलवृत्तांत म्हणजे काय याची आवश्यकता काय हे पाहिले की असे लक्षात येते की कुलवृत्तांतामुळे प्रत्येक कुटुंबाशी सर्वांचे आपलेपणाचे नाते जोडले जाते. ज्याप्रमाणे कुटुबातील व्यक्ती सर्वांची काळजी घेते त्याप्रमाणे आपल्या कुळातील गरजू व्यक्तींना मदत, सहकार्य, आपल्या कुळदेवतांच्या मंदिरांचे जिर्णोध्दार केला पाहिजे व अशी सहकार्याची भावना कुळांत जोपासण्यात यावी हाच कुलवृत्तांताचा मूळ हेतू असतो. कुलवृत्तांचा अशा सर्व गोर्ष्टीचा विचार केली की, कुलवृत्तांतची आवश्यकता आपल्या लक्षात येते. आपल्या संदर्भ ग्रंथ दालनांत विविध कुलांचे कुलवृत्तांत माहीतीमध्ये उपलब्ध आहेत. आपल्याही कुलांचे असे कुलवृत्तांत प्रकाशित झाले असल्यास ते संस्थेकडे दिल्यास सर्वांसाठी उपलब्ध होतील.





कुलसंमेलने कशासाठी

- दि. र. बर्वे

सध्या बऱ्याच कुळांची संमेलने नियमित होत असतात. काही कुळे दर वर्षी संमेलने भरवतात, काही दोन वर्षांनी तर काही चार वर्षांनी भरवतात. कर्नाटकात चित्तपावनांची संख्या मर्यादित असल्याने तेथे कुलसंमेलन भरत नसून विभागवार सर्व चित्तपावनांची संमेलने दरवर्षी भरतात व दर चार वर्षांनी ते महासंमेलन भरवतात.

या कुळ संमेलनाच्या इष्टतेबद्दल व उपयुक्ततेबद्दल पुष्कळ उलट सुलट विचार ऐकू येतात. काही असे म्हणतात की जग येवढे लहान होत आहे की कुलसंमेलन भरवणे म्हणजे कालचक्र उलटे फिरवण्याचा प्रयत्न करणे. काहींच्या मते कुलसंमेलने हे संकुचित वृत्तीचे द्योतक आहे. समाजाच्या मोठ्या प्रवाहात सामील होण्याऐवजी आपण लहान - लहान डबकी करीत आहेत. त्याने इष्ट काहीच साधणार नाही. तेव्हा या विषयी नीट विचार करण्याची जरुरी आहे. प्रथम एक लक्षात ठेवले पाहिजे की मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. तो पूर्वीपासून कळपाने राहणारा आहे. त्याला आपल्या वाटणाऱ्या माणसांमध्ये रमण्याची गरज आहे. ५० /६० वर्षी कुटुंबे मोठी असत. घरात १० /१५ माणसे सहज असत. तेथे सुख-दुःखाची देवाण-घेवाण, मार्गदर्शन वगैरे मिळण्याची गरज भागत असे. दुसऱ्यासाठी झीज सोसण्याची वृत्ती कुटुंबांमध्ये सहजगत्या निर्माण होत आहे. आर्थिक मिळकतीचा वेगळेपणा दाखविला जात नसे. सर्वकुटुंब एकाच राहणीमानात असे.

विवाह/उपनयन समारंभाच्या वेळी बहुतेक कुटुंबे ८/१० दिवस एकत्र जमत . समारंभाची बहुतेक कामे सर्व सदस्य मिळून करीत असत. उन्हाळ्याच्या सुटीतही बरीच मंडळी मुलाबाळांसह एकत्र जमत असत.

आज परिस्थिती बदलली आहे. एकत्र कुटूंबपध्दती तर लोप पावलीच आहे. पण विभक्त कुटुंबातील सदस्य संख्याही ३ /४ वर येऊन ठेपलेली आहे. त्यातही बऱ्याच कुटूंबात स्त्रियाही अर्थार्जनानिमित्त बराच काळ बाहेर असतात. त्यामुळे कु टुंबातील सदस्यांचा एकमेकांशी सहवास, संवाद कमी झालेला आहे. वैचारिक देवाण-घेवाण नाही. सारखीच एकत्र राहणारे लोक पुष्कळवेळा एकमेकांशी मनात अढी ठेवून वागतांना दिसतात. कारण स्वभावातील कंगोरे दहा लोकांमध्ये घासले गेलेले नसतात, व तेच कंगोरे पुढे अस्मिता बनून दुसऱ्याशी जमवून घेण्यात अडथळे आणतात. उलट पक्षी व्यवहारात, नोकरीत स्पर्धा विलक्षण रीतीने वाढत आहे. उपजिवीकेच्या मार्गांची उपलब्धता खूपच कमी होत आहे. व्यवसायातील अपरिचित क्षेत्र, राहण्याची नवखी ठिकाणे ह्या गोष्टी वगैरेची चिंता, काळजी वाढत आहे. अशा वेळी खरे म्हणजे वैचारिक देवाण-घेवाण, मार्गदर्शन, सांत्वन, धीर देणे या गोष्टींची जास्तीत जास्त जरूरी होत आहे. त्याचे परिणामही आपल्यालाच भोगावे लागतात. उच्च रक्तदाब, मधुमेह, आम्लपित्त, निद्रानाशासारख्या अनेक व्याधी माणसाला भेडसावतात.

कुलसंमेलने या बाबतीत पुष्कळ दिलासा देऊ शकतात. कुलसंमेलनात जवळचे, लांबचे भाऊबंद भेटतात. आपण त्यांचेशी व्यवसाय सोडून दुसऱ्या गप्पा मारू शकतो. दुसऱ्यांच्या व्यथा जाणून घेऊ शकतो. दुसऱ्यांशी शेअर केल्याने कमी होते. मंदिरात गेल्यावर तेथील वातावरणात जसा मनुष्य काही काळ काळज्या विसरू शकतो, तसेच या संमेलनात होते.

कुलसंमेलनात येणारे निरनिराळ्या ठिकाणचे लोक, निरनिराळ्या वयाचे, राहणीमानाचे, व्यवसायाचे निरनिराळ्या यश अपयशाचे, आर्थिकदृष्ट्या निरनिराळ्या थराचे असतात. अशा सर्वांनी आपापले गंड विसरून एकमेकांशी समरस व्हावे, दिलखुलास व्हावे, विचारांची देवाण घेवाण करावी, संमेलनात जमलेल्या उद्योजकांनी होतकरू उद्योजकांना मार्गदर्शन करावे, सल्ला द्यावा, समाजातील गरजू लोकांनीही आपल्या समस्या मोकळेपणाने मांडाव्या व त्याचे निराकरण करवून घेण्याचा प्रयत्न करावा.

पूर्वी अनेक विद्यार्थी माधुकरी मागून, वार लावून शिकत. कित्येकांनी अशा तऱ्हेने उच्च शिक्षण घेतले आहे. संस्थानिक हे गरजू विद्यार्थ्यांना आश्रय देत असत. आज परिस्थिती बदलली आहे. पण आर्थिक मदतीची/ मार्गदर्शनाची जरूरी वाढत आहे. उपजीविकेचे शिक्षण महाग होत आहे. कुलसंमेलनात या सर्व व्यथा मांडल्या तर सामुहिकरित्या त्याचे निराकरण होऊ शकते. ब्राह्मण वर्ग हा मुख्यत्वे मध्यमवर्गीय व कनिष्ठ मध्यम वर्गीय आहे. वैयक्तिकरीत्या मोठी मदत देणे दुरापास्त आहे. पण सामूहिकरीत्या नक्कीच मदत होऊ शकते व होत आहे.

संमेलनाची या दृष्टीने खचितच उपयुक्तता आहे हे निःसंशय.





स्वातंत्र्यवीर सावरकरांची तेजस्वी विचार सूत्रे

संकलन ॲड. श्री. अविनाश जनार्दन भिडे

- मनुष्य जातीच्या सुखाला जे जे अनुकुल ते ते चांगले आणि जे जे प्रतिकुल ते ते वाईट अशी आपण निती - अनितीची स्पष्ट व्याख्या केली पाहिजे.
- आम्ही कोणताही धर्मग्रंथ त्रिकालाबाधीत, अपरिवर्तनीय म्हणून मानीत नाही. आपण आपल्या सारासारविवेक बुध्दीने पोथीतील खरे काय नि खोटे काय हे ठरवायला हवे.
- वेद, उपनिषदारी ग्रंथ काय नि बायबल - कुराणादी ग्रंथ काय हे सारे मनुष्यकृत होत. ते आदरणीय आहेत. पण ते परमप्रमाण नसावेत. त्यांचा अभ्यास करून त्यापैकी जे आजच्या विज्ञानाच्या कसोटीस उतरेल तेवढेच स्वीकारावे. मनुष्यहितास शाश्वक तेवढेच घ्यावे नि मनुष्यहितास बाधक ते सोडावे.
- सर्वच प्रकारचा धार्मिक भाबडेपणा नि लुच्चेगिरी यांच्या कचाट्यातून मानवी बुध्दीस सोडवून तिला मुक्त करणे हेच आमचे पवित्र धर्मकृत्य होय.
- धर्माभिमान म्हणजे काही विवेकशून्यता नव्हे. धर्मही कारस्थितीवश असला पाहिजे.
- ज्या ज्या रूढींच्या योगाने सामाजिक असा काही लाभ न होता मनुष्य जातीस निष्कारण त्रास होतो तो अधर्म होय.
- विज्ञानाची धर्माभूत मूर्ती म्हणजे यंत्र होय. हत्यार, बळ म्हणजे शतपटीने अधिकच कार्यक्षम झालेले मनुष्याचे एकेक इंद्रियच होय. ते मनुष्याला अतिमानुष करणारे विद्वानांचे वरदानच होय.
- विज्ञानाच्या नि तंत्र यंत्राच्या मागोमाग सामाजिक सुधारणाही दासीसारखी धावत आलीच पाहिजे.
- बेकारी यंत्रामुळे वाढते हे खरे नव्हे, त्यातून उत्पन्न होणाऱ्या संपत्तीच्या विषम वाटणीमुळे ती वाढते. दोष यंत्राचा नसून समाजरचनेचा आहे.
- धर्मस्वातंत्र्य म्हणजे तत्त्वज्ञान सांगायचं स्वातंत्र्य, संघटितपणं प्रचार करण्याचं स्वातंत्र्य नव्हे. देशाच्या एकतेला नि नेकीला विरोधी असे धर्म स्वातंत्र्य असूच शकत नाही.
- चमत्कारास नि नवसास देव पावला. ही दोन्ही नावे अज्ञानाचे प्रतिशब्द आहेत. ज्ञानाचे नव्हेत.
- जगात देवही माणसाच्या प्रार्थनेपेक्षा तोफांच्या तोंडातून येणाऱ्या प्रार्थनांकडे लक्ष देतो. भक्तांचे प्रत्यक्ष बळ हेच देवांचे शस्त्रबळ आहे.
- देवाचे गुण भक्तात उतरतात. गायीला देव मानता मानता आणि गायीची पूजा करता करता हिंदू राष्ट्रच गाय बनून गेलंय, त्याने गायीप्रमाणे दाती तृण धरले. आता जर कोणाच्या बाण्यावर आपले हिंदु राष्ट्र उभारायचे असेल तर सिंहाच्या बाण्यावर उभारले पाहिजे.
- देवभोळेपणाचे सारे ताईत, तावीज नि शिव्याशाप ज्या कवचावर चालू शकत नाही ते विज्ञानकवच आम्ही धारण केले पाहिजे.
- हिंदूंनी सामर्थ्यवान शांतता किंवा शांततेसाठी सामर्थ्य हा सिध्दांत लक्षात ठेवावा. नव्या-नव्या शस्त्रास्त्रांचे संशोधन करावे आणि त्यांच्या निर्मितीसाठी कारखाने चालवा. देश त्यामध्ये स्वावलंबी करा. दुर्बल पुण्याई ही पंगू आहे हे विसरू नये.
- हिंदूचे सैनिकीकरण करा. राष्ट्राच्या सीमारक्षणासाठी पुरेशी सेनादले ठेवा. देशाच्या सीमा निश्चित करा. तरूण पिढीस सैनिकी शिक्षण देण्यासाठी त्यांच्या पुरेशा शाळा काढा.
- प्रेयसीच्या केसातून फिरणारी बोटे जर बंदुकीच्या चापावरून फिरू लागली तर निश्चितच हिंदुस्थान जागतिक स्पर्धेत जगू शकेल.



- आपल्या न्याय्य पक्षाची कमीत कमी हानी होऊन, अन्याय्य पक्षाची जास्तीत जास्त हानी करण्यास जी युध्दकला झटते ती खरी युध्दकला होय.
- राष्ट्राची तलवार मोडून पडली की त्याचे लेखणी, कुंचळी नि त्याची वाणी ही सारी मोडून भंगून पडतात.
- आपल्या राष्ट्राची आजची मृत्यूंजय मात्रा म्हणजेच त्याचे शस्त्रबळ, साहित्य नव्हे.
- तुम्ही आधी शस्त्रे चालविण्यास शिका, मग त्याचा उपयोग केव्हा नी कसा करावयाचा हे प्रसंगानुरूप तुम्हाला समज ठरविता येईल.
- प्रथम देशाच्या राष्ट्राच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी नी पुढे ते मिळाल्यावर त्याच्या रक्षणासाठी मी तुम्हा युवकांना सेनादलात शिरा असे सांगत आलोय.
- आपण सक्तीचे सैनिकी शिक्षणाची मागणी केली पाहिजे.
- आव्हानांचा ध्वनी तेव्हाच काय तो प्रतिपक्षास भिववतो की जेव्हा त्याच्या मागोमाग थोपटल्या जाणाऱ्या भीमबाहूंचा दणदणाट त्याहून प्रबळ असतो.
- चिमण्यांची " आम्ही तटस्थ आहोत." अशी घोषणा केली तरी ससाणे त्यांच्यावर झेप घालण्याचे थोडेच सोडणार.
- बळी तो कान पिळी हा सिध्दांत अजून तरी या जगात कायम आहे. कोणाचा कान पिळण्यासाठी म्हणून नव्हे तर कोणी दुसऱ्याने आपणाला कानपिळी देऊ नये म्हणून तरी निदान आपण बळी - बलवान व्हावयास पाहिजे.
- आता ह्या ना त्या स्वरूपात पण हिंदू, हिंदुत्व नि हिंदुस्थानची प्रत्यक्ष सेवा तन,मन व धनाने घडेल त्या स्वरूपाचे यज्ञ म्हणजेच ज्ञानयज्ञ, कार्ययज्ञ करायला हवेत.
- राष्ट्राची संपत्ती, आरोग्य नि सामर्थ्य शेतकऱ्यांवर नि कामकऱ्यांवर अक्षरशः अवलंबून आहे. म्हणून त्यांचे जीवन सुखी करा.
- मनुष्याला पोट आहे, पण केवळ पोट म्हणजेच मनुष्य नव्हे.
- पाश्चात्यांच्या कंपन्या चालवितांना जी शिस्त नि व्यवस्था आढळते ती आपल्या लोकांनी उचलली पाहिजे.
- आपल्या आर्थिक धोरणाचे मुख्य सूत्र " वर्गहिताचा राष्ट्रहिताशी समन्वय" असेच असले पाहिजे.
- हिंदु धर्म परमसहिष्णू तर भारताबाहेरून आलेले मुसलमान , ख्रिश्चन धर्मादी लोक आक्रमक असून ते भय, मोह दाखवून सारे जग इस्लाममय / ख्रिश्चनमय करण्याचा प्रयत्न करीत आलेले आहेत. त्यात त्यांना यश आलंय. परिणामी हिंदू, हिंदुत्व नि हिंदुस्थान आजवर हटत घटत आलेत. हे विचारात घेऊन हिंदूंनी जागृत, संघटित नि आक्रमक / प्रत्याक्रमक व्हावयास पाहिजे, अन्यथा जगाच्या पाठीवर त्यांचा मागमूसही उरणार नाही.
- जर मुसलमान, ख्रिश्चन इत्यादी अहिंदू आपले वेगळेपण नि आक्रमकता सोडून मानवतेते विलीन होतील तर मीही हिंदूना मानवतेत विलीन होण्यास सांगेन.
- या विज्ञानयुगात समाजसंस्थेची संघटना करायची ती प्रत्यक्ष ऐहिक विज्ञाननिष्ठ तत्त्वावरच केली पाहिजे.

चित्तपावनां विषयी विविध मान्यवरांचे विचार

- ज्ञाती - ज्या गटातील सर्व व्यक्ती परस्परांना ज्ञात असतात, त्या गटाला ज्ञाती असे म्हणतात.
- श्री. तात्याराव सावरकरांचे उद्गार - चित्तपावन विद्यार्थी सहाय्यक संघ, रत्नागिरी याच्या प्रथम वार्षिक सभेच्यावेळी म्हणाले की, जेथे जेथे राष्ट्रनिष्ठ कर्तृत्वाचा स्फुल्लिंग आढळेल, तेथे तेथे त्याला चेतावणी देऊन कार्यप्रवण करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. या व्यतिरिक्त मी जन्माने चित्तपावन आहे आणि या सर्व ज्ञाती शतक दोन शतके राहणार आहेत. त्यामुळे या सभेचे आमंत्रण स्वीकारण्यात मला संकोच वाटला नाही.



चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक - अमृत महोत्सव सन १९३३ ते १९९६

संस्थेच्या जडणघडणीत मोलाचा वाटा

संस्थेच्या स्थापनेपासून आजवरच्या वाटचालीत पुढील कार्यकर्त्यांनी आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले.

सन १९३३ ते २००८ पर्यंतचे कार्यकारी मंडळ

	सन	अध्यक्ष
१)	१९३३ ते ३८	रामचंद्र सदाशिव आठवले
२)	१९३८ ते ५७	वि. गो. वैद्य
३)	१९५७ ते ६१	गणेश हरि पेठे
४)	१९६१ ते ६३	पु. ह. तथा काका गद्रे
५)	१९६३ ते ६५	रा. ज. अभ्यंकर
६)	१९६५ ते ६९	श्री. र. वर्तक
७)	१९६९ ते ७४	वा. व्य. मोने
८)	१९७४ ते ७८	र. के. पटवर्धन
९)	१९७८ ते ९४	द. अ. थत्ते
१०)	१९९४ ते ०२	प्रा. दिलीप फडके
११)	२००२ ते ०७	भरद्वाज रहाळकर
१२)	२००७ ते १२ (आजपर्यंत)	विजय साने

	सन	उपाध्यक्ष
१)	(संस्थापक, उपाध्यक्ष, अस्थायी समिती, १९३३)	नीलकंठ पांडुरंग पाटणकर कृष्णशास्त्री देवधर वैद्य माधवराव ना.जोगळेकर (त्रिंबक) श्रीधर गो. खरे वकील (सटाणा)
२)	१९३३ ते ३८	नी. पां. पाटणकर
३)	१९३८ ते ४२	वि. ग. परांजपे
४)	१९४२ ते ४४	वि. प्र. लिमये
५)	१९४४ ते ४८	नी. पां. पाटणकर
६)	१९४८ ते ५५	वि. ग. केळकर
७)	१९५५ ते ५७	गणेश हरी पेठे
८)	१९५७ ते ५९	रा. ज. अभ्यंकर
९)	१९६३ ते ६५	ज.पां. दांडेकर
१०)	१९६५ ते ६९	द. अ. थत्ते
११)	१९७० ते ७४	शं. पु. जोशी
१२)	१९७४ ते ७८	ग. श्री. दाबके
१३)	१९७८ ते ८०	योगेश्वर अभ्यंकर
१४)	१९८० ते ८२	अरूण वि. फाळके
१५)	१९८२ ते ८४	ग. वि. चिपळूणकर
१६)	१९८४ ते ८६	सूर्यकांत रहाळकर
१७)	१९८६ ते ९६	डॉ. दिलीप वाड
१८)	१९९६ ते २००७	विजय साने

	सन	कार्यवाह व कोषाध्यक्ष
१)	१९३३ ते ३८	प्रभाकर दामोदर रानडे दत्तात्रय बळवंत परांजपे
२)	१९३८ ते ४०	वि. ना. पेंडसे वा.मो. दाते
३)	१९४० ते ४२	शं. ना. रानडे ह. वि. थत्ते
४)	१९४४ ते ४६	वि. के. परांजपे स. वा. दातार
५)	१९४४ ते ४६	वि. के. परांजपे स. वा. दातार
६)	१९४६ ते ४८	वि. ना. पेंडसे वि.के. परांजपे
७)	१९४८ ते ५२	रा. त्र्यं. जोशी वि. के. परांजपे
८)	१९५३ ते ६३	वि. के. परांजपे ह. वि. केळकर
९)	१९६३ ते ६५	म. द. बेडेकर र. गो. दामले
१०)	१९६५ ते ६७	ह.म. गोखले ग. म. काळे
११)	१९६७ ते ६९	सु. ब. टकले भा. कृ. सहस्रबुध्दे
१२)	७० ते ७२	श. स. रहाळकर रा. ग. परांजपे



१३) ७२ ते ७४ ल. रा. बापट
रा. ग. परांजपे
१४) १९७४ ते ७६ ल. रा. बापट
वि. के. परांजपे
कृ. गो. नातू
१५) १९७६ ते ७८ सु. रा. वैशंपायन
द. अ. थत्ते
१६) १९७८ ते ८४ सूर्यकांत रहाळकर
प्रा. दिलीप बा. फडके
१७) १९८४ ते ८६ प्रा. दिलीप बा.फडके
भालचंद्र त्र्यं. काळे
१८) १९८६ ते ८८ प्रा. दिलीप फडके
रविंद्र वि. गोडबोले
१९) १९८८ ते ९० भारद्वाज रहाळकर
प्रा. दिलीप फडके
२०) १९९० ते ९२ डॉ. सुभाष साने
शिरीष बाळासाहेब बेहेरे
२१) १९९२ ते ९४ विजय रा. साने
भारद्वाज रहाळकर
२२) १९९४ ते ९६ अभय खरे
भारद्वाज रहाळकर
२३) १९९८ ते २००० अभय खरे
भारद्वाज रहाळकर
२४) २००२ ते २००२ भारद्वाज रहाळकर
अभय खरे
२५) २००२ ते २००७ अभय खरे
प्रा. दिलीप फडके
२६) २००७ ते २०१२ अभय खरे
(आजपर्यंत) श्रीरंग वैशंपायन

विश्वस्त मंडळ

(१९७६ साली घटना दुरूस्ती होऊन नियुक्ती झाली)

१) वि. अ. गोखले
२) वामनराव दाते
३) विनायकराव परांजपे (कार्यवाह)
४) प्रभाकरपंत मोडक
५) प्र. वा. खरे
६) डॉ. रा. वि. केळकर
७) ॲड ज. भ. भिडे
८) डॉ. र. वा. बिवलकर
९) श्री. विनायकराव काशीकर
१०) श्री. द. अ. थत्ते
११) श्री. प्रभाकर तथा बंडोपंत जोशी
१२) डॉ. श्रीकांत केळकर
१३) प्रा. दिनकरराव बर्वे
१४) कै. डॉ. दिलीप वाड
१५) प्रा. दिलीप फडके

कार्यकारी मंडळ सदस्य

कालानुक्रमे व एकदाच नावे दिली आहेत.

श्री. कृष्णशास्त्री देवधर वैद्य, वामनशास्त्री दातार, पुरूषोत्तम रामचंद्र वैशंपायन , वि. ग. गानू, लं. पां. सोमण, द. बा. टकले, द. रा. लिमये, ल. ह. घारपुरे, वि. भा. पटवर्धन वकील, कृ. ना. साठे, बा. के. दातार, वि. ग. परांजपे, वा. मो. दाते, श्री. र. वर्तक, द. ना. पाटणकर, शं. दि. अभ्यंकर, दे. अ. जोशी, का. ना. केतकर, वि.ना. पेंडसे, प. पू.आधारकर, प्र. दा. रानडे, ल. वि. जोशी, द. बा. परांजपे, वि. अ. लिमये, मु.चिं. बापट, गो. र. दातीर, र. ग. मेहेंदळे, त्र्यंबकर बळवंत दाते, दा. ल. साने, अंबादास देव जोशी, त्र्यं. वि. म्हसकर, स. वा. दातार, ल. दि. भाटे, त्र्यं. ह. गोगटे, शं. ना. रानडे, रा. वि. केळकर, त्रि. ब. खाडिलकर, पु. ह. देवधर, गं. बा. शेंडे, भ. शि. भिडे, न. गो. मनोहर, रा. त्र्यं. जोशी, ब. न. दुगल, ब. त्र्यं. पेठे, श्री. का. केतकर, श्री. य. फडके, प्र. द. लेले, वा. कृ. देवधर, बाळ बापट, पा. त्र्यं. वाड, सु. ब. टकले, लिलाताई रहाळकर, कृ. सी. चोळकर, प्र. शं. जोशी, शं. पु. जोशी, रा. पु. गानु, ग. म. काळे, पु.ल. भाटे, दा. य. कोल्हटकर, ह. म. गोखले, शं. न. मोडक, सौ. मिनाक्षीबाई मनोहर, कृ. गो. नातू, त्र्यं. पू. रानडे, सु. रा. वैशंपायन, र. दा. डोंगरे, द. अ. थत्ते, प्रा. ग. श्री. दाबके, डॉ. द. बा. डोंगरे, भरद्वाज रहाळकर, सुधाकर कृ. गाडगीळ, जीवन वैशंपायन, सौ. प्रभावतीबाई टकले, द. रा. कापरेकर, डॉ. दिलीप वाड, प्रा. योगेश्वर अभ्यंकर, प्रा. दिलीप बा. फडके, कु. कुमूद अभ्यंकर, विवेक पाटणकर, ना. गं. ओक, प्रा. र. ग. शारंगपाणी, पद्माकर कृ. सावरकर , वा. गो. भागवत, दि. न. खरे, जयंत दामले, ग. वि. चिपळूणकर, प्र. बा. घारपुरे, वि. वा. केतकर, श्री. वा. गो. भागवत, दि. न. खरे, सदानंद



जोशी, डॉ. सुभाष साने, रविंद्र गोडबोले, भालचंद्र त्र्यं. काळे, विजयकुमार साने, अनिरुध्द अभ्यंकर, सौ. जान्हवी वैशंपायन, द. चिं. घैसास, दिलीप वसंत मोडक, सौ. मंगला जोगळेकर, गिरीश वैशंपायन, डॉ. राजीव गाडगीळ, शिरीष बा. बेहेरे, अभय खरे, सौ. स्मिता आपटे, विवेक बापट, गिरीश नातू, नितीन सहस्त्रबुद्धे , सुधीर परांजपे, रघुनाथ गद्रे, मधुकर बापट, ॲड. अविनाश भिडे, प्रा. प्रभाकर केळकर, सौ. प्रतिभा पाटणकर, श्रीरंग वैशंपायन, नंदकुमार गोखले, हेमंत वाड, चंद्रशेखर रानडे, सुधीर दामले, शिरीष जोग, विद्यासागर जोशी, रणजित कोल्हटकर, सौ. धनदा देवधर.

हिशेब तपासनीस - अंतर्गत हिशेब तपासनीस

१) ग. गो. गाडगीळ २) गो. दा. आगरकर ३) प. पु. आधारकर ४) अनंत गुंडो गोखले रावसाहेब ५) रा. प्र. लिमये ६) पु. रा. वैशंपायन ७) श्री. र. वर्तक ८) र. त्र्यं. जोशी ९) ल. वि. जोशी १०) त्र्यं. ब. दाते ११) श्रीपाद यशवंत गोखले १२) सु. ब. टकले १३) सु. रा. वैशंपायन १४) दिलीप वाड १५) शरद वा. दाते १६) कृ. गो. नातू १७) रविंद्र बोडस १८) प्रा. स. ग. शारंगपाणी १९) रविंद्र केळकर २०) द. चि. घैसास २१) कृ. गो. नातू २२) सदानंद जोशी २३) माधव वा. पाटणकर २४) वसंत वा. बिवलकर २५) अभिजीत का. जोशी २६) वसंत बिवलकर २६) हेमंत वाड

व्यवस्थापक

श्री. काळे, श्री. बोडस, श्री. रा. पु. गानू, श्री. श्री. गो. नेने, श्री. द. चि. घैसास, श्री. रा. अ. सहस्त्रबुध्दे, श्री. दि. के. मराठे, श्री. प्र. दि. खरे, श्री. द. म. जोगळेकर, श्री. मा. ह. जाओल, श्री. दिगंबर मराठे, श्री. हेरंब लोंढे, श्री. वा. गो. भागवत, श्री. श्रीनिवास पेंडसे, नंदकुमार काळे, श्री. सोमण, श्री. अभिजित जोशी, श्री. आगाशे, श्री. राजेंद्र कुलकर्णी, राधाकृष्ण रानडे, श्री. उपासनी.

संस्थेच्या कार्यात आजपर्यंत ज्या असंख्य कार्यकर्त्यांचा हातभार लागला त्यांच्याबद्दलचा, संस्थेकडे उपलब्ध असणाऱ्या कागदपत्रांच्या सहाय्याने मागोवा घेण्याचा हा प्रयत्न आहे. ह्या याद्या जास्तीत जास्त अचूक करण्याचा प्रयत्न केलेला आहे. नजरचुकीने काही त्रुटी राहिलेल्या असतील तर त्या कृपया नजरेस आणून द्याव्यात.







भारतीय चित्रपट सृष्टीचे जनक - दादासाहेब फाळके

चित्तपावन ज्ञातीने भारतमातेला जे अनेक सुपूत्र दिले त्यात दादासाहेब फाळके यांचे स्थान मोलाचे आहे. चित्रपट व्यवसायाची मुहूर्तमेढ लावली एका चित्तपावनानेच !

फाळके यांचे मूळ गाव कोकणातील संभेपिरंदवणे. पेशव्यांनी फाळक्यांना त्र्यंबकेश्वर येथे मंदिराच्या सेवेत रूजू करून घेतले. त्याच घराण्यात दादासाहेब उर्फ धुंडिराज गोविंद फाळके यांचा जन्म ३० एप्रिल १८७० साली त्र्यंबकेश्वर क्षेत्री झाला. त्यांचे वडील गोविंद उर्फ दाजीशास्त्री हे वेदशास्त्र पारंगत, संस्कृतचे गाढे पंडित. त्यामुळे दादासाहेबांचे पाठांतर जबरदस्त वेद, रामायण, महाभारत यांचे वाणीवर संस्कार झालेले.

दादासाहेबांचे प्राथमिक शिक्षण त्र्यंबकेश्वरी तर पुढील शिक्षण मुंबईत झाले होते.

दादासाहेबांचा जात्याच पिंड कलावंताचा त्यामुळे मैट्रिकच्या नंतरचे शिक्षणासाठी वडिलांनी त्यांना जे. जे. स्कूल ऑफ आर्टसमध्ये घातले.

पुढील वर्षी म्हणजे वयाच्या १६ वर्षीच त्यांचा पहिला विवाह झाला. ते जे. जे. स्कूलची परीक्षा पास झाले आणि त्यांच्या वडील बंधूंनी शिवराम फाळके यांना त्यांना बडोद्याला बोलावून घेतले. ललितकला शिकण्यासाठी कलाभवनात त्यांचे नाव दाखल केले. आर्किटेक्टर व मोल्डिंग, फोटोग्राफी, प्रिंटिंग, प्रोसेसिंग, नाटकांचे दिग्दर्शन, रंगवेषभूषा, थ्रीकलर प्रोसेस सिरॅमिक, नाटक कंपन्यांचे पडदे रंगवून देणे, शास्त्रीय संगीत, अभिनय, किर्तन , नेपथ्य, लेखन वगैरे बाबतीत ते अगदी तरबेज झाले. १९०१ साली बडोद्यास आलेल्या जर्मन जादूगाराकडून रासायनिक, तांत्रिक व भ्रांतिकृत स्वरूपाचे ज्ञान मिळवले. त्यांचा वापर त्यांनी त्यांच्या लघुपटात केला. इ.स. १९०२ साली त्यांनी बडोद्याच्या शंकर वासुदेव करंदिकर यांची कन्या सरस्वतीबाई हिचेशी विवाह केला. सरस्वती ही किर्लोस्कर नाटक मंडळीतील भाऊराव कोल्हटकर यांची भाची. विविध मंदिरे, लेणी, यांचा कलात्मक दृष्टीकोनातून अभ्यास केला. पण कलासक्त मन नौकरीत रमेना. नोकरी सोडली. त्यानंतर फाळके एनग्रेव्हिंग अ‍ॅन्ड प्रिंटीग वर्क्स या नावाने छापखाना चालू केला. हा व्यवसाय जसा वाढला तसा तो मुंबईत 'लक्ष्मी आर्ट प्रिंटिंग वर्क्स ' या नावाने भागीदारीत चालू केला. रंगीत छपाईसाठी लागणारी सामुग्री घ्यायला ते जर्मनीत गेले. आल्यावर विदेशातून आले म्हणून शुध्दिकरण------ पण काय व्यवसाय करायचा हा भलामोठा प्रश्न होताच.

दिवस इस्टरचा होता. इस्टरमुळे त्या दिवशी '' दि लाईफ ऑफ ख्राइस्ट'' हा चित्रपट दाखवित होते. तो पाहून दादासाहेबांना वाटले आपल्या देशात असे चित्रपट का करू नये? आपल्याकडे हव्या तेवढ्या पौराणिक, ऐतिहासिक कथा आहेत. मग पडद्यावर त्यांना येशू, मेरीच्या ऐवजी श्रीकृष्ण, यशोदा, दिसू लागले.

१५ एप्रिल १९११ ह्या दिवशीचा तो विशिष्ट क्षण हा भारतीय चित्रपट सृष्टीच्या निर्मितीचा होता. दादासाहेबांनी लगेचच एका इंग्लिश कंपनीतून टॉय सिनेमा व फिल्मसची रिळे आणली आणि मग मेणबत्तीच्या प्रकाशात घराच्या भिंतीवर सिनेमाचे प्रयोग चालूही झाले. त्यानंतर चालू झाले दादासाहेबांचे शोधपर्व. फोर्ट विभागात सिनेमाचा व्यवसाय तंत्रज्ञान ह्या बद्दल माहिती देणारी पुस्तके शोधणे हे चालूच झाले. वियातेतून कॅटलॉग , माहितीपत्रके, पुस्तकेही त्यांनी मागवली अभ्यास , प्रात्यक्षिक चालू झाले. फाळके यांनी विलायतेते जाऊन माहिती घ्यायची, तंत्रज्ञान शिकायचे, यंत्र आणायची हे मनाशी पक्के केले. त्यासाठी पत्रव्यवहारही केला.

१ फेब्रुवारी १९१२: दादासाहेब फाळके इंग्लंडला जायला निघाले. ध्येय निश्चित झाले होते, मनात कुठल्याही शंकाकुशंका नव्हत्या.

लंडनला पोहोचल्यावर पिकॅडली सर्कस ह्या भागात बायोस्वे सिनेसाप्ताहिकाचे ऑफिस होते तेथे जाऊन ते के. बर्न यांना भेटले. सिनेमाटोग्राफीच्या मशिनरीबाबात विचारणा केली आणि पुढील मार्गदर्शन करण्याची नम्र विनंतीही केली.



सिनेमा तंत्राबाबतची बरीचशी माहिती दादासाहेबांनी आधीच अभ्यासून ठेवली होती हे पाहून मि. केबर्न ह्यांना आश्चर्य वाटले एवढेच नाही तर दादासाहेब शाकाहारी आहेत, मद्य पीत नाहीत, विडी - सिगरेट ओढत नाहीत हे पाहून मि. केबर्न यांना दादासाहेब यांच्याबद्दल आदरच वाटला. मि. केबर्न यांनी लगेच हेपवर्थ या एका सिनेमा कंपनीच्या मॅनेजरला फोन लावला व दादासाहेबांना तो कारखाना नीट दाखवण्याची व्यवस्था केली. तेथे दादासाहेबांनी अत्यंत अभ्यासू नजरेने सिनेनिर्मितीची विविध अंग चिकित्सक नजरेने पाहिली. तेथील मॅनेजरनेही मशीन चालवणे, सीनसीनरी व प्रयोगासंबंधीने सर्व गोष्टींचे प्रात्यक्षिक दाखविले. दादासाहेबांनी ते चटकन आत्मसात केले. दादासाहेबांनी मि. केबर्न यांना सांगितले '' पुढच्या वर्षी मी माझा हिंदी मूकपट घेऊन येणार व लंडनवासीयांना भारतीय संस्कृतीचे वास्तव दर्शन घडवणार आहे.''

विल्यमसन कॅमेरा, परफोरेटिंग मशीन व एक प्रिंटींग मशीन एवढी यंत्रसामुग्री खरेदी करून दादासाहेब भारतात परतले. कोडॅक कंपनीला कच्चा फिल्मची ऑर्डर दिली. परत एकदा शुद्धीकरण करून घेतले ! दादासाहेबांनी दादर येथील सर मथुरादास यांची जागा घेऊन सामान येईस्तोवर डार्करूमची सोय करून ठेवली.

दादासाहेबांनी एका वृत्तपत्राला मुलाखत दिली, '' मला भावी काळात जुन्या व नव्या संस्कृत, मराठी नाटकातील भाग, निरनिराळ्या चालीरिती, स्वदेशी विनोद, विविध क्षेत्रे व यात्रा प्रसंग सामाजिक समारंभ, शास्त्रीय व विद्याविषयक देखावे वगैरे चित्रपट मी काढायचे आहे. भारतीय चित्रपट हे करमणूकीचं तर एक साधन आहे पण विद्या व ज्ञान देण्यासाठी ते एक उत्कृष्ठ साधन आहे.

साधारण १९१२ मध्ये लंडनहून पाठविलेली यंत्रसामुग्री आणि मग नकाशाच्या सहाय्याने यंत्रांची जुळवाजुळव झाली व यंत्रे चित्रिकरणासाठी सज्ज झाली. फिल्मला कडेची भोके पाडण्यासाठी सरस्वतीबाई उर्फ काकी मदत करत, त्यांचे अगदी हात दुखत पण ती साध्वी ते बोलून दाखवत नसे. भांडवलदारांना काही माहितीपट तयार करून दाखववावा म्हणून वाटाण्याचे बी कुंडीत पेरून, त्याची क्रमशः वाढ कशी होते हे चित्रित करण्यात आले. वाटाण्याचा वेल उंच वाढला, भांडवलदारांच्या स्वप्नांचाही वेल गगनाला भिडला अन् भांडवल मिळाले. फाळकेज् फिल्म कंपनी अस्तित्वात आली. पहिल्या मूकपटाचे कथानक निश्चित झाले, कलाकार आले. दादासाहेबांनी स्वतः राजमहाल, जंगल, पहाड, शेत, गुहा वगैरे दृष्ये पडद्यावर चितारली. तो पहिला मूक पट होता 'राजा हरिश्चंद्र' आऊटडोअर शुटींग बरेच झाले. संबंधीची सर्व दृष्ये त्र्यंबकेश्वरास चित्रित झाली. सर्व स्टाफची शिदोरी काकी स्वतः करीत. स्वतःच्या मनाजोगे चित्रिकरण होईस्तो दादासाहेबांचे समाधान होत नसे. तोच प्रसंग वारंवार चित्रित करण्यासाठी किती खर्च आला, किती श्रम पडले याची ते फिकीर करत नसते. मनासारखे चित्रिकरण झाले की लॅबकडे वळून तेवढाच भाग डेव्हलप करत, असे महिनोन् महिने चाले. त्या काळात जेवण,झोप, स्नान सर्वच ते विसरत व अखंड काम करत रहात. 'राजा हरिश्चंद्र' तयार झाला. या मूकपटाचा ट्रेट शो करण्यासाठी प्रतिष्ठितांना आमंत्रणे गेली. ता. २१ एप्रिल १९१३, स्थळ ऑलिम्पिया नाट्यगृह, प्रयोग-यशस्वी झाला.

कुठल्याही प्रकारचे मार्केटिंग टेक्नीकचे, व्यवस्थापनाचे शिक्षण न घेता एक भव्य स्वप्न साकार झाले. म्हणजे भारतीय चित्रपट उद्योगात पहिल्या ट्रेडशोचा पहिला मानही दादासाहेबांकडेच जातो. 'राजा हरिश्चंद्र' ने चांगला पैसा दिला व प्रयोगही अनेक ठिकाणी अगदी कोलंबो, रंगून, कोलकत्यापर्यंत झाले.

यानंतर दादासाहेबांनी एकंदरीत खर्चाचा विचार करून मुंबईचा स्टूडिओ नाशिकला आणायचे ठरविले. मुक्काम हौदाचा बंगला, फुले मार्केट, नाशिक येथे लवकरच. 'भस्मासूर-मोहिनी', पिठाचे पंजे, सावित्री सत्यवान हे मूकपट तयार झाले.

दादासाहेबांसारखे एकनिष्ठ कलासेवक दुर्मिळच. लंडन येथील बायोस्कोप या सिनेसाप्ताहिकाशी दादा नेहमी संपर्क ठेवून होते. मि. केबर्न यांना लंडनला ते आपली प्रगती, विचार, लिखाण, कात्रणे नेहमी पाठवत. त्यांचे यश पाहून लंडन वासियांनी चित्रपटाच्या प्रतींसाठी विचारणा केली.

या सगळ्यांचा परिणाम म्हणजे अमेरिकेतील वॉर्नर ब्रदर्सने भारतीय चित्रपटाच्या शंभर प्रतीचे कॉन्ट्रॅक्ट करण्याची तयारी दाखवली. हेपवर्थ फिल्म या संस्थेकडून तर दादासाहेबांना मानाचे आमंत्रण आले.

पण देशभक्त दादासाहेब फाळक्यांना परदेशात, परदेशी



भांडवलावर हिंदी चित्रपट काढून तो हिंदूस्थानात दाखवणे मान्यच नव्हते. त्यामुळे हेपवर्थ फिल्म कंपनीची योजना त्यांनी साभार परत केली.

महायुध्दाची ठिणगी पडली होती. मलेरियाची साथही पसरली होती. आणि एकंदरीतच घबराटीचे वातावरण पसरले होते. भांडवलदार पैसे काढायला तयार नव्हते. नवीन चित्रपट काढणार कसे? पण दादासाहेबांनी कर्तव्यपराङ्मुख व्हायचे नाही हा संकल्प केला.

१९१७ मध्ये लो. टिळकांनी फाळके फिल्म कंपनीला भेट दिली. दादासाहेबांनी आपली महत्वाकांक्षा टिळकांना सांगितली. हे ही एक देशकार्यच आहे असे टिळकांनी जाणले आणि अर्थसहाय्याचा ओघ चालू झाला. जमलेल्या निधीतून फाळकेज फिल्म्सचा शेवटचा चित्रपट लंकादहन पुण्यात आर्यन सिनेमात झळकला. अजून नवीन चित्रपट काढायचे होते, भांडवलाची टंचाई नेहमीचीच. म्हणून काही प्रतिष्ठित लोकांनी या कामी लक्ष घालून योग्य ते करार केले व फाळकेज् फिल्म्सचे हिंदुस्थान सिनेमा फिल्म कंपनीत रूपांतर झाले. त्यानंतर श्रीकृष्ण जन्म तयार झाला. ज्यात फाळक्यांनी आपली मुले घेतली. बाबाराय, महादेव, मंदाकिनी सगळी बच्चे कंपनी वडील सांगतील त्या सूचना तंतोतंत पाळीत त्यानंतर लगेच कालिया मर्दन हाती घेतला ज्यात श्रीकृष्णाचे काम त्यांच्या मुलीने म्हणजे मंदाकिनीने केले. ह्या पहिल्या बालनटीचे सर्वत्र कौतुकही झाले.

भांडवलाची सतत कमतरता व त्यामुळे निर्माण होणारे वाद यामुळे तात्पुरते वैराग्य उत्पन्न होऊन दादासाहेब सहकुटुंब काशीक्षेत्री रहावयास गेले. पण तेथेही स्वस्थ बसणे त्यांच्या स्वभावात नव्हते. अनेक तरूणांना त्यांनी दिग्दर्शनाबद्दल मार्गदर्शन केले. माणसाची बुध्दीच त्याला कार्यप्रवण ठेवत असते. काशी मुक्कामी त्यांनी 'रंगभूमी' हे नाटक लिहिले.

दरम्यानच्या काळात दादासाहेबांनी 'सेतूबंधन' ची निर्मिती केली. पण बोलपटाचा बोलबाला आत्तापावेतो खूप झालेला होता. त्यानंतरच्या काळात दादासाहेबांनी कोल्हापूर सिनेटोन साठी गंगावतर बोलपट काढला.

दादासाहेबांचे काही ट्रीक - सीन्स - श्रीकृष्णजन्म चित्रपटाचे वेळी कमळाच्या फुलाचा शॉट हवा होता. कमळाची फुले उपलब्ध नव्हती. दादासाहेबांनी मार्ग काढला. त्यांनी एक मोठा कांदा घेतला व तो अशा खुबीने कापला की मोठ्या पडद्यावर तंतोतंत कमळाचे फूल दिसले.

याच चित्रपटात तुरूंगात कडेकोट बंदोबस्तात असुनही कृष्ण गोकुळात सुखरूप पोहचले. असे कंसाला कळताच सर्व दिशांनी श्रीकृष्ण भाला, तलवार, चक्र, धनुष्यबाण आदी आयुधे घेऊन कंसावर चालून येतात असा भास दाखवायचा होता. त्यावेळी प्रिझमलेन्स / किंवा तत्सम तंत्रज्ञान उपलब्ध नव्हते मग दादासाहेबांनी एकाच फिल्मवर दहा निरनिराळ्या कोनातून कृष्णाचे शॉटस् घेतले व हवा तो परिणाम साधला

'गंगावतरण' चित्रपटातही आकाशातून उडणारा घोडा, रांजणात अदृश्य होणारी भूते, शंकर स्तवन करणारी मुंडकी, गंगेचे पृथ्वीवर आगमन ही चकमत्कारयुक्त दृष्ये दाखविली आहेत.

गंगावतरण नंतर दादासाहेब खरोखर निवृत्त झाले अनेक ठिकाणी सत्कार, भाषणे, मुलाखती झाल्या. आता मात्र दादासाहेब खरोखरच थकले होते, मनाने व शरीरानेही.

१६ फेब्रुवारी१९४४ रोजी वयाच्या ७४ व्या वर्षी त्यांची प्राणज्योत अनंतात विलीन झाली.

अशा ह्या महापुरूषाला शतशः प्रणाम !

'आई'

स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी
वर्षे, महिने लोटलीत मध्यंतरी किती !
नाही आता 'आई' सत्य हे मन न स्वीकारी
जन्मानंतर मरण जरी असे अबाधीत सत्य
आई असते आईच केवळ नसे भास
या सम हा !
प्रेमाचे मळे भरभरूनी सांडते
हे ही नसे असत्य,
आई तु असावी अथवा नसावी
भास जिवनांत
ठायी ठायी तुझाच कणांनी
माझे अस्तित्त्व या जीवनांत

डॉ. सरोज उपासनी
(प्रिन्सीपल, कोकिलाबेन धिरुभाई,
अंबानी नर्सिंग कॉलेज, अंधेरी, मुंबई)



